


१९८४
म. ग्रं. मं. ठाणें
विषय
सं. क.





REFBK-0014257

सन १९६४

श्रू. प्रभाले —

३६७६५

२५।८।६४

ग्र. २।८.

३३६.

चराति चरतो भगः ।

# इन्द्राचा आदेश

[ प्रवास-रेखा-संग्रह ]

REFBK-0014257
REFBK-0014257

: संपादक
मधुच्छंद अग्निहोत्री

क्र. 97240

: वेष्टण
वसंत चव्हाण

नवे लेखन प्रकाशन, नागपूर.

मूल्य २ रुपये.

: प्रकाशक

**राम कोलारकर**

'नवे लेखन प्रकाशन' करिता

नवे लेखन प्रकाशन,

गोकुळपेठ, नागपूर.

सर्व हक्क सुरक्षित

प्रथमावृत्ती

दि. २२-४-६४

: जॅकेट-मुद्रण

**श्याम ब्रदर्स,**

नागपूर.

: मुद्रक

**पां. ना. बनहट्टी,**

नारायण मुद्रणालय,

धनतोली, नागपूर.

# अंतरंग


| | | |
|---|---|---|
| प्रास्ताविक | १ | काका कालेलकर |
| धुक्यातून लाल ताऱ्याकडे | १५ | शं. वा. किर्लोस्कर |
| | १८ | अनंत काणेकर |
| हिमालयातील प्रवास | २१ | काका कालेलकर |
| कमलपत्रे | ३५ | ना. सी. फडके |
| केल्याने देशाटन | ४९ | प्र. के. अत्रे |
| आमची माती आमचे आकाश | ६३ | अनंत काणेकर |
| देवगिरीच्या पंचक्रोशीत | ७४ | चिं. वि. जोशी |
| घारापुरी | ८३ | स. आ. जोगळेकर |
| उध्वस्त विजयनगर | ९७ | गंगाधर गाडगीळ |
| दक्षिणेकडील नंदनवन | ११४ | कमला फडके |

# प्रास्ताविक

मनुष्य स्वभावतः स्थावर आहे की जंगम ? सहज विचार केला असता दिसून येईल की, त्याच्यात या दोन्ही वृत्ती भरल्या आहेत. जंगली अवस्थेतून सुधारून आजची अवस्था जर मनुष्याला मिळालेली असेल, तर मनुष्य मुळात जंगमच असला पाहिजे. अन्न आणि पाणी जिकडे मिळेल तिकडे जावे, ही प्राणीमात्राची स्वाभाविक वृत्ती आहे. जोवर मनुष्य शिकारी वृत्तीने राहात होता तोवर त्याला असेच करणे भाग होते. एका जंगलातील शिकार संपली की, पांडवांसारख्या आरण्यकांना दुसरे जंगल शोधावे लागे, अशी वर्णने महाभारतातसुद्धा येतात. शिकारी जीवन सोडून देऊन मनुष्याने जेव्हा धनगराचे, गुराख्याचे आणि गवळ्याचे जीवन पसंत केले, तेव्हा सुद्धा एका जंगलातील किंवा

चराऊ रानातील गवत संपले की, नंदासारख्यांना आपले कळप घेऊन दुसऱ्या ठिकाणी जावे लागे. पुढेपुढे जिकडे अन्न मिळेल तिकडे जाऊन राहण्यापेक्षा जिथे आपण राहतो तिथेच अन्न काढता आले तर किती छान होईल, असा मनुष्याच्या मनात विचार आला. त्याने रखडण्याचे सोडून देऊन जमीन खेडण्याला आरंभ केला. आणि तो आर्य झाला. शेतीच्या वाढीबरोबर माणसाच्या जीवनात मोठ्यात मोठा फेरबदल होत गेला. संस्कृती वाढली आणि स्थावरता आली. स्थावरतेबरोबर माणसाची कार्यशक्ती वाढली, पण त्याची वीर्यशक्ती ( Vitality ) काहीशी कमी झाली असली पाहिजे. एका बाजूने काही झीज सोसल्यावाचून दुसऱ्या बाजूने मनुष्य वाढूच शकत नाही.

पण मनुष्य पडला लोभी. त्याला दोन्ही अवस्थांचा लाभ घ्यायचा होता. त्याला जगात असे दिसले की, निसर्गाने वनस्पती सृष्टीला जेथे स्थावर केली, तेथे वनस्पतींची लग्ने लावणाऱ्या पुरोहितासारखी जंगम फुलपाखरेही निर्माण केली. अमुक एका मोठ्या वर्गाने स्थावर राहावे, आणि त्याला जंगमपणाचा लाभ मिळवून देणाऱ्या दुसऱ्या वर्गाने भटकत राहावे अशी व्यवस्था माणसाला सोईची वाटली. त्याने गृहस्थाश्रमाबरोबर भटक्या लोकांचे एकदोन आश्रम स्थापन केले. ब्रह्मचारी शिकून तयार झाला की तो भटकायला जायचाच. तीर्थयात्रा पुरी झाली म्हणजेच त्याला लग्नाची परवानगी मिळायची. दुसऱ्या बाजूला, गृहस्थाश्रमाची प्रवृत्ती थोडी ढिली पडली. स्थावर झाल्याचा गंज चढला की धर्मशास्त्र सांगते, ‘ आता पुष्कळ भोगले, बना आता वानप्रस्थ आणि चला परत अरण्याकडे.’ जेथून आलो तिकडे परत जाण्यात एक प्रकारचा आनंद, एक प्रकारचा विसावा असतोच. सकाळी उठून भटकायला गेलेली मुले

सांज होताच आईची ऊबदार कूस शोधीत यायचीच. जे अरण्य सोडून मनुष्यप्राणी वस्तीत आला, आणि गृहस्थ आणि शहरी नागरिक बनला, त्या अरण्याकडे परत जाऊन वानप्रस्थ होऊन परिव्राजक होण्याची तयारी करणे यामध्ये हाच आनंद आहे. प्रगती ही बहुधा स्क्रूच्या पेचासारखी असते. एक कुंडाळे पुरे झाले, की एक पायरी वर चढली.

गृहस्थाश्रमी लोकांनीही मधून मधून यात्रेला गेलेच पाहिजे अशी जुनी व्यवस्था होती. यात्रेमुळे मनुष्याला देशदेशातील गोष्टी पहाता येतात, समजून घेता येतात, नवेनवे संबंध जोडता येतात आणि स्थावरतेमुळे जीवनावर जमलेले शेवाळ काढून टाकता येते.

समाजशास्त्राचा विकास करणाऱ्या धर्मकारांनी अशी व्यवस्था केली नसती, तरीही मनुष्यस्वभावाने हीच वस्तू या ना त्या रीतीने शोधून काढलीच असती. मनुष्यमात्रात जी नैसर्गिक किंवा ईश्वरी प्रेरणा आहे तिलाच शास्त्रीय स्वरूप देण्याचे काम धर्मकार करीत असतात. एकटी नैसर्गिक वृत्ती ही खालीही पाडील आणि वरही चढवील. जी नैसर्गिक वृत्ती मनुष्याला वर घेऊन जाते तिलाच ईश्वरी प्रेरणा म्हणतात. ईश्वराकडे घेऊन जाते ती ईश्वरी, या कारणाने स्वतंत्रपणे विकसलेल्या साऱ्या धर्मातूनही जवळ जवळ एकसारखीच व्यवस्था दिसून येते. यात्रेला जाण्याचा रिवाज जपानात शिंटो किंवा बुद्धीडो धर्मातही आढळतो आणि हिंदूंच्या आश्रमव्यवस्थेतही तो सापडतो. मक्केच्या हज्जयात्रेत पुण्य आहे असे सांगणाऱ्या इस्लामी धर्मातही त्याला स्थान आहे, आणि तागाचे कपडे घालून येरुसलेमच्या पवित्र भूमीचा प्रवास करणाऱ्या ख्रिस्ती भक्तजनांनाही ही वस्तू प्रिय होऊन बसली आहे.

आपल्या इकडे यात्रेलाच प्रधानधर्म समजणारे परिव्राजक तर होतेच, पण प्रत्येक वर्णालासुद्धा थोडाफार प्रवासाचा धर्म सांगितला होता. ब्राह्मण प्रथम ब्रह्मचारी म्हणून विद्यायात्रेला जात, मागाहून यज्ञसत्रात जात, चातुर्मास्य सोडून अधूनमधून तीर्थाटन असायचेच आणि वृद्धांनी वृद्धपणी मरण्याकरिता सुद्धा एका स्थानी बसण्याऐवजी पाय चालतात तोवर ईशान्य दिशेकडे चालत राहावे असेच विधान केलेले आहे.

क्षत्रिय जर मृगयेसाठी दरवर्षी बाहेर पडले नाहीत, तर शेतीचे रक्षण व्हावे कसे ? आणि शेतकऱ्यांनी राजाला पिकाचा षष्ठांश द्यावा कसा ? राजात जर काही पुरुषार्थ असेल तर घोडा सोडून अश्वमेध करायला तो निघायचाच. दिग्विजय न करील तो राजा यथातथाच म्हटला जाई.

वैश्य म्हणजे सौदागर. ते आपला काफला घेऊन जंगले पसार करतील. एका राज्यातून दुसऱ्या राज्यात जातील, इकडचा माल तिकडे विकतील, तिकडचा इकडे घेऊन येतील, तेव्हाच सार्थवाहाचे त्यांचे जीवन सार्थ झाले म्हणावयाचे. घरच्या नववधूलासुद्धा घरात सोडून समुद्राची सफर करायला जाणाऱ्या वाणिज्य वीरांच्या कथा आपल्या साहित्यात काही कमी नाहीत.

बौद्ध साधू म्हणजे जबरदस्त प्रचारक. त्यांनी समुद्रयात्रेचा विधिनिषेध न बाळगता, दूरदूरच्या देशांपर्यंत संस्कृतीचा विस्तार केला आणि देशदेशांतराच्या लोकांनाही त्यांनी या देशात आणले. श्रमणाने एकाकी सर्वत्र विहार केला पाहिजे अशी बुद्धभगवानाची शिकवण होती; आणि त्याने स्वतः तर विहार करून करून एका सबंध प्रांतालाच त्या प्रवृत्तीचे नाव देऊन टाकले.

अशोक राजाने दिग्विजय सोडून देऊन धर्मविजय सुरू केला. आणि दूरवर्ती नव्यानव्या दिशेकडे धर्मयात्रा चालविल्या. वृद्धश्रवा इंद्राने वैदिक संस्कृतीच्या प्रारंभकाळीच आदेश दिला की जो बसून राहतो त्याचे नशीबही बसून रहाते, जो चालू लागतो त्याचेच भाग्य चालते. '**चराति चरतो भगः**' । ही प्रेरणा घेऊन मेंढपाळ चालले, खलाशी चालले, भक्त चालले, सैनिक चालले आणि परिव्राजकही चालले. या जगतात सर्वच काही चालते आहे. आणि मनुष्य जेव्हा चालून चालून कंटाळतो, तेव्हा स्थावर होऊन राहण्याऐवजी या जगाला सोडून तो कायमचा चालता होतो. 'प्रैति अस्मात् लोकात् ।'

मनुष्याला प्रवासाची दीक्षा जर कोणाकडून मिळाली असेल, तर ती आकाशातील ताऱ्यांकडून नसून अखंड जीवनप्रवाह चालविणाऱ्या नद्यांच्याकडून. त्यातसुद्धा दोन प्रकारच्या वृत्ती दिसून येतात. प्राचीन काळी कित्येक लोक हा सूर्य उगवतो तरी कोठून हे शोधून काढण्यासाठी जसे उत्तरोत्तर पूर्वेकडे जात, आणि दुसरे कित्येकजण हाच सूर्य विसावा घ्यायला मावळतो कुठे हे शोधून काढण्याला पश्चिमेकडे जात. त्याचप्रमाणे कित्येक लोक या नदीचे इतके उसळणारे पाणी येते तरी कोठून हे प्रत्यक्ष पाहण्यासाठी तिच्या उगमाकडे चढू लागत; तर इतर कित्येकजण या सगळ्या पाण्याचे विसर्जन कोठे होते, कशात होते, आपल्याला तेथे काय आढळेल याचा अनुभव घेण्यासाठी खलाशी होऊन समुद्राकडे जात. गंगोत्रीकडे जाणारा मेंढपाळ आणि गंगासागराकडे दौडणारा खलाशी हे भाऊभाऊच होत. नदीमुखानेच समुद्रात प्रवेश करावा अशी शिफारस करणाऱ्या कवीच्या वंशजांनी समुद्रयात्रा किती केली आहे याचा तपास काढताना मात्र

निराशाच पदरी यावयाची. वेदकाळचे तुग्र व भुज्यू जी यात्रा करीत ती नदीची होती, की समुद्राची हे आज सांगणे कठीण आहे. जातककथेत वर्णिलेले वैश्य लोक एका बाजूला जावा, बाली आणि श्याम चीनपर्यंत जात असतील आणि दुसरीकडे आफ्रिकेचा सगळा पूर्वकिनारा पादाक्रांत करीत असतील. पण त्यांच्यातून एकानेही प्लिनीप्रमाणे पूर्व वा पश्चिम सागराचे पेरिप्लस लिहिले नाही. जावाला गेल्यानंतर परत येण्याची आशाच ज्याने सोडली, त्यांच्या वंशजांनी समुद्रयात्रेचा निषेध करावा यात आश्चर्य ते काय ? आणि हा निषेध कां, तर म्हणे, तेथे खाण्यापिण्यात, सोवळ्याओवळ्याचा काही धरबंध राहणार नाही, आचारधर्म बरोबर पाळला जाणार नाही. या संकटातून वाचण्यासाठी हा खासा उपाय शोधून काढला ! उन्हात जाण्याने एकाला पित्तप्रकोप होत असे, त्याने त्याबद्दल वैद्याला विचारले. शहाण्या वैद्यबुवांनी मोठा गंभीर चेहेरा करून सांगितले, 'भल्या गृहस्था, उन्हात जाणे हेच मुळी चुकीचे आहे, सावलीत बसून रहा ना. मग बघू बरं कसा पित्तप्रकोप होतो तो ! अशा लोकांनी समुद्रयात्रेचा निषेध करून स्वतःला स्वतःच्या देशात कोंडून घ्यावे हे यथायोग्यच आहे. फार काय सांगावे ? या भेकड व्यवस्थाकारांनी वैराग्य-धन अशा संन्याशांनाही आज्ञापिले आहे की, जेथे खाण्याची पंचाईत असेल, लोक श्रद्भक्तिपूर्वक पुढीला बोलावीत नसतील, जेथे दंगा मारामारी चालत असेल अशा देशात जाऊच नये ! प्रवासाची ज्यांना हौस आहे, अशांना आपली मुलगी देऊ नये, असाही एक दंडक होता. सुरक्षितता हाच प्रथम धर्म आहे !

इतके करून आणि जीवनातील सर्वोत्कृष्ट सत्त्व सुकवून टाकून आपण जे सांभाळ इच्छित होतो ते तरी सांभाळले गेले

काय ? ज्याचा संसर्ग टाळण्यासाठी आपण समुद्रयात्रा सोडून दिली, तेच सारे उलट पेव फुटावे तसे समुद्रयात्रा करीत आपल्याइकडे आले आणि आपले राज्य, आपला व्यापार, आपले शिक्षण आणि आपले भाग्य या सगळ्यांचाच ताबा घेऊन येथे कायम झाले. 'जो बसून राहातो त्याचे भाग्यही बसूनच राहायचे.'

वस्तुस्थिती अशी आहे की, जीवनाचे उत्थान जेव्हा मंद पडू लागते, तेव्हा माणसाच्या हृदयात अज्ञाताविषयी भीती शिरू लागते. याच्या उलट, जर जीवनात यौवनाचा प्राण मुसमुसत असेल तर त्याच अज्ञाताचे आमंत्रण टाळतो म्हटले तरी टळत नाही. अज्ञातामागे धावणे, त्याचा अनुभव घेणे, त्याच्यावर विजय मिळवून त्याला ज्ञात बनविणे हा जीवनातील मोठ्यात मोठा आनंद आणि उत्कृष्ट पौष्टिक खुराक आहे. वैज्ञानिक प्रयोग करून जसा अज्ञातावर विजय मिळविता येतो, तसा प्रवास करूनही मिळविता येतो.

मनुष्य घोड्यावर स्वार होतो. तेव्हा घोड्याच्या शक्तीचाही स्वतःमध्ये संचार झाला आहे, अशा प्रकारे त्याची छाती फुलते, आणि शक्तीचा साक्षात्कार झाल्यामुळे मनुष्याचे व्यक्तित्व तितक्या अंशाने परिपुष्ट होते. ऐंशी मैलांच्या वेगाने धावणाऱ्या मोटारीचे अंकुशचक्र हाती धरताच हा सगळा वेग माझाच आहे, असे माणसाला वाटू लागते. एकादी संस्था किंवा राज्य चालविण्याचे फळ—त्याचा व्यक्तिगत आनंद—'इतक्या लोकांशी माझे तादात्म्य आहे, इतकी मोठी शक्ती मला वापरता येते, इतक्या व्यक्तींना गोळा करून मी एक विराट शक्ती उत्पन्न करू शकलो आहे' या अनुभूतीतच आहे. व्यक्तित्वाचा विकास, शक्तीचा संचय आणि भवितव्यतेचे नियंत्रण हाच माणसाला मोठा आनंदाचा

विषय आहे. प्रवासाच्या द्वारा मनुष्य जितका भूमिभाग दृष्टीच्या योगाने आपलासा करतो, जितके अंतर पादाक्रांत करतो, जितका अनुभव साठवितो, तितक्या अंशांनी त्याचे जीवन समृद्ध होते. भांडारात साठविलेले धन बाह्य असल्यामुळे ओझ्यासारखे होते. अनुभवाच्या द्वारा साठविलेले ज्ञान, कमाविलेले संस्कार आणि मिळविलेली शक्ती आंतरिक असल्यामुळे त्यांचे ओझे वाटत नाही. उलट, त्याची जोड मिळाल्यामुळे जीवनात दुसरा पुष्कळ बोजा उचलण्याची शक्ती उत्पन्न होते. जो मनुष्य प्रवासाला निघाला त्याला पुष्कळ वस्तूंचा परिग्रह टाळण्यावाचून गत्यंतर नसते. ज्याला बोजा कमी करून हलके होता येत नाही, त्याला प्रवासच करता येणार नाही. मग तो ढग असो वा मनुष्य असो; आणि प्रवासद्वारा मिळविलेले ज्ञान, संस्कार किंवा कौशल्य असे काही पचून जाते, की त्याचा बोजा किंवा परिग्रह भासतच नाही !

प्रवासद्वारा मिळविलेले ज्ञान आणि शिक्षणसंस्थात राहून मिळविलेले ज्ञान या दोहोत मोठ्यात मोठा फरक हाच असतो. आजकालच्या शिक्षणाच्या द्वारा मिळविलेले ज्ञान भाररूप असते. कारण ते वापरलेले किंवा पचविलेले नसते. म्हणूनच लहान लहान मुलांना शाळेतले शिक्षण देण्यापेक्षा प्रवासाचे शिक्षण दिले तर ते परिणामी कमी खर्चाचे आणि अधिक फलद्रूप होईल.

प्रवासी जसजसा प्रवास करीत जातो, तसतसा तो चातुर्याचा साठा वाढवीत जातो. चिकाटी आणि उदारता शिकतो, आणि अंती तो एक उत्कृष्ट समाजशास्त्री बनतो. प्रवास म्हणजे अडचणी सोसण्याचा बादशाही प्रकार ! प्रवासात अडचणी आल्याने माणसाला असे नाही वाटत की, आपल्या दारिद्र्याचे हे एक प्रतीक

आहे. त्याला असे वाटते की, सुचणूक अंगी आणण्याची ही एक संधीच आपल्याला मिळाली आहे. एका दृष्टीने प्रवास हे व्यक्तित्वाच्या विकासाचे साधन आहे; तर दुसऱ्या दृष्टीने तो देशभक्तीचा अनुभवाने थबथबलेला एक प्रकार आहे. जितका देश आपण पाहिला, निरीक्षिला–आपलासा केला, तेवढ्या देशाविषयी आपल्यात विशिष्ट भावना उत्पन्न होते, त्याच्याशी आपली आत्मीयता बांधली जाते, त्याच्यासंबंधी अभिमान किंवा भक्ती उत्पन्न होते आणि त्यामुळे आपण त्याचे अनन्य भक्त बनतो. एखाद्या प्रांताचा प्रवास करून आल्यानंतर वर्तमानपत्रात येणाऱ्या तिथल्या समाचाराविषयी केवढी आस्था वाटू लागते !

पण या प्रवासाच्या मागे जगाला लुटण्याची दुर्बुद्धी असता कामा नये. जगाचा कस काढून घेण्याची, जास्तीत जास्त फायदा मिळविण्याची वृत्ती असेल, तर वर वर्णिलेल्या उच्च लाभांपैकी फारच थोडे हाती लागावयाचे. मोठ्या लोभाने प्रवृत्त होऊन केलेल्या प्रवासाच्या लाभांची मर्यादाही तितकीच मोठी असते. भक्त-सेवक प्रवासाला निघतो तेव्हा अंतर्बाह्य साऱ्या शक्ती आपला संघ घेऊन त्याला सोबत करायला निघतात. जगाचे शोषण करू पाहणारा मनुष्य शेवटी इंद्रियपरायणच व्हायचा आणि इंद्रियानुभव हा विशिष्ट मर्यादेपर्यंतच आवश्यक असल्यामुळे, त्यापुढे त्याची मात्रा जसजशी वाढत जाईल, तसतसे व्यस्त प्रमाण सुरू होऊन तो अधिकाधिक बेचव होऊ लागतो आणि शेवटी त्याचा उथळपणाच दिसून पडतो. इंद्रियानुभवातून मिळणारा आनंद परिमित असतो. मनुष्यजातीने त्याचा अंत पाहिला आहे.

पण अजूनही माणसाला अंत सापडलेला नाही हृदयानुभवाने होणाऱ्या विकासाचा. त्याची विविधता अजून संपलेली नाही. मनुष्य

जितका अधिक निःस्पृह, निराग्रही आणि निरहंकारी, तितकी त्याला प्रवासामधून जास्तीत जास्त संस्कारिता लुटता येते. भक्त सेवक जेव्हा प्रवासाला निघतो तेव्हा आत्मानुभव, आत्मविकास आणि आत्मैक्य तिन्ही त्याच्यात वाढतच जातात. रोजच्या रोज विकास पावणारे विश्व बघून भोगैश्वर्यामागे लागलेल्या माणसाला वाटते की, ' हे विश्व माझे होवो, माझ्या ताब्यात येवो. ' त्याच्या ऐवजी भक्त–सेवक इच्छितो की, ' मीच त्याचा सेवक व्हावे, त्याचा अंश व्हावे आणि अभेद अंगी बाणवून घेऊन तेच होऊन जावे. ' हाच जीवनाचा परमोत्कर्ष आहे.

प्रवास करण्याने लाभ काय असे जर मला कोणी विचारले, तर त्याचे उत्तर मी सहज देऊ शकेन. पण लोक मला विचारतात, की तुम्ही कोणत्या उद्देशाने प्रवासाला निघालात ? हा प्रश्नच वेगळा आहे. आणि त्याचे उत्तर देणे काही सोपे नाही. खाणे, निजणे, भिणे, इत्यादी विश्वजनीन क्रिया मनुष्य कोणत्या उद्देशाने करतो हे सांगणे सोपे नाही. पुष्कळ वेळा मनुष्य असेच सांगेल की, राहावत नाही म्हणूनच या सार्वत्रिक प्रवृत्तीत आम्ही पडतो. यातून जितके लाभ होतील ते सारे आम्हाला इष्ट आहेतच. पण कोणत्या लाभाच्या लोभाने प्रेरित होऊन आम्ही प्रवृत्त झालो ते आम्ही सांगू शकणार नाही. आतून एक अदम्य प्रेरणा अस्वस्थ करून सोडते म्हणून मुकाट्याने तिला वश व्हावेच लागते. निसर्गाची ही रचना आहे—योजना आहे, की जीवनासाठी जी वस्तू अत्यंत उपयोगी आहे. तिच्या लाभालाभाचा विचार करून ती पसंत करावी असे काही असतच नाही. आंघोळ करावी की न करावी हा माणसाच्या पसंतीचा विषय होऊ शकेल, पण निजावे की न निजावे हे निसर्ग

माणसाला पसंत करूच देत नाही. निद्रेचा हल्ला झाला की विवश होऊन मनुष्य तिच्या ताब्यातच जातो.

ज्या मनुष्याच्या वृत्ती विकृत झालेल्या नाहीत, अशा मनुष्याच्या बाबतीत प्रवासाची वृत्तीही तितकीच स्वाभाविक असते. पाऊस पडला की खोंड जसा आपल्या शिंगांनी जमीन खोदून हुंगायला लागतो, तशी प्रवासाला निघायची संधी आली, की प्राकृतिक मनुष्याची पाउले न विचारता चालायलाच लागतात. 'कुठे चालला ?' असे कोणी त्याला विचारले तर तो म्हणेल की, 'ते काही आम्हाला माहिती नाही. असेल तिकडे जाऊ खरे. जाणे, चालणे, स्थानांतर करणे, एके ठिकाणी न बसणे, नवे नवे अनुभव घेणे, इतकेच आम्हाला माहीत आहे. डोळ्यांना तहान लागली आहे; सगळ्या शरीराला भूक लागली आहे, म्हणून पाय चालताहेत; याहून जास्त आम्हाला काही समजत नाही.'


पहाडातील रहिवाशांना ही चालण्याची खाज अधिक असण्याचा संभव आहे. पण सपाटीवरचे लोकसुद्धा काही कमी भटक्ये असत नाहीत. काशीचे गंगाजळ रामेश्वरला घेऊन जाऊन रामेश्वरच्या सेतूची रेती काशीला किंवा हरिद्वारला पोचविणारे यात्रेकरू सारेच काही पहाडी असत नाहीत.

माझ्या लहानपणची पुष्कळशी संस्मरणे प्रवासाविषयीची आहेत. शहापुराहून बेळगुंदीला जावे आणि तेथे पेरू, आंबे किंवा करवंदे खावी, साताऱ्याहून जरंडयाला किंवा परळीला जावे आणि तिथला रामदासस्वामींचा मठ आणि हनुमान पहावा; बेळगावहून तिनई घाट उतरून गोव्याची अप्रतीम वनश्री डोळाभर पहावी किंवा आंबोली घाट ओलांडून सावंतवाडीच्या मोतीतलावाच्या

काठी लाकडावरचे रंगीत काम बघून घ्यावे; जहाजात बसून कारवारला जाऊन समुद्रकिनारी वाळूचे किल्ले बांधावे; पुण्याला जाऊन संगम, पर्वती किंवा चतु:शृंगी यांचे दर्शन घ्यावे; मिरज, जत, रामदुर्ग, मुधोळ, सांगली आणि सावनूरसारख्या संस्थानांचे पाहुणे होऊन मध्ययुगीन भारतवर्षाचे ओझरते दर्शन घ्यावे, आणि कृष्णेच्या काठी नाचत बागडत असणारे हत्तीसारखे गाई-बैल पाहून आनंद मानावा, हेच माझे बालपणचे संस्कार. गाडीत गवत आणि गादी टाकली आहे, गाडी ओढणाऱ्या बैलांच्या गळ्यातील घंटांचा आवाज रात्रीच्या शांतीचा छेद करीत आहे, कुठून तरी चोर येतील या भीतीने रात्र जागून काढण्याची आवश्यकता पटली असूनसुद्धा, डोळे मधूनमधून मिटताहेत आणि दचकून पुन: उघडावेत तेव्हा 'बघा, आम्ही कसे सारी रात्र जागतो आहो' असे म्हणणाऱ्या चांदण्या माथ्यावर चमकत आहेत, हे सारे दृश्य माझ्या लहानपणच्या जीवनाशी ओतप्रोत झाले आहे. प्रवास करायला मला हेतू किंवा प्रयोजन लागतच नाही. गांधी-जींच्या बरोबर विलायतेला जाण्याची संधी आली असतानासुद्धा मी कां गेलो नाही ? हिमालयाची यात्रा केली असताना त्याच्यापलीकडे कैलासाला मी कां गेलो नाही ? अफगाणिस्तानावरून रशियाला जाण्याचा संकल्प शेवटच्या घटकेला कां सोडून दिला ? किंवा जावा, बाली, श्याम आणि सुमात्राकडे मी केव्हा जाणार आहे ? मॉरिशिअसहून आलेले आमंत्रण मी केव्हा स्वीकारणार आहे ? असे प्रश्न कोणी मला विचारले तर ते स्वाभाविक आहे. न जाण्यासाठी काहीतरी कारण असू शकेल, जाण्यासाठी कारण कशाला पाहिजे ? नदीला कोणी विचारले आहे की तू कां वाहतेस ? ती वाहताना थांबते तेव्हाच सर्वजण आश्चर्य करतात.

हिमालयाच्या यात्रेला मी कसा गेलो आणि त्यातून मी काय काय मिळविले ? हिमालयाला जाण्याची वृत्ती हिंदुमात्रात स्वाभाविक असते. सिंधू, गंगा, ब्रम्हपुत्रा आणि त्यांच्या सख्या साऱ्याच हिमालयाच्या मुली आहेत. तेव्हा प्रत्येक नदीभक्त केव्हा केव्हा आजोळी मजा करायला हा जायचाच. हिमालयाचे वैभव दुनियेतील तमाम सम्राटांच्या समस्त वैभवापेक्षाही वरचढ आहे. हिमालय हाच आपला महादेव आहे. साऱ्या विश्वाची समृद्धी वाढवीत असूनसुद्धा अलिप्त, विरक्त, शांत आणि ध्यानस्थ. हिमालयाला जाऊन त्यालाच हृदयात धारण करून घेण्याची ज्याची शक्ती असेल त्यानेच जीवन जिंकले. त्याला अनंत प्रणाम असोत.

—काका कालेलकर



# धुक्यातून लाल ताऱ्याकडे

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
क्र. १४२५८

## १ । शं. वा. किर्लोस्कर

ता. २२ एप्रिल १९३७ रोजी कॉंटे व्हर्डे ही बोट मुंबई बंदरातून सायंकाळच्या संधिप्रकाशात बाहेर पडली. त्या वेळी तिच्यावरील उतारूंमध्ये बत्तिशीच्या सुमाराचा एक महाराष्ट्रीय तरुण होता. विलायतच्या बोटीवरील हिंदी प्रवाशांत शिक्षणासाठी निघालेले गर्भश्रीमंत विद्यार्थी, धंद्यासाठी चाललेले व्यापारी अथवा मजा करण्यास निघालेले राजेरजवाडे व त्यांचा परिवार असेच मुख्यत्वे आढळतात. पण हा तरुण त्यांपैकी कोणत्याही यादीत मोडण्यासारखा नव्हता. त्याचा वेष साधाच, शरीरयष्टी सुटसुटीत, पण डोळ्यात गांभीर्य व करारीपणा यांचे असे मजेदार मिश्रण खेळत होते की,

त्याला पहाताच इतर प्रवाशांना त्याची ओळख करून घेण्याची साहजिकच इच्छा होई.

हे गृहस्थ म्हणजे महाराष्ट्राचे एक आवडते लेखक अनंत काणेकर हे होत. काणेकर निघाले ते मजेखातर नसले तरी एवढे मात्र खरे की, त्यांना प्रवासाची संधी ताबडतोब आणून दिली गेली ती, अनेकांना मौज वाटण्यासारख्याच एका निमित्ताने. त्या वर्षाच्या मे महिन्यात लंडन येथे बादशहा सहावे जॉर्ज यांचा राज्यारोहणसमारंभ होता; व या अपूर्व समारंभाला दूरदूरच्या प्रेक्षकांना हजर राहता यावे, येवढयासाठी बोटींच्या कंपन्यांनी सवलतीची परतीची तिकिटे ठेवली होती. त्याचा लाभ करून घेण्याचे काणेकरांनी मनात आणले.

त्याप्रमाणे काणेकर लंडनला गेले. पण पाच–पाच पौंड देऊन व बारा–बारा तास थंडीवाऱ्यात कुडकुडत बसून मिरवणूक पहाण्याऐवजी घरी बसून त्यांनी व त्यांच्या मित्रांनी रेडिओवरच सर्व वर्णन ऐकले. काणेकरांना याबद्दल कोणी अरसिक म्हणेल. पण वस्तुस्थिती अशी की, ते विलायतला गेले ते केवळ लंडन–पॅरिसची शोभा पहायला नव्हे, तर या निमित्ताने रशियाला जाण्यास मिळाले तर पहावे एवढयासाठी. त्यांच्यासारख्या माणसाला पॅरिसचा बुलेवार्द किंवा लंडनचे पिक्याडेली सर्कस भुरळ पाडण्याजोगे नव्हते. बर्मिंगहॅम–लिव्हर्पूलचे अवाढव्य कारखाने पाहण्यासही ते मोठे उत्सुक नव्हते अथवा ऑक्सफर्ड–केंब्रिजची विश्वविद्यालये त्यांना आकर्षित करीत नव्हती.

काणेकरांनाच काय, पण जगाच्या पाठीवरील कोणत्याही पुरोगामी विचाराच्या तरुणास विचारले की, “ तुला कोणता देश

पाहण्याची उत्कंठा आहे ?" तर तो क्षणही न थांबता "रशिया" हेच उत्तर देईल. पहिल्या महायुद्धात रशियात क्रांती झाली व समतेच्या तत्त्वावर नव्या प्रकारची समाजरचना तेथे केली गेली. तेव्हापासून या देशाने सर्व जगाच्या पुढे पाऊल टाकून अनेक क्रांतिकारक सुधारणांनी सर्वांना थक्क करून सोडले आहे. यांत्रिक उत्पादनामुळे जगामध्ये भांडवलवाले व मजूर असे दोन वर्ग उत्पन्न होऊन त्यांच्यामध्ये तीव्र लढा सुरू झाला आहे; व त्याचे भयंकर परिणाम सर्व जगाला कसे भोगावे लागत आहेत हे आपण पाहात आहोतच. या सर्व असंतोषाचे, द्वेषाचे, जुलमाचे व दारिद्र्याचे मूळच रशियाने उपटून काढले आहे. नवी वर्गविहीन समाज-रचना करण्याचा हा प्रयोग बेकारी व दडपशाही यांनी जर्जर झालेल्या अखिल मानवजातीस अत्यंत आल्हादकारक वाटावा यात नवल नाही. पण मूठभर लोकांच्या हाती सर्व सत्ता व संपत्ती एकवटून ठेवणाऱ्या साम्राज्यशाहीला रशियाचे हे वाढते बळ व यश कसे सहन होणार ? रशियाची ज्या ज्या प्रकारे बदनामी करिता येईल, त्या त्या प्रकारे त्यांनी ती चालू ठेवली.

परंतु कोंबडे झाकून ठेवले तरी सूर्य उगविण्याचा थोडाच राहणार ? रशियाने घडवून आणलेल्या प्रचंड सुधारणा या ना त्या प्रकारे जगाच्या निदर्शनास येत गेल्या आणि त्यामुळेच रशियाला भेट द्यावी अशी तीव्र इच्छा अनेक तरुणांच्या मनात उद्भवू लागली. श्री. अनंत काणेकर हे अशाचपैकी एक होत.

इतर देशांना भेट देण्याचे काम जसे सुलभ रीतीने होऊ शकते, तशी रशियाची तऱ्हा नाही. पण या अनेक अडचणी दूर

सारून काणेकरांनी आपले घोडे मॉस्कोच्या गॉर्की पार्कमध्ये नेऊन भिडविले व त्यांच्या रशियाच्या मुक्कामात जेवढे जेवढे म्हणून पहाता येण्यासारखे होते, ते ते त्यांनी पाहून घेतले.

★ ★

## २ । अनंत काणेकर

प्रवासाच्या खर्चाचा पहिला प्रश्न. या सर्व प्रवासाला मला एकोणीसशे रुपये खर्च आला. रशिया वगळला असता तर हा खर्च आणखी चारशे रुपये कमी झाला असता. प्रवासासंबंधीच्या आणि इतर लिखाणावर मी एवढे पैसे उभे करू शकलो. यावरून युरोपचा प्रवास करावयाला श्रीमंती हवीच असे नाही, मराठी लेखकही युरोपला जाऊन येऊ शकतो हे स्पष्ट होईल.

प्रश्न विचारणारे आणखी दोन जातींचे लोक होते. एक, उच्च विद्या काय ती सर्व परदेशात आहे असे समजणारे न्यूनगंडाने ग्रस्त झालेले लोक, आणि दोन, परदेशाला जायचे म्हणजे परत आल्यावर पन्नासाचा पंचावन्न रुपये तरी पगार होईल अशी काही तरी पदवी आणलीच पाहिजे अशी ठाम समजूत असलेले, जगातल्या सर्व गोष्टींची किंमत रुपये, आणे, पै मध्ये करणारे क्षुद्र मनोवृत्तीचे लोक. टिळक, राजवाडे, यांच्यासारखे जागतिक विद्वानांच्या मांडीला हक्काने मांडी लावून बसणारे महाराष्ट्रीय विद्वान शिकण्यासाठी कधीच परदेशी गेले नव्हते, हे पहिल्या जातीचे हे लोक विसरतात; आणि आपण रहातो हे जग कितीही खर्च करून पाहिले तरी कमीच, इतके सुंदर आहे, हे दुसऱ्या जातीच्या लोकांच्या गावीही नाही.

या प्रवासाने मला दोन धडे शिकवले. एक, पृथ्वी वाटोळी आहे. आणि दोन, माणुसकी सर्वत्र सारखीच आहे ! लहानपणापासून क्रमिक पुस्तकात ज्या सामान्य गोष्टी आपण वाचतो त्या शिकण्याकरता दहाबारा हजार मैलांचा प्रवास आणि कित्येक हजार रुपये खर्च मला करावा लागला, हे वाचून पुष्कळांना हसू कोसळेल. पण हसण्यासारखे त्यात काहीच नाही. क्रमिक पुस्तकांच्या कागदावर मरून पडलेली आणि त्यामुळे सामान्य वाटणारी ही सत्ये प्रत्यक्ष अनुभवाने एकदम जिवंत होतात आणि भलतेच जगड्व्याळ स्वरूप धारण करतात. म्हणूनच या अनुभवांकरता करावा लागणारा खर्च आणि परिश्रम काहीच नव्हेत असे मला वाटते. मुंबईहून मी निघालो, आणि जगातली अनेक सुंदर शहरे पाहिल्यानंतर मुंबईच मला अधिक सुंदर वाटली; आणि मी मुंबईलाच उत्कंठित अंत:करणाने परत आलो. मुंबईहून निघालेला माणूस शेवटी मुंबईलाच परत येतो, तेव्हा पृथ्वी वाटोळी नाही का ?

आपले हिंदी लोक आपल्यासारखेच काळे, गरीब आणि म्हणून भले आहेत; जगातल्या इतर लोकांच्या भलेपणाबद्दल काय सांगावे, असे साहजिकच मला वाटे. पण आता पोलंड म्हटले, की उभ्याआडव्या रेघांचा नुसता नकाशा डोळ्यासमोर उभा रहात नाही; वार्सा बर्लिन एक्सप्रेसमध्ये मध्यरात्री मोठ्या सौजन्यपूर्वक मला झोपायला जागा करून देणारा तो मध्यमवयस्क पोल गृहस्थ माझ्या डोळ्यांसमोर उभा राहतो. अमेरिकेचे नाव निघाले, की बाल्टिक समुद्रात ' तुम्ही उष्ण देशातले आहात, तुम्हाला ही थंडी सहन होणार नाही ' म्हणून आपल्या अंगातले लेदर जॅकेट माझ्या अंगावर चढवणाऱ्या अमेरिकन मुलीची कृतज्ञतेने आठवण होते. आणि बर्लिनविषयी कुणी बोलू लागला की क्रूरकर्मी हिटलर आणि

त्याचे उग्र चेहऱ्यांचे जर्मन साथीदार डोळ्यांपुढे येत नाहीत, तर कॅफे कॉशविट्झमध्ये माझ्याजवळ उभा राहून आस्थापूर्वक मला खाण्यापिण्याचा आग्रह करणारा हर डायेट्रिच् मला दिसतो. हा दुसरा धडाही कमी मोलाचा आहे असे मला वाटत नाही. प्रवासाचे आणखी 'नफेतोटे' सांगता येत नाहीत. पण उत्तर किंवा दक्षिण ध्रुवाकडल्या बर्फमय प्रदेशात कसलीही विद्या मिळण्यासारखी नसली, किंवा पगारवाढ देणारी कुठलीही पदवी घेणे शक्य नसले, तरी शक्य असेल तेव्हा केवळ तो रम्योदात्त देखावा पाहण्याकरता म्हणून तिथेही जाण्याची मला अजून बलवत्तर इच्छा आहे.

●

# हिमालयातील प्रवास

। काका कालेलकर

लक्ष्मणझूल्यापर्यंत आम्ही सुधारलेल्या जगात होतो. झूला ओलांडला, उजव्या बाजूचा स्वर्गाश्रमाकडचा रस्ता टाकला, आणि आम्ही वनात प्रवेश केला. येथून रस्ता खूप वरखाली होऊ लागला. जंगलातील कित्येक जनावरे जशी भीती न बाळगता काही काही वेळेला जवळ येतात, तशी झाडे आणि वेल पुष्कळ जवळ जवळ येऊ लागले, आणि आम्हालाही वाटले की आपण आता आरण्यक आहो. यानंतर झंपानात बसणारे लोक आजूबाजूच्या दृश्याहून निराळे आणि चमत्कारिक दिसू लागले. झंपान ही एक प्रकारची पालखी असते. ती उचलणारे भोई चौरस आकारात चालत नाहीत, तर एकामागून एक असे चौघेजण रांगेने चालतात; कारण अरुंद

रस्त्याच्या अवघड पायवाटेवरून जायचे असेल, तेव्हा दोघेजण शेजारी शेजारी उभेच राहू शकणार नाहीत. एका बाजूला असलेल्या उंच पहाडाशी टक्कर झाली तर चारी भोई, त्यांचे ते झंपान, आणि झंपानात बसलेले जिवंत ओझे सर्वच दुसऱ्या बाजूच्या खोल दरीत पडून स्वर्गाला जायचे !

करंडीत बसणारे लोक इतके बेडौल वाटत नाहीत. पाणी प्यायच्या उभट पेल्याच्या आकाराच्या, जंगली वेताच्या एका मोठ्या करंडीत आपले सामान अर्ध्यापर्यंत भरून यात्रेकरू त्यावर बसतो. पाय बाहेर सोडता यावेत एवढ्यासाठी करंडीच्या वरच्या काठाला काप ठेवलेले असतात; आणि खाली लटकून पाय थकून जाऊ नयेत म्हणून त्या करंडीला एक कामचलाऊ पावटणे बांधलेले असते. एक मजूर अशी करंडी आपल्या पाठीवर खांद्याशी बांधून टाकतो; म्हणजे जाकीट घातल्यावर हात सुटे राहातात तसे मजुराचे हात सुटे राहतात. करंडीचा बोजा एकट्या खांद्यांनाच उचलावा लागू नये यासाठी तिचा एक पट्टा मजुराच्या डोक्यावरून घेतलेला असतो, आणि मजूर चालत नसेल तेव्हा खांद्याला आणि डोक्याला आराम मिळावा यासाठी T च्या आकाराची–कुबडीच्या आकाराची काठी तो बरोबर बाळगतो. करंडीच्या बुडाला ती कुबडी ठेवून दिली की झाला मजूर बोजातून मोकळा. अशा रीतीने एका मजुराच्या डोक्यावरून एक माणूस जान आणि माल यासह जातो ! त्याचे तोंड मात्र मागच्या बाजूला ! सुरवातीला हे सर्व रूप हसण्याजोगे, पण पाहून पाहून सवय झाल्यावर या मुलखात हेच योग्य आहे, अशी खात्री पटते. मुक्कामावर मजूर लोक परस्परात बोलतात तेव्हा आपण किती मणाची ‘लाश’ (प्रेत) उचलतो आहो, याचा उल्लेख केल्याशिवाय राहात

नाहीत. आपल्या मजुराने आपल्याविषयी आपल्या देखत 'लाश' शब्दाचा उपयोग केला नाही म्हणजे इकडील मर्यादा सांभाळली, असा इकडचा कायदा आहे. यात्रेकरूंच्या भर सीझनच्या सुरवातीलाच आम्ही निघालो होतो, यामुळे रस्ते विजन असे नव्हतेच. मुंग्यांच्या रांगेप्रमाणे आम्ही लोक होतो.


* * *

आम्ही जेवून उठलो आणि विसावा न घेता पुढे चाललो. एकदोन दिवसांच्या अनुभवाने आम्हाला चट्टीत उशीरा पोचून चालणार नाही, असे दिसून आले होते. ज्याप्रमाणे स्टीमरमध्ये हजीर तो वजीर, जेवढी जागा अडवून ठेवावी तेवढी त्याची, त्याचप्रमाणे या चट्टीच्या बाबतीतही असते. चट्टी म्हणजे काय ? यात्रेकरूंच्यासाठी जंगलातल्या दुकानदारांनी बांधलेली कामचलाऊ दुकाने. येथे जमिनीची ओल गेलेली नसायची. भिंती उंच असायला पाहिजेत असा येथे कायदा नाही; छपरावर गवत किंवा झाडाची पाने; आणि ही सर्व कारागिरी पब्लिक वर्क्स डिपार्टमेंटची नसल्यामुळे पहाडात जशी जागा मिळेल तसा दुकानाचा आकार ! अशा तऱ्हेचे स्थापत्य शहरी डोळ्यांना सुरवातीला आवडणार नाही कदाचित, पण जंगलाच्या संपूर्ण शोभेत मिसळून जायला याच्यापेक्षा वेगळी पद्धती नाहीच कामाची.

घरात एका कोपऱ्यात दुकानदार आपला माल व्यवस्थित लावून ठेवतो. माल म्हणजे काय काय असेल ? गव्हाचे पीठ, मीठ, मिरची, तूप, बटाटे, आणि दुकान मोठे असले तर डाळ, तांदूळ. दुकान लहान असो, मोठे असो, त्यात तंबाखू असायचीच. पण ती आपल्याइकडे असते तसली नव्हे. हिमालयात तंबाखू



पिकतच नाही; त्यामुळे गुळात तयार केलेली गुडाखू सर्वत्र विकली जाते. दुसऱ्या एका पोत्यात स्वैपाकाची भांडी असतात; यात्रेकरूंची त्यायोगे फार मोठी सोय होते. यात्रेकरूंनी आपापली भांडी डोक्यावर घेऊन यात्रा करायची म्हटले, तर माणसापेक्षा भांड्यांचेच पुण्य वाढायचे आणि या पुण्याईच्या भाराखाली यात्रेकरू अकाली स्वर्ग गाठावयाचा !



हिमालयातील शेतकऱ्याच्या स्वैपाकात अजब स्वावलंबन असते. त्याच्याजवळ बोहऱ्याच्या टोपीसारखी एक मोठी लोखंडाची तपेली किंवा तसराळे असते. त्यात तो कणीक बांधतो आणि दगडावर ठेवून देतो. मग तीन धोंडयांच्या चुलीत विस्तव पेटवून तिच्यावर त्याच तसराळ्यात रोटया भाजून घेतो; या साऱ्या रोटया हातरुमालावर ठेवून पुनः त्याच तसराळ्यात भाजी करून घेतो;

तसराळे लोखंडाचे असते त्यामुळे भाजी कसलीही असली तरी ती आपली एकाच रंगाची होते ! आता आणखी काय पाहिजे ! भाजीरोटी पोटभर खाऊन तसराळे घासले की पाणी प्यायलाही तेच भांडे ! जेवून दुपारी जरा वामकुक्षी केली, की तेच तसराळे डोक्यावर ठेवून त्यावर फेटयासारखे तो काहीतरी बांधतो, म्हणजे आंब्याच्या कोयीसारख्या गारा जरी आकाशातून पडल्या तरी आपले शिरसलामत ! इतकी सूचक बुद्धी आणि युक्ती यांच्यात असूनसुद्धा शहरी लोक म्हणतात की पहाडी लोक म्हणजे जंगली ! होय, ते जंगली आहेतच ! जंगलात राहतात ते पंगू नसतात, आणि पंगूपणा हा तर सुधारणेचा पाया–नव्हे, शिखर सुद्धा ! असंख्य साधनांवाचून ज्याचे काम चालू शकत नाही तो सुधारलेला, आणि कमीत कमी साधनांनी काम चालविण्याची अक्कल ज्याच्यात आहे तो जंगली, ही व्याख्या खरीच नाही काय ?

* * *

जंगलात पहाण्याजोगे पुष्कळ असते. तऱ्हतऱ्हेचे वृक्ष आणि पाने, लहानमोठया टेकडयांची व्यूहरचना, आणि उंचउंच शिखरांची चढाओढ–पण या सर्वांपेक्षा माझे लक्ष झाडांच्या खोडांकडेच अधिक जाते. लहानपणापासून मला झाडांची खोडे पाहून विश्वामित्रादी ऋषींचे स्मरण होते. तालीमबाज बैरागी मलखांबाची कसरत करीत असावे आणि त्यांच्या पायांना अनेक प्रकारे पीळ पडावा तशा झाडांच्या डहाळ्या पाहून मला फार आश्चर्य वाटते. खोड आणि फांदी यांचा आकार, त्यांची साल आणि त्यांचा रंग पाहून प्रत्येक झाडाच्या स्वभावाची मी कल्पना करू शकतो. कित्येक झाडे जणू स्वतःच्या बाबतीतच कठोर होण्यात जीवनाचे सार्थक झालेसे

मानतात. कित्येक झाडे खाऊनपिऊन सुखी अशा बैठ्या लोकां-सारखी हृष्टपुष्ट असतात. कित्येक अगदी वाकलेल्या फांद्या असलेली झाडे मराठा इतिहासातील राजारामाच्या वेळच्या वीरांप्रमाणे विपत्तीशी असहायतेने पण अविचलपणे झुंझत असावी असे वाटते. तर कित्येक सगळ्या वनाचा इतिहास शक्य तितका सांभाळण्याचे, साठविण्याचे काम करीत असल्यासारखी दिसतात. कित्येक झाडांची त्वचा इतकी कोमल असते की, शकुंतलेला तपश्चर्या करताना पाहून दुष्यंत जसा अस्वस्थ झाला होता, तसे आपले मन अस्वस्थ होते; आणि कित्येक झाडांच्या ढोली जणू काय मधमाशांना किंवा पोपटांसारख्या पक्ष्यांना आश्रय देण्यासाठी आपले हृदय चिरून उघडे करीत असल्यासारख्या वाटतात ! झाडांची खरी शोभा पहावयाची असेल तर पाऊस पडल्यानंतर ऊन पडले म्हणजे किंवा पक्ष्यांच्या झुंडीच्या झुंडी झाडांवर फुलांप्रमाणे गजबजतात त्यावेळी पाहून घ्यावी. चीड झाडाच्या खोडात दोरीच्या पिळासारख्या रेषा असतात आणि त्यामुळे या खोडाला मजबूत बनविण्याला निसर्गाने काही विशेष मेहनत घेतली असावी असा भास होतो.

अशाच तऱ्हेची सर्व सुंदरता पहात पहात मी उतरत होतो; इतक्यात वरून खाली नजर गेली आणि यमुनेचे दर्शन झाले. यमुनेला ओळखावयाला वेळ लागला नाही. हं, हीच ती काळी कालिंदी; जिच्या पाण्यात मी प्रयाग येथे स्नान केले होते, जिची कासवे वृंदावनात वानरांबरोबर लढताना मी पाहिली होती, जिच्या आरशात ताजमहालचे प्रतिबिंब पाहून मी आश्चर्यचकित झालो होतो, आणि जिच्या नावाशी कालियामर्दनातील चित्रे मी लहान-पणापासून जोडली होती. आम्ही जेव्हा पहाड उतरून जवळ गेलो, तेव्हा तिचे निर्मळ पाणी अनेक रंगांनी दर्शन देत होते.

घटकेत ते निळ्या-काळ्या शाईसारखे दिसते, घटकेत खडकाला थडकते तेव्हा मोरचुदाच्या रंगाचे बनते, लाटा खडकावर फुटून हसू लागतात तेव्हा ते पांढरे सफेत होते, आणि तरीही फिरून नील-गंभीर होण्यास त्याला वेळ लागत नाही. निर्मळ पाण्याच्या या लाडिकपणाच्या खेळाने तपोवृद्ध आणि महाकाय खडकांना धन्यधन्य वाटत असावेसे वाटते. पाणी आपल्या एक प्रकारच्या मस्तीत नाचत होते, तर खडक दुसऱ्या प्रकारच्या मस्तीत मग्न होते. त्यांच्या मनात काय चालत असेल ? माझ्या मनात काय चालले आहे याची त्यांना जाणीव असेल काय ? थोडीशी पांढरी रेती तुडवून आम्ही यमुनेच्या तटावर जाऊन बसलो. काही पहाडी मुली तेथून आमच्या जवळून गेल्या. आम्ही तेथे बसून काय पहात आहो, याचे त्यांना आश्चर्य वाटले. आमची दृष्टी जेथे पडे त्या ठिकाणी विशेष काय आहे हे त्या पाहू लागल्या; आणि 'इथे तर विशेष काहीच दिसत नाही' अशा नजरेने त्या चालत्या झाल्या. माझ्या मनात काय चालले आहे हे त्यांना कसे समजणार ? त्या स्थानाला गंगाणी म्हणतात.

*　　　*　　　*

समोर पर्वताचे एक मोठे शिखर अनंत कालापासून बर्फ पांघरून निजले होते आणि त्याच्यावर चंद्राचा शीतल प्रकाश सोन्याने मढविल्यासारखा चमकत होता. मध्यरात्रीच्या ना शेंडा ना बुडखा अशा माझ्या कल्पनेला त्या पहाडात महादेवाचे मस्तक दिसले ! ते विशाल कपाळ, त्याच्या तळाशी दोन डोळ्यांसारख्या त्या दोन दऱ्या, आणि मधले ते चपटे नाक, आणि त्याच्या खाली तोंडाशी एकरूप झालेली विचित्र दिसणारी ती हनुवटी, आणि दोन कान जणू काय रुसूनच दूरदूर बसले असावेत, आणि

महादेवाचे ते मस्तक ताठ राहण्याऐवजी थकून आराम घेण्यासाठी मागे ढळले असावे असे दिसत होते. आसपासची थंडी तर मार्शल लॉ प्रमाणे देवळाच्या आत जाण्यास फर्मावीत होती; तरीसुद्धा त्या पहाडाचे ते विशाल दृश्य काही केल्या पाय उचलू देत नव्हते. ज्या वेळी चहूबाजूंना पाणी थिजून बर्फच होऊन गेले होते, त्या वेळी काव्यतृषित कल्पना हे समोरचे दृश्य पीतच राहिली होती.

* * *

पहाडाच्या भयानक भूमीत प्रत्येक नदीला दोहो बाजूंना रखवालदार पहाड असतातच; पण यमुनानदीने जम्नोत्रीच्या आसपास जशा रखवालदारांची सोबत साधली आहे, तसे पहाड क्वचितच दुसऱ्या कोणा नदीच्या नशीबी आले असतील. हिमालयाच्या असंख्य भव्य दृश्यात जम्नोत्रीकडील दृश्य तिच्या शैत्य-पावनत्वाने आणि भीषण गांभीर्याने वेगळेच पडते. त्याचे वर्णन 'यमुनाराणी' नावाच्या एका लेखात मी थोडेसे दिले आहे. ज्या दृश्याने हृदयातील कोनाकोपरा हादरून टाकला आहे, त्याचे वर्णन एकवार केल्यानंतर तेच पुनः दुसऱ्या प्रकारे करणे आपल्याला आवडत नाही; आणि तीच ती वस्तू त्याच त्या रीतीने अनेक वेळा सांगत बसणे वाजवीही नाही.

पण या शीत प्रदेशात कालिंदीच्या काठी बसणाऱ्या असित ऋषींचे पुनः पुनः स्मरण झाल्याशिवाय रहात नाही. चहूबाजूंच्या पांढऱ्या शुभ्र बर्फाच्या पर्वतात हे असित ऋषी कसे शोभत असतील बरे ! ज्यांच्या जीवनभेदी कल्पना वाढीस लावण्यासाठी जम्नोत्रीहून उतरते स्थान उपयोगी पडले नाही त्या ऋषींची साधना किती उग्र असेल ! येथे राहिल्या राहिल्या त्या ऋषींनी भूत

आणि भविष्यकाळाच्या इतिहासातील किती युगांवर नजर फेकली असेल ! मानवकल्याणाचे अनेक संकल्प त्यांनी येथे केले असतील. त्यांचाच संस्कार आजच्या आपल्या राष्ट्रीय प्रकृतीवर सूक्ष्म रूपाने झाला असला, तरी आपल्याला ते कसे कळणार ? इथली गरम कुंडे पाहून त्या ऋषींनी हे स्थान पसंत केले असावे असे समजण्यापेक्षा त्यांनी येथे निवास करावयाचे ठरविल्यानंतर त्यांच्या संकल्पबळाच्या योगाने विवश होऊन निसर्गाने येथे उष्ण झरे आपले निःश्वास म्हणून पाठविले असावेत, असे मानण्याकडे माझे मन अधिक झुकते. इथल्या पाण्याला गंधकाचा गंधही नाही. एकादे मोठे एंजिन चालत असावे तसे त्यांचे सूक्-सूक्-सूक असे गायन एकसारखे चालत राहते.

*　　　*　　　*

उपरीकोटच्या चढणीच्या सुरवातीलाच पाय घसरायला लागले. काही काही ठिकाणी, मनुष्य मूळचा चार पायांचा पशू आहे, याचा पुरावा द्यावा लागला ! ओल्या जमिनीतून बाहेर पडलेल्या मुळ्यांना पकडीत पकडीत आम्ही वर चढू शकलो. आजची चढण कठीण आहे हे लक्षात घेऊन बुवांनी आम्हाला सकाळी नास्ता ( न्याहारी ) चांगलाच दिला होता. तो खाऊन आम्ही चालू लागलो होतो. चालू लागलो म्हणण्यापेक्षा रागावलेल्या रुसक्या पहाडाशी अनुनय करू लागलो असे म्हणणेच अधिक बरोबर होईल. आम्ही थोडेसे पुढे गेलो आणि रिवाजाप्रमाणे आमचे कुली मागे राहिले. वर कुठेही मनुष्यवस्तीचे नाव की निशाण नाही. काही काही ठिकाणी अशी काही सुंदर फुले फुलली होती, की जवळच कुठेतरी एकाद्या ऋषीचा आश्रम असला पाहिजे अशी अपेक्षा मनात उत्पन्न होई. नुसते जंगल असले तर

एकाच जातीची फुले चहू बाजूंना दिसतील. पण येथे तर तऱ्हे-तऱ्हेच्या फुलांचे गुच्छ बनवावेत तशी रोपेच उगवलेली दृष्टीस पडत होती. इथल्या निसर्गात उधळेपणाबरोबर खेळकरपणाही असेल असे कुणाला वाटेल तरी का ? मैलच्या मैल चालले तरी मनुष्यवस्तीचे काय, एकाद्या माणसाचेही दर्शन व्हायचे नाही. आम्हा तिघात रस्ता चुकण्याची कला एकट्या बुवांनीच साध्य केली होती ! आम्हाला वाट अचूक सापडायची, तर बुवा अचूक आडवाटेने जाऊन कुठेतरी भटकायचे ! जंगलातून जातानासुद्धा कोपर किंवा गुडघा झाडाला त्यांचाच थडकायचा !

शेवटी उपरीकोटच्या शिखरावर पोचलो. जिकडे पहावे तिकडे बर्फच बर्फ. पाणी नसल्यामुळे हे बर्फ फोडून थोडथोडे आम्ही खात असू. गुलकंदात जशी साखरेची कणी असावी, तशी या पहाडी बर्फात बर्फाची कणी असते. बर्फ खाण्यात मजा खूप वाटते, पण तहान भागविण्याचे काम ते करीत नाही.

एवढी जबरदस्त चढण चढल्यानंतर भूक लागली तर भुकेचा काय बरे दोष ? पण खाण्याची काय व्यवस्था ? पर्वताच्या शिखरावरून वाटेल त्या दिशेला नजर फिरविली तरी बादरू किंव कैरासिंग दृष्टीला पडेचनात. माझा धीर सुटला. मी कुली कोठे असतील, कोठे गेले असतील, घसरून कोठे पडलेबिडले तर नसतील, अशी चर्चा सुरू केली. ते पळून गेले असतील अशी मात्र शंकासुद्धा आम्हा कोणाला आली नाही. पहाडी लोकांचा स्वभाव पळून जाण्याचा नसतो आणि सरकारी अंमलदारापुढे जर करार नोंदला असेल, तर कोणी पळून जाण्याची हिंमतही करायचा नाही. या लोकांवर सरकारी अंमल जवळजवळ गुलामासारखा आहे. शिखरावर एक मोठी शिळा थोडी कलती झालेली आहे,

पाऊस आला तर तिच्या बगलेखाली थोडा आसरा मिळू शकतो. इकडील लोक याला गुंफा म्हणतात. पडायला झालेली भिंत जरा कलती असेल, तर तिला आपण गुंफा म्हणू काय? पण या पहाडावर आकाशातील तोफखान्यापासून बचाव करण्याची आशा धरता येण्याजोगी ही एवढीच एक गुंफा आहे.

या प्रदेशामध्ये या ऋतूत ढगांचा कार्यक्रम मोठा नियमित असतो. रात्री जिकडेतिकडे दऱ्याखोऱ्यात ढग निजलेले असतात. आठ नऊ वाजता जांभया देत ते उठतात. हळूहळू घसरत घसरत (पण घसरून ते खाली न जाता वर जातात तेव्हा त्यांना उंचावत म्हटले पाहिजे, नाही का?) दरीच्या वरच्या टोकाला पोचतात. मग उडावे की नाही याची पुष्कळ वेळ भवती-न-भवती मनात करून शेवटी पंख फडफडण्याचा आवाज न करताच उत्तरेकडे चालते होतात. सगळेच उत्तरेकडे जातात, जणू काय सैन्य एकत्र करण्याचा 'समय' तिकडेच ठरला आहे. तेथे सर्वजण मिळून रणनीतीची मंत्रणा जवळ जवळ तीन वाजेपर्यंत चालवितात. तीन सव्वातीन व्हायला आले की झाली त्यांची दक्षिणेकडील स्वारी सुरू! जेथे जरूर वाटेल तेथे मधून मधून थोडे थोडे ढग तुटून पडून खालच्या सृष्टीला चीत करतात. वरचे ढग जीत झाली या आनंदात पुढे जातात. उपरीकोटसारख्या मोठ्या पहाडावर लहान लहान गारा पडून कसे चालेल? तेथे तर लिंबाएवढ्या आणि आंब्याएवढ्या मोठ्या गारांचाच तोफखाना चालला पाहिजे! इकडचे लोक त्यांना 'ओले' म्हणतात. त्यांचे नाव ऐकताच स्थानिक पहाडी मनुष्य सुद्धा थरथर कापायला लागतो; कारण गारांचा एक जरी गोटा कान-शिलावर बसला तरी माणूस तेथल्या तेथेच कायमचा बसायचा. आमच्या छत्र्या आम्ही कुलींच्याजवळ देऊन ठेवीत होतो. सारा

दिवस भिजायचे ही इष्टापत्तीच होती. चालून चालून अंगात उष्णता आली असेल तर ती थोडीतरी कमी झाली पाहिजे ना ? चालल्यानंतर पोट भरून खाईल तो आजारी कसला पडतो ? रातवासासाठी पथारीतले कपडे मात्र कोरडे असले पाहिजेत, नाही तर शेकोटीला शरण जायला लागायचे.

पण या पहाडावर कुली तरी छत्री उघडण्याची हिंमत कशी करणार ? छत्रीची चाळण थोडीच करायची आहे ? गुंफेजवळ आम्ही पोचलो व डोळे ताणून ताणून चहूबाजूंना पाहिले. आमची चर्चा संपली, पण आमच्या कुलींना काही आमची दया आली नाही. एकजणही दर्शन देईना ! तीन तर वाजायला आले होते; इतक्यात लांबून कित्येक यात्रेकरू येत असलेले दिसले. थोड्याच वेळात ते जवळ आले. परमेश्वर भेटल्यासारखा आम्हाला आनंद झाला. आमची अडचण पाहून त्या गरीब लोकांनी आम्हाला पीठ, मीठ, तवा, लाकडे वगैरे थोडथोडेसे सामान दिले आणि सांगितले, "स्वैपाकात फार वेळ लावू नका हं. आता 'ओले' पडतील. आमची येथे थांबण्याची हिंमत नाही. आमची भांडीकुंडी खालच्या गावात आम्हाला पोचती केली तरी चालेल." आमचे उत्तर ऐकण्यापुरतेसुद्धा ते थांबले नाहीत. बुवांनी रोटले तयार केले. मी की स्वामींनी बर्फ कुटून पाणी तयार केले. मिठाच्या सहाय्याने अथवा खरे म्हटले तर लांडग्यासारख्या भुकेच्या मदतीने रोटले घशाखाली ढकलले आणि आम्हीही पहाड उतरू लागलो. आम्हाला उशीर झाला होता. तेव्हा आम्हाला जलद जावे लागले. पहाड उतरायच्या वेळेला आम्ही त्रिपाद होत असू हे मी सांगितलेच आहे. शरीराचा एक पाय गळून पडला तरी चालेल, पण हातातली

काठी मोडली किंवा विसरली तर तेथे चालायचे नाही. खालच्या गावाच्याजवळ आम्ही पोचतो न पोचतो तोच आमचे हितकर्ते यात्रेकरू आम्हाला भेटले. आमची गती बघून ते चकितच झाले. एकाने सांगितले की त्यांच्यापैकी एक म्हातारी पाय घसरून पडली, अशी काही गडगडत गेली की, सर्वांनी तिची आशा सोडून दिली होती; पण सुदैवाने खालच्या बाजूला एक यात्रेकरू उभा होता त्याची नजर गेली आणि त्याने आपली लांब काठी म्हातारीच्या अवतरणाच्या आड घातली. संध्याकाळभर सर्वांमध्ये हाच एक गप्पांचा विषय झाला.


# कमलपत्रे

## ना. सी. फडके

'दल' सरोवराचे दोन भाग आहेत. त्यांपैकी एकाला 'बडा दल' म्हणतात व दुसऱ्याला 'छोटा दल' असं नाव आहे. ही नावं अर्थातच विस्तारदर्शक आहेत. आमचा 'शिकारा' जेव्हा कालव्यातून बाहेर पडून पाण्याच्या विस्तीर्ण डोहात शिरल्याचं मला दिसलं तेव्हा मी वल्ही पाण्यात मारण्यात गुंतलेल्या आहादूला विचारलं, "आपण आता 'दल' मध्ये येऊन दाखल झालो, नव्हे?" तो म्हणाला, "हां हुजूर, पण हा छोटा दल आहे; थोड्या वेळाने आपण बडा दलामध्ये जाऊ." मी आजूबाजूस पाहू लागलो तो त्या छोट्या समजल्या जाणाऱ्या सरोवराचा विस्तार केवढा तरी वाटला. जिकडे तिकडे पाणीच पाणी दिसत होतं, दूर अंतरावरच्या किनाऱ्यावर मोठमोठी झाडं होती. उजव्या बाजूस आणि समोर पर्वतांची

बर्फानं आच्छादलेली शिखरं दिसत होती. सूर्यप्रकाशानं आता साऱ्या दिशा चांगल्याच उजळल्या होत्या. सरोवराच्या काळ्याभोर पाण्यात पर्वतांची प्रतिबिंबं स्पष्ट दिसत होती. सरोवरात ठिकठिकाणी वेताच्या झाडांचे गुच्छच्या गुच्छ अर्धं अंग पाण्यावर काढून उभे राहिलेले होते, त्यांच्या फांद्यांवरची लांबट मऊ हिरव्या रंगाची नवी पालवी वाऱ्यावर सळसळत होती. वेताच्या झाडाला इकडे 'वंश' म्हणतात. सामान्य लोकांच्या तोंडी 'बास' असा अपभ्रंश रूढ आहे. 'बासरी' हा शब्द 'बास' या शब्दावरूनच तयार झाला असला पाहिजे असं माझ्या मनात आलं.

आता आमचा 'शिकारा' संथ जलपृष्ठावरून खूपच वेगानं चालला होता. 'बडा दल'मध्ये आम्ही दाखल झाल्यावर भोवतालच्या जलविस्ताराकडे पाहून मी आहादूला प्रश्न केला, "काश्मीरमधलं हे सर्वांत मोठं सरोवर का रे?" तो म्हणाला, "छे! छे! हुजूर, आपण सोपूरला जाऊन तेथला 'वूलर' तलाव बघा. तो तलाव म्हणजे दर्याच वाटेल आपल्याला." मी म्हटलं, "होय का? मी जाणारच आहे सोपूरला." काश्मीरच्या नॅशनल कॉन्फरन्सचं सोपूर येथील अधिवेशन म्हणजे काश्मीरच्या स्वातंत्र्यसंग्रामाचा एक महत्त्वाचा टप्पा म्हणावा लागेल. कादंबरी लिहिण्याच्या दृष्टीनं सोपूर हे गाव प्रत्यक्ष जाऊन पहाणं मला आवश्यक होतं. सोपूर गावाविषयी मी आहादूला काही प्रश्न विचारू लागलो तेव्हा त्यांची उत्तरं देता देता मध्येच त्यानं मला विचारलं, "हुजूर आपण कुठून आलात?" "कोल्हापूरहून" असं सांगितलं तर त्याला कळण्यासारखं नव्हतं म्हणून मी म्हटलं, 'मुंबईहून'. ते ऐकून तो सांगू लागला, "पाकिस्तानशी लढाई सुरू झाल्यापासून काश्मीरला पाहुणे येईनासे



झाले आहेत. पण पूर्वी मुंबईचे फार लोक इकडे येत असत, आणि तेव्हा आमच्या धंद्याला अशी तेजी होती की रात्रंदिवस आम्हास फुरसत नसे. वल्हवून वल्हवून खांदे दुखायला लागायचे. पण पैशाचा लोभ माणसाकडून काय करून घेत नाही, हुजूर ? दिवसाकाठी पाच पंचवीस रुपये सहज मिळून जायचे आम्हाला. आणि आता एकाद‌दुसरा देखील मिळत नाही. फार खराब दिवस आले, हुजूर. पाकिस्तानचं हे युद्ध संपायचं कसं ?'' त्याच्याशी आंतर्राष्ट्रीय राजकारणाची चर्चा करण्याची माझी फारशी इच्छा नव्हती. त्याच्या बहुश्रुतपणाचं मला फार कौतुक वाटलं.

आहादूशी गप्पा मारता मारता मी सभोवारच्या रमणीय दृश्याकडे पहातच होतो. माझ्या लक्षात आलं की बडया दलचा विस्तार ओलांडून 'शिकारा' आता पुन्हा एखाद्या मोठ्या कालव्या-प्रमाणे दिसणाऱ्या प्रवाहातून जात होता. माझी समजूत होती की मी या सफरीवर फारच लवकर निघालो; आणि 'शालिमार' बागेवर पोचेपर्यंत रविवारची मजा करावयास आलेले इतर लोक मला फारसे भेटणार नाहीत. 'छोटा दल' ओलांडीपर्यंत माझी कल्पना खरी ठरलीही होती. परंतु आता पाहतो तो कितीतरी शिकारे 'शालीमार' बागेकडे चाललेले दिसू लागले. कुठून आणि केव्हा आले ते मला कळलंही नव्हतं. आपल्याला नकळत पक्ष्यांचा थवा गोळा झालेला दिसावा तद्वत् शिकारे प्रगट झाल्यासारखं मला वाटलं. शिकाऱ्यांप्रमाणेच काही 'हाऊस-बोटी' ही बागेकडे चालल्या होत्या. काही नौकातून कुटुंबवत्सल माणसं आपल्या बायका-मुलांना घेऊन निघाली होती. काहीत फक्त पुरुषच होते, आणि बायका-मुलांच्या सान्निध्यात ठेवावा लागणारा संकोच ठेवण्याची त्यांना गरज नसल्यामुळे एकीकडे पत्ते खेळता खेळता त्यांच्या गप्पागोष्टी, गाणी आणि भांडणं उंच आवाजात चालू होती. कित्येक नावात फोनोग्राफ लागले होते; आणि प्रत्येक नावेत मागच्या आडोशाच्या बाजूस शेगडया पेटल्या होत्या आणि खाना तयार होत होता. एखाद दुसऱ्या शिकाऱ्यात नोकर उंच सुरई-सारख्या एका भांडयातून चिनीमातीच्या बसकट पेल्यात चहा ओतून देताना मला आढळत होता. त्या चमत्कारिक भांडयाकडे मी दृष्टी लावल्याचं आहादूच्या लक्षात आलं असावं, कारण त्यानं मला विचारलं, "हुजूर, चहा घेणार काय?" मी त्याला विचारलं, "तू कुठला चहा देणार मला?" तो म्हणाला, "ते का हुजूर,

आपल्याजवळ सारी तयारी आहे. पहा ना." मी पाहिलं तो खरोखरच शिकाऱ्याच्या मागच्या टोकाला एक मोठी सुरई घेऊन आहादूचा छोटा गोरापान मुलगा निखारे फुलवीत बसला होता. सुरईसारख्या त्या भांड्याला 'समूवार' म्हणतात असं मला आहादूनं सांगितलं. रशियन साहित्यात हा शब्द मी वारंवार वाचला होता त्याची मला आठवण झाली. 'समूवार' म्हणजे पंचधातूचं एक सुरईसारखं भांडं असतं. आपल्याकडे आंघोळीच्या पाण्याच्या बंबांना ज्याप्रमाणे विस्तव घालण्यासाठी मधोमध पोकळ नळी असते त्याप्रमाणे या समूवारालाही मध्यभागी पोकळ जागा असते. तिच्यात कोळसे घालायचे, पंखा मारून फुलवायचे आणि चहाची पत्ती टाकून पाणी उकळत ठेवायचं. या पाण्यात चवीसाठी मीठ टाकलेलं असतं. साखर वापरीत नाहीत. त्याला म्हणायचं नमकीन चहा. आहादूच्या मुलानं तयार केलेला हा नमकीन चहा पसरट पेल्यातून घेता घेता मी आहादूला विचारलं, "समूवार हे भांडं काश्मीरमध्ये कसं आलं? याचा विशेष प्रचार तर रशियात आहे!" त्याच्यासारख्या एका साध्या नावाड्याला या प्रश्नाचं उत्तर देता येईल अशी माझी कल्पना नव्हती. परंतु मला वाटतं ज्या ठिकाणी बाहेरगावचे मुशाफर पाहुणे मोठ्या संख्येनं नेहमी येतात तिथले सामान्य लोक मुशाफरांच्या कुतूहलाचं समाधान करण्याची जबाबदारी पार पाडून आपोआप विद्वान होतात. परप्रांतातल्या प्रवासात या गोष्टीचा अनुभव आला. समूवारबद्दलचा माझा प्रश्न त्यानं टाळला नाही. अगदी हजरजबाबीपणा दाखवून त्यानं मला सांगितलं, की फार जुन्या काळी काश्मीरचा अमुक अमुक राजा चीनमध्ये व तेथून पुढे रूस देशात गेला होता, त्यानं हे समूवार भांडं आपल्याबरोबर

आणलं आणि तसली भांडी इथल्या कारागिरांकडून घडविण्याचा प्रघात पाडला.

लवकरच आम्ही शालीमार बागेवर येऊन पोचलो. आहादूनं शिकारा काठाला लावला आणि माझ्याबरोबर तो आणि त्याचा मुलगाही खाली उतरला. बागेपुढच्या पटांगणात घाणेरड्या मिठाईची दुकानं दिसली आणि ताज्या भाज्या आणि सफरचंदं यांचे मोठमोठे हारे घेऊन बसलेल्या अस्सल काश्मिरी वेषातल्या सुंदर खेडूत बायकाही दिसल्या. पटांगणात जिकडे तिकडे केरकचरा साठलेला होता. एखाद्या मोठ्या गावातल्या पाटलाच्या घराभोवती जशी तटासारखी भिंत असते तशी बागेची भिंत मला वाटली. बागेचं प्रवेशद्वार तर मुळीसुद्धा भव्य वाटलं नाही. " हात्तिच्या, हीच का शालीमार ! " असं स्वतःशी पुटपुटत मी आत शिरलो; परंतु बागेची एकएक मजगी (मजला) जसजसा चढून पुढे जाऊ लागलो तसतशी माझ्या उद्‌गारांची मला शरम वाटू लागली. कारण एक अत्यंत भव्य आणि रमणीय उद्यान मला दिसू लागलं. या उद्यानाची लांबी जवळ जवळ एक तृतीयांश मैल आहे आणि रुंदी याच्या निम्म्यानं आहे. चिनार झाडांच्या रांगाच्या रांगा उभ्या असून त्यांनी मर्यादित केलेल्या हिरव्यागार तृणांकुरांनी आच्छादलेल्या रेखीव त्रिविधाकृती वाफ्यात अगणित रंगांची फुलझाडं आहेत. 'चिनार' हे झाड मूळचं पर्शियातलं आहे, व मोगल लोकांनी ते काश्मीरमध्ये आणलं असं म्हणतात. या झाडांचा प्रचंडपणा, त्यांची गर्द छाया, त्यांच्या पानांचा नाजूकपणा आणि तेज या गोष्टींची कल्पना केवळ वर्णनानं येणं शक्य नाही. तुला इतकंच सांगतो की पर्शियन भाषेत सुंदर स्त्रीच्या करपल्लवाला चिनार झाडाच्या पल्लवाची उपमा देतात. असे शतसहस्र कोमल चिनारपल्लव वाऱ्यावर डुलत असलेले त्या


विस्तीर्ण बगीच्यात मला दिसले आणि वृक्षलतांच्या आणि सुगंधी फुलांच्या त्या शोभेलाही मागं सारणारी अशी दुसरीही एक शोभा मला दिसली. बागेच्या मधोमध प्रत्येक मजगीत (म्हणजे मजल्या-वर) एकेक मोठी पुष्करिणी असून चारी मजल्यावरच्या चारी पुष्करिणी एका पाटानं जोडल्या आहेत आणि या पाटात कारं-जांची रांगच्या रांग लागलेली आहे. श्रीनगरच्या उत्तरेस अकरा मैलावर 'हारवान' (हरवन) नावाचा जो मोठा तलाव आहे त्यातलं पाणी या बागेत आणून खेळविलं आहे. वरच्या पुष्करिणी-तून खालच्या पुष्करिणीत अशा प्रकारे पाणी पडत असतं आणि अखेर दल तलावात जात असतं. चौथ्या मजगीवर पासष्ट फूट लांब आणि रुंद असा चबुतरा असून त्यावर दगडी मंडप आहे. मंडपाचे खांब काळ्याभोर संगमरवराचे असून त्यावर सुबक नक्षीकाम केलेलं आहे. या मंडपात मी येऊन उभा राहिलो आणि प्रवेशद्वाराकडे तोंड करून त्या भव्य उद्यानाचं सौंदर्य बघत राहिलो. माझं मन सव्वातीनशे वर्षं मागं गेलं. ज्यावेळी जहांगीर बादशहानं हे उद्यान तयार करविलं त्या काळात या बागेचं वैभव कशा प्रकारचं असेल, त्याची कल्पनाचित्रं माझ्या नजरेपुढं तरंगू लागली........

"हुजूर, आपल्याला निषात बागेकडे जायला उशीर होतो. इथेच किती वेळ उभे राहणार ?"

आहादूचं ते बोलणं ऐकून मी एकदम बेहस्तातून खाली पृथ्वीवर आलो.

'निषात' बागेपाशी माझा 'शिकारा' येऊन पोचला तेव्हा सूर्य अगदी माथ्यावर आला होता. भोवताली नजर टाकली की जिकडे तिकडे छोटया छोटया जललहरींचा चमचमाट दिसत होता.

वनभोजनाची ही खरी घटका होती म्हणून म्हणा किंवा हे उद्यान लोकांच्या अधिक प्रीतीतलं होतं म्हणून म्हणा 'शालीमार' पेक्षा या ठिकाणी लोकांची किती तरी अधिक गर्दी उसळलेली दिसली. बागेपुढच्या तलावाच्या काठाशी नौकांची अशी काही झुंबड उडाली होती की, तिच्यातून मार्ग काढून 'शिकारा' काठाला लावणं कठीण होतं. पण मी पाहिलं तो आहादूनं नावांच्या किचकट दाटीतून हा हा म्हणता सफाईनं वाट काढली आणि 'शिकारा' किनाऱ्याला लावला. ते पाहून माझ्या मनात आलं, हा सारा सवयीचा खेळ आहे. सायकलीवरून हिंडताना आपण नाही का अशक्य वाटणाऱ्या दाटीतून वाट काढीत ? किंवा उत्तर हिंदुस्थानातल्या आग्रा, बनारस अशा शहरांच्या जुन्या भागातल्या अरुंद रस्त्यात रहदारीची एकच 'भीड' लागलेली आपल्याला दिसली की आपल्याला वाटतं, हिच्यातून आपली गाडी जाणार कशी ? परंतु गाडीवान ती सहजासहजी आणि वेग कमीही न करता नेतो की नाही ? त्याचप्रमाणे जलपृष्ठावरील रहदारीची आपल्याला कधी सवय नसते. म्हणून नावांची गर्दी आपल्याला एखाद्या अभेद्य चक्रव्यूहासारखी वाटते; परंतु ती ज्याच्या अंगवळणी पडलेली असते अशा आहादूसारख्या नावाड्यांना त्यात भेगा आणि वाटा चटाचट दिसतात व ते आपली नाव सहज लीलेने पुढे नेतात. 'शिकारा' किनाऱ्याला लागल्यावर मी खाली उतरलो आणि आहादू व त्याचा छोटा मुलगा माझ्या बरोबर निघाले. उद्यानापुढच्या हमरस्त्यावर मोटारींची आणि टांग्यांची एकच थाप लागली होती. मिठाईच्या आणि पुरीभाजीच्या दुकानांची दाटी झाली होती आणि सिगारेट्स् व काड्याच्या पेट्या विकणारी छोटी छोटी पोरं इतस्ततः रेंगाळत उंच आवाजात



ओरडत होती. सिगरेटचं जे पाकीट कोल्हापूरला सहा आण्यांना मिळायचं ते इथे बारा आणे देऊन मला घ्यावं लागलं. उलट सफरचंदासारखी सुंदर ताजी फळं सहा आणे डझनांनी मिळत होती. आहादू मला म्हणाला, " हुजूर, थोडी मिठाई घ्या ना." परंतु दुकानातल्या परातीत मांडून ठेवलेली ती मिठाई माणसांनी खायच्या लायकीची असावी असं काही केल्या मनाला पटेना आणि शिवाय शेखसाहेबांच्या घरून खान्याचा छोटा डबा मला देण्यात आलेला होता. मी आहादूला थोडे पैसे दिले आणि म्हटलं, " तुझ्यासाठी थोडी मिठाई घे."

या बगीच्याचं प्रवेशद्वार शालिमारच्या प्रवेशद्वाराप्रमाणे रस्त्याच्या पातळीवर नाही, उंचावर आहे. चांगल्या दहावीस दगडी पायऱ्या चढून जावं तेव्हा प्रवेशद्वाराची मुख्य कमान लागते. या

कमानीतून शेकडो माणसं आत शिरत होती. परंतु आत शिरणाऱ्यांची गर्दी फार होती. हे उद्यान शालिमारइतकंच लांब पण त्याहून अधिक रुंद आहे. शालिमारला चारच मजगी आहेत, पण या बागेला सात आहेत. शेवटची मजगी फारच उंच असून तिच्या मागे अगदी चिकटून पर्वताचे हजारो फूट उंचीचे कडे आहेत. शालिमारमध्ये एकच मंडप आहे. इथे दोन आहेत. एक प्रवेश-द्वारापाशी आणि दुसरा अखेरच्या सातव्या मजगीवर. बाकीचा सारा नमुना शालिमारप्रमाणे आहे. तसेच प्रचंड चिनारवृक्ष, तशाच पुष्पलता, तशीच हिरवळ, तशाच पुष्करिणी आणि तशाच कारंजांच्या रांगाच रांगा ! जणू एकाच एंजिनिअरनं दोन्ही बागांची आखणी केली असावी. शालिमारबाग जहांगीर बादशहानं १६१९ मध्ये तयार करवली, आणि निषात नूरजहान राणीचा भाऊ असफशाह यानं नंतर बांधली, आणि हा बगीचा अधिकच नयनमनोहर झालेला पाहून जहांगीर बादशहाला विषाद वाटला, आणि या बागेत येणारं पाणी त्यानं काही दिवस तोडलं होतं असं सांगतात. ही आख्या-यिका खरी असो किंवा खोटी असो, एवढं खरं की ही दोन्ही उद्यानं एकाच नमुन्याची असली तरी निषातची सर शालीमारला नाही. म्हणूनच मला वाटतं, वनभोजनाला येणाऱ्या लोकांची खरी प्रचंड गर्दी या उद्यानावर मला दिसत होती. या गर्दीत श्रीमंतांपेक्षाही सामान्य गरीब लोकांची संख्या अधिक होती हे विशेष आहे. बरोबर दोनचार नोकर, खान्याची मोठमोठी भांडी, अशा इतमामानं आलेले श्रीमंत लोक मला दिसत होते, परंतु त्यापेक्षाही अधिक गर्दी सामा-न्यांची दिसत होती. अंगावर साधे मळके क्वचित फाटके कपडे, त्यावर जुनी फाटकी शाल किंवा कश्मीरी घोंगडी लपेटून घेतलेली, अशा वेषात साधे खेडूत किंवा कामकरी लोक आपले मित्र म्हणा किंवा

आपली वायकामुलं घेऊन म्हणा आलेले दिसत होते, आणि या मंडळीच्या तोंडावरचा उल्हास आणि हास्य श्रीमंतांइतकंच भासत होतं. क्वचित खेडूत प्रेमिकांची तरुण जोडीही आढळे आणि कश्मीरी भाषेत चाललेल्या त्यांच्या गुजगोष्टी मला समजण्यासारख्या नव्हत्या याचं मला वाईट वाटे. उद्यानात जिकडे दृष्टी टाकावी तिकडे माणसांचा गजबजाट दिसत होता. कुणी आस्ते कदम सहल करीत होते, कुणी कारंजापुढे थबकले होते, कुणी हिरवळीवर धावणाऱ्या अगर पुष्करिणीतलं पाणी एकमेकांवर उडविणाऱ्या किशोरांचा खेळ पहात होते, कुणी वृक्षांच्या गर्द छायेत तृणांकुरांवर खुशाल झोपले होते. कुणी वनभोजन करीत होते, आणि इकडे तिकडे समूवारवर चहा तयार होत होता. श्रीमंत असो गरीब असो प्रत्येकाजवळ समूवार असायचाच असा जणू संकेत दिसला. सारं उद्यान आनंदानं आणि समाधानानं बहरून गेलं होतं. पुरुष, स्त्रिया, म्हातारे, मुलं, श्रीमंत, गरीब हे भेद या ठिकाणी घटकाभर नाहीसे झाले होते. सारी माणसं एकाच पातळीवर आली होती. क्रीडोद्यानात विहार करणारी ही सारी माणसं होती. हे रमणीय उद्यान सगळ्यांच्या मालकीचं होतं. या ठिकाणी कोणी किती मजा लुटावी त्याला बंधन नव्हतं. खरं म्हणजे अशा या सुंदर उद्यानात दहा पंधरा मित्रांचं टोळकं घेऊन यायला हवं, आणि सबंध दिवस मजेत काढावयाला हवा. परंतु मी अगदी एकटाच होतो, आणि भोवतालचे लोक प्रिय-जनांशी व मित्रांशी गप्पा गोष्टी करीत असलेले पाहून एकटे-पणाची माझी जाणीव मला अधिकच असह्य होत होती. पण त्याला इलाज नव्हता आणि शिवाय चिनार वृक्षांच्या छायेत हिरवळीवर खुशाल पडून राहाण्यात आणि मनाशी विचार करण्या-तही मजा होतीच की ! काश्मीरमधल्या मुक्कामात पुन्हा एकदा

केव्हातरी या बगीचात आलं पाहिजे असा निश्चय करून संध्याकाळी पाच वाजण्याच्या सुमारास मी तेथून निघालो.

*        *        *

'बदामी बाग' म्हणजे एक अत्यंत रमणीय ठिकाण आहे. 'निषात' बागेच्या पाठीशी ज्या पर्वताचे उंच उंच कडे आहेत, त्याची रांग पूर्वपश्चिम खूपच लांबवर पसरलेली आहे. तिच्या मांडीवर ठेवल्याप्रमाणे ही जवळ जवळ दोन अडीच मैल विस्ताराची छावणी वसलेली आहे. ज्याचे माथे शुभ्र बर्फाने माखलेले आहेत, अशा नगराजाचा काळा जांभळा भव्य तट, त्या तटाला लागूनच असलेल्या लष्करी तऱ्हेच्या छोटया मोठया इमारतींची लालभडक छपरे, ठिकठिकाणी उभ्या केलेल्या राहुटयांचा उन्हात चकाकणारा पांढरा रंग, जिकडे तिकडे दिसणारे उंच उंच हिरवेगार वृक्ष आणि ठिकठिकाणी आखलेले हिरवळीचे लहान मोठे पट्टे आणि या बहुरंगी मनोहर पार्श्वभूमीवर जागोजाग चाललेली सैनिकांची कवायत व धावपळ, आणि छोटया 'जीप' गाडयांची व मोठमोठया ट्रक गाडयांची चाललेली ये जा हे दृश्य मला फार मनोहर वाटलं. ज्या ऑफिसर्सबरोबर मी इकडे उडीला येणार होतो, त्यांची निघण्याची तयारी होता होता पुष्कळच खोटी झाली. पाऊसही सारखा पडतच होता, पण मला कंटाळा आला नाही. ऑफिसर कमांडिंगनं सिगरेटचा एक डबा माझ्यापुढं आणून ठेवला होता; आणि चिकाच्या पडद्यातून रंगभूमीवरचा एकादा देखावा पहायला मिळावा त्याप्रमाणे जलधारात न्हाऊन निघणाऱ्या बदामी बागेचं ते सौंदर्य कितीही पाहिलं तरी समाधान होण्यासारखं नव्हतं.

वाटेत 'पट्टण', 'संग्राम', 'बारामुल्ला', 'महोरा' इत्यादी ठिकाणी थोडा थोडा मुक्काम करीत करीत आम्ही आलो. बारा-

मुल्लाला मी स्वतंत्रपणे जाणार आहे, म्हणून तिथं फारसा वेळ घालविला नाही. तथापि थोडया वेळातही, टोळीवाल्यांनी या सुंदर शहराची केवढी खराबी केली ती सहज दृष्टीस पडली. इथलं सारं वातावरण मी विशेष काळजीपूर्वक पाहिलं व आणखी पहाणार आहे. महोरा येथे जो विजेचा कारखाना आहे तेथून सबंध कश्मीर दरीत वीज पुरविली जाते. टोळीवाल्यांनी हा कारखाना संपूर्ण उध्वस्त करून टाकला होता. पण आता तो पुन्हा चालू झाला आहे. या कारखान्याची जागा किती रमणीय आहे म्हणून तुला सांगू ? फार, फार ! किंबहुना उडीपर्यंतचा हा प्रवास ज्या प्रदेशातून मी केला तो साराच रम्य आहे. सत्तर मैल लांबीचा रस्ता प्रशस्त आणि गुळगुळीत आहे. ह्या रस्त्याशी समांतर जेहलम नदीचा प्रवाह आहे. जिकडे नजर टाकावी तिकडे डाव्या अंगाला शेतं, बगीचे आणि उजव्या अंगाला नदीपलीकडचे दूरचे उंच उंच पहाड दिसतात. महोरापाशी डाव्या अंगालाही डोंगराचे कडे दिसू लागतात. या डोंगराचे झाडीनं आच्छादलेले कडे, त्याच्याखाली उडीकडे येणारा रस्ता, त्याच्याखाली कारखाना, त्या पलीकडे भव्य पात्रातून वाहाणारं खळखळणारं झेलमचं पाणी, पलीकडे मोठमोठया झाडांनी आच्छादलेला भूप्रदेश आणि अखेर कडेला दूर अंतरावरचे भव्य पर्वत असा हा दिवसभरच्या पावसानं भिजलेला व संध्याकाळच्या प्रकाशात धूसर वाटणारा देखावा मी कधी विसरेन असं मला वाटत नाही !

* * *

खान–काही–मोआलापाशी उतरल्यावर मी पाहिलं तो या मशीदीचा थाट नक्षबंदीसाहेबाहून कितीतरी अधिक रुबाबाचा आणि नीटनेटका दिसला. प्रवेशद्वार भव्य होतं, आणि आत

पाऊल टाकून पाहिलं तो केवढ्या तरी विस्ताराचं फरसबंद अंगण माझ्या दृष्टीस पडलं. मशीदीची मुख्य इमारत खूपच मोठी आणि पूर्ण डागडुजीत ठेवलेली आहे. सत्यभूषणाला या इमारतीचा काल नक्की सांगता येईना, पण मी मनाशी तर्क केला की कश्मीरमध्ये हिंदूंच्या, बौद्धांच्या, मोगलांच्या व अखेर शिखांच्या वर्चस्वाचे जे कालखंड एकामागून एक होऊन गेले, त्यापैकी बुद्ध कालातील ही मशीद असावी. कारण बुद्ध मंदिराला ज्याप्रमाणे पावसाळी धडपांसारखी एकावर एक छपरं असतात, तशी या मशीदीच्या इमारतीला आहेत, हिच्या मिनाराच्या मस्तकावर मुकुटाप्रमाणे राजचिन्ह आहे. गंमत अशी की या मशीदीचा झेलमच्या बाजूला जो तट आहे, त्या तटाला लागूनच मशीदीच्या एका भागातच— हिंदू देवालय आहे. काश्मीरमध्ये हिंदू आणि मुसलमान कित्येक शतकं पूर्ण प्रेमभावानं नांदत आल्याचा हा केवढा पुरावा आहे, नाही का ?

# कल्याने देशाटन

## प्र. के. अत्रे

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थळप्रत.
अनुक्रम ३६७६६ वि: प्रवास
क्र. ३३८ नों. दि. २५/८/६५

श्रीनगर जसजसे जवळ येऊ लागले तसतसे आमचे विमान खाली उतरू लागले. आणि काश्मीरची पाचूसारखी हिरवीगार भूमी प्रथम प्रथम आमच्या दृष्टीस पडली आणि सर्वांगावर रोमांच उठले. वृक्षांची आणि जलाशयांची ठायी ठामी जरतारी वेलबुट्टी काढलेली तलम हिरवीगार शाल अंगावर ओढून पहुडलेल्या श्रीनगरचे आकाशातून आम्हास प्रथम दर्शन झाले. श्रीनगरच्या विमानतळावर आम्ही उतरलो तेव्हा साडेबारा पाऊणचा सुमार झाला होता.

बाहेर हवेत गुलाबी थंडी खेळत होती. युरोपमधल्या कोठल्या तरी देशात आपण आलो आहोत अशी मनाला जाणीव झाल्यासारखे

वाटत होते. काश्मीरमध्ये प्रवास करायला भारतीय नागरिकाला परवाना लागतो. अर्थात तो मिळण्यासाठी त्रास मुळीच पडत नाही. तथापि, काश्मीर हा जर भारताचा अविभाज्य भाग आहे, तर भारतीय नागरिकाला काश्मीरमध्ये प्रवेश करावयाला ही परवान्याची खटपट कशाला, हा विचार मनात आल्यावाचून मात्र राहिला नाही. विमानतळावर ह्या परवान्याची पहाणी करण्यासाठी दोन अधिकारी बसलेले असतात. त्यांनी तपासणी केल्यानंतर मग आपल्याला पुढे जाता येते.

आमच्या स्वागतासाठी काश्मीर सरकारचे अधिकारी जीप मोटर गाडी घेऊन आले होते. मोटारीत आमचे सामान टाकून आम्ही श्रीनगरच्या रोखाने निघालो. शहरापासून विमानतळ आठ मैलांवर आहे. रस्ता उंचसखल प्रदेशातून जातो. आजूबाजूला हिरव्यागार हिरवळीने आच्छादलेला प्रदेश असल्याने मनाला आल्हाद वाटतो. रस्त्याच्या दोन्ही बाजूला काश्मीर प्रदेशात उगवणाऱ्या वैशिष्ट्यपूर्ण वृक्षांची दाटी लागून राहिलेली आहे. दोन वृक्ष विशेष नजरेत भरतात. एक चिनार आणि दुसरा पॉपलर. चिनार वृक्ष हा आपल्याकडच्या वड किंवा पिंपळासारखा अत्यंत उंच आणि विशाल असू शकतो. तथापी, वड–पिंपळाच्या पालवीपेक्षाही चिनारची पालवी अधिक हिरवीगर्द आणि दाट असते. चिनारची पाने एरंडाच्या पानासारखी रुंद आणि कातरलेल्या कडेची असतात. चिनारचे खोडही अतिशय ऐसपैस आणि भरदार असते. असा छायाशील आणि प्रसन्न वृक्ष मी तरी आयुष्यात कुठल्याही देशात पाहिला नव्हता. चिनार वृक्ष हे काश्मीरचे प्रतीक समजायला हरकत नाही. पॉपूलर वृक्ष हा सुरूच्या झाडाप्रमाणे सडपातळ आणि उंचच्या उंच असतो. त्याची पाने मेंदीच्या झाडा-

सारखी बारीक आणि लंब वर्तुळाकार असतात. रस्त्यांच्या रांगा पाहून डोळ्यांना फारच मौज वाटते यांत काही शंका नाही. जिकडे पहावे तिकडे झाडे आणि पाणी ह्यांची अगदी रेलचेल. काश्मीरच्या खोऱ्यात तीन चतुर्थांश पाणी आणि एक चतुर्थांश जमीन आहे असे आमच्या स्वागतासाठी आलेल्या अधिकाऱ्याने आम्हाला सांगितले. काश्मीरच्या खोऱ्याची समुद्रसपाटीपासून पाच हजार फूट उंची आहे. दहाहजार फूट उंचीच्या पर्वतांच्या रांगा ओलांडून पलीकडे गेल्यानंतर पाच हजार फूट उंचीचा नद्यांनी आणि सरोवरांनी भरलेला एक रमणीय प्रदेश आपल्या दृष्टीस पडेल अशी नव्या प्रवाशाला सुतराम कल्पना नसते. काश्मीर संबंधी पौराणिक दंतकथा अशी आहे की, फार प्राचीन काळी ऐंशी मैल लांब आणि तीस मैल रुंद असे हे काश्मीरचे खोरे म्हणजे एक प्रचंड सरोवर होते. ह्या पाण्याचे शोषण पुढे काश्यप ऋषीने केल्यामुळे, त्याचे नाव ह्या प्रदेशाला देण्यात आले. त्याचा 'काश्मीर' असा अपभ्रंश झाला. तथापि, पाण्याचे एवढे शोषण झाल्यानंतरही मोठमोठी सरोवरे अद्याप काश्मीरात उरलेली आहेत. उलर सरोवर हे तर सर्व भारतात मोठे आहे.

श्रीनगर शहर हे झेलम नदीच्या काठी वसलेले असून ते जवळ जवळ पाण्यात आहे असे म्हटले तरी चालेल. म्हणूनच त्याला 'आशिया खंडातील व्हेनिस शहर' असे म्हटले जाते. काश्मीरी भाषेत झील म्हणजे 'पाणी' असा अर्थ आहे त्यावरूनच 'झेलम' हे नाव पडले असावे असे वाटते. 'वितस्ता' ह्या नावानेही ती प्रसिद्ध आहे. दक्षिणेला वेरीनाग पर्वतातून ती उगम पावते. श्रीनगरहून पुढे तीस मैलांवर असलेल्या बारामुल्ला ह्या गावापर्यंत ती एकसारखी सपाट प्रदेशातून वाहात जाते. आणि

मग पुढे ती पर्वत प्रदेशातून जशी खाली उतरू लागते तसा तिच्या स्वरूपात एकदम बदल होतो. एखाद्या बेफाम आणि आणि खवळलेल्या नागिणीप्रमाणे उड्या मारीत पुढे ती पाकिस्तान-मध्ये प्रवेश करते.

श्रीनगर ते बारामुल्ला पर्यंत बोटीने प्रवास करता येतो. माझी राहण्याची व्यवस्था झेलम नदीवरील एका खास ' नौकागृहात' ( Houseboat ) केली होती. नौकागृह हे श्रीनगरच्या जीवनाचे एक अभूतपूर्व वैशिष्ट्य आहे. ते कसे निर्माण झाले ह्याचा इतिहास आहे. फार पूर्वीपासून श्रीनगरमधील हजारो गरीब कुटुंबे झेलम नदीवर लहान लहान बोटीत जन्मोजन्म राहत आलेली आहेत. त्यांना बिचाऱ्यांना जमिनीवर जागा विकत घेऊन घरे बांधण्याची सुद्धा ऐपत नव्हती. त्यांच्या या राहत्या नावेला ' डुंगा ' असे म्हणतात.

झेलम नदीच्या दोन्ही बाजू आणि तिचे शहरातून गेलेले कालवे ह्या ' डुंग्यांनी ' नुसते भरून गेले आहेत. ह्या लहानशा नावेत आपला सारा जन्म थंडीत आणि पाण्यात तेथले लोक कसा काढीत असतील ह्याची कल्पना करवत नाही. सर्वसामान्य ' डुंग्या 'ची लांबी पंचवीस फूट आणि रुंदी आठ फूट असते. त्याचा पुढचा भाग चौकोनी, उभट आणि उचललेला असतो. मधोमध एक बसकं खोपटं असतं. त्याचा उपयोग रहाण्यासाठी केलेला असतो. सर्पण आणि गवत यांचा साठा ह्या डुंग्यात केलेला आढळतो. शेळ्या आणि गाई देखील तेथेच दाटीवाटीने बांधलेल्या आढळतात. ह्या डुंग्याचा उपयोग पूर्वीच्या काळी लांबच्या प्रवासासाठी करण्यात येई. पुढे पुढे बाहेरगावच्या प्रवाशांची रहाण्याची व्यवस्थाही तेथे होऊ लागली.

त्यानंतर प्रवाशांची ये जा जशी वाढू लागली तशी तशी त्यांच्या उतरण्याची व राहाण्याची मोठी पंचाईत पडू लागली. पूर्वीच्या महाराजांच्या राजवटीत बिगर काश्मीरी माणसांना काश्मीर-मध्ये जमिनी विकत घेण्याला किंवा घरे बांधण्याला प्रतिबंध असे. (सध्याच्या लोकशाही राजवटीमध्ये सुद्धा हाच कायदा अद्याप जारी आहे.) ह्या अडचणीतूनच 'नौकागृहा'चा शोध लागला. नौकागृह म्हणजे नावेत बांधलेले एक आधुनिक सुखसोयींनी सज्ज असलेले लहानसे हॉटेलच म्हणानात! ह्या नौकागृहाची लांबी पासष्ट ते पंचाण्णव फूट असते आणि रुंदी चौदा फूट असते. कित्येक नौकागृहांना दुसरा मजलाही असतो. पण एक मजली नौकागृहावर शामियाना बांधून आणि आजूबाजूला फुलझाडांच्या कुंड्या ठेवून मध्यंतरी आरामशीर बसण्याची व्यवस्था करण्यात आलेली असते.

ही नौकागृहे देवदार लाकडाची बांधतात. त्याला रंगरंगोटी किंवा पॉलिश करण्यात येत नाही. त्याचा मूळचा रंगच कायम ठेवण्यात येतो. ही नौकागृहे नदीच्या काठालाच तीनचार लांबलचक लोखंडी साखळ्यांनी बांधण्यात आलेली असतात. पूर्वी ह्या नौका-गृहांमध्ये झेलम नदीचेच पाणी पिण्यासाठी वापरण्यात येत असे. पण ते आरोग्यास विघातक असल्याने जमिनीवरून नळाचे स्वच्छ पाणी रबरी नळीतून आता नौकागृहाच्या माथ्यावर एका लोखंडी बंद हौदात घेण्यात येते. आणि तेथून ते खाली प्रत्येक खोलीमध्ये नळामधून येते. दिव्यासाठी वीजही अशीच बाहेरून घ्यावी लागते. अशा रीतीने नौकागृह हे पाण्यामध्ये तरंगत असले तरी ते जमिनीशी जखडलेलेच असते. जमिनीचा संबंध सोडवून आठदहा नावाड्यांच्या मदतीने ते नदीच्या पात्रामधून लांबपर्यंत

हाकारता येते हे जरी खरे असले तरी त्या भानगडीत सहसा कोणी पडत नाही.

नदीच्या उंच काठावरून पायऱ्या पायऱ्यांनी खाली उतरले की एका लांबलचक फळीवरून चालत चालत आपण नौकागृहाच्या पुढल्या भागात प्रवेश करतो. तेथून मुख्य दाराने आत आले म्हणजे दिवाणखाना लागतो. हा दिवाणखाना सर्व आधुनिक साधनांनी आणि साहित्याने शृंगारलेला असतो. काश्मीरच्या वैशिष्टयपूर्ण कलेचे सर्व नमुने येथे पाहावयाला सापडतात. तक्त-पोशीवर सुंदर गालिचे आंथरलेले असतात. तिन्ही बाजूला ऐसपैस कोच मांडलेले असतात. आणि कोपऱ्यात रेडिओ असतो. दिवाण-खान्यातून पुढे भोजनगृह असते. तेथे पाश्चात्य पद्धतीप्रमाणे मधोमध वर्तुळाकार टेबल आणि त्याच्याभोवती खुर्च्या मांडलेल्या असतात. ह्या खोलीनंतर मग भोजनपात्रे आणि उपकरणे ठेवण्याची खोली लागते. ती ओलांडून पुढे गेले की मग गालिच्यांनी आच्छादलेला अरुंद मार्ग लागतो. त्यातूनच राहत्या खोल्यांमध्ये प्रवेश करता येतो.

सामान्यतः राहण्याच्या तीन खोल्या असतात. प्रत्येक खोलीत दोन माणसांना राहाता येते. खोलीच्या दोन्ही बाजूला समोरासमोर दोन पलंग असतात. कपडे ठेवण्यासाठी एक कपाट, वेषभूषेसाठी आरशाचे बैठे टेबल अशी सर्व व्यवस्था तेथे असते. प्रत्येक खोलीला छोटेखानी स्नानगृह, त्याच्यात तोंड धुण्याचे ‘ बेसिन ’, आंघोळीचे ‘ टब ’ आणि ‘ फ्लशिंग ’ची व्यवस्था असलेले ‘ कमोद ’ असते व नौकागृहाच्या मागे गरम पाण्याचा नळ नेण्याची व्यवस्था केलेली असते. नौकागृहाच्या मालकाला नी व्यवस्थापकाला ‘ मांजी ’ म्हणतात. हे सर्व मांजी मुसलमान असतात.



‘ नौकागृह ’

नौकागृहाच्या मागच्या बाजूला तीनचार लहान ‘ डुंगे ’ असतात. ह्या डुंग्यात ‘ मांजी ’ च्या कुटुंबातील माणसे रहातात. स्वयंपाक वगैरे गोष्टी तेथेच होतात आणि तेथून तो नौकागृहाच्या कडेने ठेवलेल्या अरुंद मार्गाने आत आणता येतो. नौकागृहातील सुखसोयींच्या मानाने त्यांचे वर्ग पाडलेले असतात. चांगल्या नौकागृहात राहण्याचा नी जेवण्याचा दर प्रत्येक माणशी रोज आठ ते पंधरा रुपये पडतो. ह्या नौकागृहांची नावेही मोठी मजेदार असतात.

आमची ज्या बोटीत व्यवस्था केली होती तिचे नाव ‘ एरीन ’ असे होते. तिचा मालक महंमद लंगू हा गेल्या वर्षीच मरण पावला होता. त्याचे दोन मुलगे सुलतान आणि रहिमान यांनी माझे स्वागत केले आणि ह्याच बोटीत पूर्वी इंदिरा गांधी

आणि कृष्णा हाथीसिंग राहून गेल्या आहेत असे मोठया अभिमानाने सांगितले. एवढेच नव्हे तर चौकटीत बसविलेली त्यांची सर्टिफिकेटे आणून त्यांनी मला दाखविली.

नौकेमध्ये मी आणि महापौर मिरजकर ह्यांची एकाच खोलीत उतरण्याची व्यवस्था केलेली होती. मी आलो त्यावेळी मिरजकर बाहेर गेले होते. ' मांजी ' ने दिलेले जेवण अतिशय रुचकर होते. पाकनिष्पत्ती आणि वाढण्याच्या कामात हे ' मांजी ' मोठे हुशार आणि तत्पर असतात. जेवून मी नौकागृहाच्या सौध भागावर जाऊन उभा राहिलो आणि सभोवार दृष्टिक्षेप टाकला. आपल्या भव्य आणि विशाल पात्रामधून झेलम नदी अत्यंत शांत रुबाबाने आणि संथ दिमाखाने वाहात होती. दोन्हीही किनाऱ्यांवर एका हारीने उभी असलेली पॉपूलरची उंच हिरवी झाडे झेलम नदीला जणू काही खडी ताजीमच देत होती. सभोवार बर्फाच्छादित पर्वतांचा निळाभोर वेढा पडलेला होता. आपण खरोखरच कोठल्या तरी एखाद्या स्वप्नसृष्टीत आलो आहोत असा मनाला भास होत होता.

झेलम नदीच्या दोन्ही बाजूला नौकागृहांच्या रांगा लागून राहिल्या होत्या. अधून मधून ' शिकारे 'ही नदीच्या पृष्ठभागावर द्रुतगतीने इकडून तिकडे चाललेले होते. ' शिकारा ' म्हणजे एक लहानशी लांबलचक पण हलकी नाव असते. तिचा मध्यभाग सुंदर रीतीने श्रृंगारलेला आणि आच्छादलेला असतो. आत झोपण्याच्या गादीएवढी लांब अशी मऊ बैठक अंथरलेली असते. हा शिकारा एक किंवा दोन नावाडी झपाटयाने वल्हवीत नेतात. झेलम नदीवर इकडून तिकडे प्रवास करण्यास ' शिकारा ' हे अत्यंत सुलभ आणि सोईस्कर वाहन आहे. पुण्यात ज्याप्रमाणे टांगा किंवा रिक्षा अथवा मुंबईत ज्याप्रमाणे टॅक्सी त्याचप्रमाणे श्रीनगरमध्ये झेलममधून प्रवास

करण्यास शिकारा. फुले, फळे, भाज्या किंवा इतर अनेक सामान विकणारे विक्रेते आपला माल शिकाऱ्यात भरूनच नौकागृहाच्या दाराशी येतात. जमिनीशी जन्मभर जखडलेल्या माणसाला पाण्यामधून होणारा हा सर्व व्यवहार म्हणजे एक नवीनच अनुभव आहे. अर्थात सर्व जन्म ज्यांचा पाण्याच्या पृष्ठभागावर गेला आहे त्या श्रीनगरमधल्या नावाड्यांना त्याचे काहीच नावीन्य नाही. हवेतून पाखरे ज्याप्रमाणे निःशंक भराऱ्या मारीत असतात, त्याप्रमाणे झेलम नदीच्या पाण्यामध्ये ह्या लोकांचे सारे व्यवहार निर्धास्तपणे चाललेले असतात. सात सात अन् आठ आठ वर्षांची लहान मुले किंवा मुली जेव्हा लीलेने आपापल्या नावा नेताना दिसतात तेव्हा त्यांचे खरोखरच कौतुक वाटते.

दुपारी चार वाजता महापौर मिरजकर आणि सर्वपक्षीय समितीचे आमचे काही मित्र परत आले. आमच्या ताब्यात दोन सरकारी मोटर गाड्या होत्या. श्रीनगरमधला तो आमचा पहिलाच दिवस होता. तेव्हा ह्या दिवशी श्रीनगरच्या परिसरात असलेली सुविख्यात ‘मोगल उद्याने’ पाहून येण्याचे आम्ही ठरविले. आमचा रस्ता ‘डाल’ सरोवराच्या उजव्या बाजूने जातो. डाल सरोवराला पाहताना बाणभट्टाच्या ‘कादंबरी’मधील ‘अच्छोद’ सरोवराची मला आठवण झाली. दृष्टी जेथपर्यंत पोचू शकेल तोपर्यंत एक विशाल आणि निश्चल जलाशय पसरलेला होता. जणू काही आजूबाजूच्या बर्फाच्छादित पर्वतांना आणि वृक्षराजीला आपले सौंदर्य सांजसकाळ निरखून बघण्यासाठी सृष्टिदेवतेने हा एक मणिदर्पणच मांडून ठेवला आहे. डाल सरोवरामध्ये नौकागृहे आणि शिकारे ह्यांची कमी गर्दी नाही. पण सरोवराचा विस्तार मोठा असल्याकारणाने झेलम नदीच्या पात्राप्रमाणे ती दाटी

डोळ्यांना विशेष जाणवत नाही. डाल सरोवराच्या कडेकडेच्या पाण्यात पाणवेलींची फार दाटी माजलेली आहे. पण मध्यभागातले पाणी अत्यंत निर्मल असते. तेथे पोहण्यासाठी आणि जलक्रीडेसाठी काही नौकागृहे नांगरून ठेवली आहेत.

डाल सरोवराचा प्रारंभ शहराच्या बाजूने जेथून होतो, तेथेच पलिकडच्या काठाला 'नेहरू पार्क' आहे. श्रीनगरला आलेल्या सर्व-सामान्य प्रवाशांची ह्या सुरम्य स्थळावर विशेष 'मोहबत' जडलेली दिसून येते. जेव्हा पहावे तेव्हा तेथे लोकांची आपली गर्दी असते. संध्याकाळचा वेळ आनंदात घालवण्याच्या सर्व सुखसोयी 'नेहरू पार्क' मध्ये आहेत. पण लोकांच्या गर्दीमुळे त्याला अगदीच बाजारी स्वरूप आल्यासारखे दिसते. नेहरू पार्क ओलांडून डाल सरोवराच्या कडेकडेने आम्ही पुढे जाऊ लागलो. रस्त्याच्या दोन्ही बाजूला असलेल्या पॉपूलर आणि विलो वृक्षांची शोभा अवर्णनीय आहे. आता डाल सरोवराचा विस्तार अधिक आकर्षक दिसू लागतो. सरोवराच्या मध्यभागी 'सद्र-इ-रियासत' ह्यांचा 'वसंत प्रासाद' आहे. त्याला 'कोतारखाना' म्हणतात. त्याच्या सर्व बाजूला पाण्यामध्ये फिकट पिवळ्या रंगाच्या लिली पुष्पांचा तरंगता बगीचा बनविण्यात आला आहे.

डाल सरोवरामधून शुभ्र रंगाची बदके अगदी एका रांगेने अशा काही ऐटीने नी रुबाबाने चाललेली दिसतात की, टक लावून त्यांच्याकडे बघत बसावेसे वाटते. उजव्या बाजूला डोंगर आणि डाव्या बाजूला डाल सरोवर ह्यांच्यामधून जाणाऱ्या रस्त्याने आम्ही चारपाच मैल गेल्यानंतर प्रथम आम्हाला 'निशात बाग' लागला. बाहेर टांगे, मोटारी आणि प्रवासी ह्यांची प्रचंड गर्दी असल्यामुळे 'निशात बागे'त प्रवेश करताना जी जिकीर होते, त्यामुळे माणूस हैराण होतो. पण निशात बागेच्या पायऱ्या चढून आपण वर



दलसरोवरावरील सूर्यास्त

गेलो, म्हणजे स्वर्गीय सौंदर्याचा जो अनुपम चित्रपट आपल्या डोळ्यापुढे पसरलेला दिसतो, तो बघून आपण क्षणमात्र बेभान झाल्यावाचून रहात नाही.

'निशात बाग' म्हणजे 'आनंदोद्यान'. हा बाग १६३० साली नूरजहानच्या भावाने किंवा बापाने तयार केला असे म्हणतात. ह्या बागेत एकंदर बारा टप्पे चढून वर जावे लागते. बागेच्या मधोमध निर्मळ पाण्याचा अत्यंत आल्हादकारक प्रवाह वहात असतो. टप्प्याच्या रुंद उतरणीवरून झुळझुळणाऱ्या पाण्याचा कंपायमान जरतारी प्रवाह पाहताना अंत:करणाला असा काही अननुभूत तर्षह

होतो की, काही विचारू नका. टप्प्याच्या सपाटीवरून वहाणाऱ्या प्रवाहामधून कारंजी एकसारखी थुई थुई उचंबळत असतात आणि त्यांचे थंडगार तुषार जाणाऱ्यायेणाऱ्यांच्या अंगावर सुखद रोमांच उठवीत असतात. जलप्रवाहाच्या दोन्ही बाजूला रंगीबेरंगी फुलांची शोभिवंत वेलबुट्टी लावलेली आहे. प्रसन्न हिरवळीची बिछायत सर्वत्र अंथरलेली असून कुठे सुरूची झाडे तर कुठे डौलदार चिनार वृक्ष ह्यामुळे सभोवतालच्या प्रसन्नतेत विलक्षण भर पडलेली आहे. निरनिराळ्या रंगांची आणि आकारांची शोभिवंत पाखरे आवाज करीत ह्या झाडावरून त्या झाडावर उडत असलेली पाहून तर चित्तवृत्ती उल्हसित होते.

तो दिवस रविवार असल्याने शेकडो स्त्री–पुरुष सहल करण्यासाठी ह्या बागेत आले होते. अनेक काश्मिरी स्त्री–पुरुष जागजागी मुक्काम करून ‘ सॅमोवार ’ मधून चहा पीत असतात किंवा गुडगुडी ओढीत असतात. आपल्याकडच्या पाणी तापवण्याच्या बंबासारखी ह्या ‘ सॅमोवार ’ ची रचना असते. मधोमध कोळसे टाकावयाचे अन् सभोवतालच्या पोकळीत चहा, दूध, पाणी, साखर घालून ठेवावयाचे. आठदहा कप चहा राहील एवढा ‘सॅमोवार’ चा आकार असतो. ह्या भांड्यात तासन् तास चहा गरम राहतो. काश्मिरी स्त्री–पुरुष बरोबर ‘ सॅमोवार ’ आणि गुडगुडी घेतल्यावाचून वनविहारासाठी केव्हाही बाहेर पडत नाहीत.

काश्मीर हा अत्यंत थंड प्रदेश असूनही तेथील सर्वसाधारण जनतेमध्ये मद्यपान करण्याची पद्धत नाही. बुद्ध आणि इस्लाम संस्कारांमुळे कदाचित मद्याचा शिरकाव काश्मिरी जनतेमध्ये झालेला नसावा. चहा पिण्याचे मात्र त्यांना विलक्षण व्यसन आहे. तथापी, चहा करण्याची त्यांची रीत निराळी आहे. चहाच्या पानात सोडाबायकार्ब घालून ते खूप उकळतात. त्यात दूध घालतात. पण साखर-

ऐवजी मीठ टाकतात. सदैव ज्यामध्ये चहा उकळत असतो, ते बाहेरून रुपेरी झिलई असलेले ' सॅमोवार 'चे उभट पात्र म्हणजे काश्मिरी जीवनातील आनंदाची एक अपरिहार्य निशाणी होय.

एका उत्तुंग पर्वताच्या पायथ्यापासून ' निशात बागे 'ची सुरुवात होते. निशात पासून एक मैल अंतरावर ' शालिमार ' बाग आहे. ह्या शालिमार बागेची रचनाही निशात बागेसारखी आहे. पण त्याचे चार टप्पे आहेत पाण्याचा प्रवाह मधून वाहत असतो. आणि त्यामध्ये कारंजी एक सारखी थुई थुई नाचत असतात. शालिमार बागेच्या अगदी शेवटच्या टप्प्यावर मंडपवजा एक दगडी इमारत आहे. त्याच्या खालून पाणी वहात असते. हा शालिमार बाग जहांगीर बादशहाने बांधलेला आहे. शोभेच्या आणि सौंदर्याच्या दृष्टीने ' निशात बाग ' ही ' शालिमार ' बागेपेक्षा केव्हाही सरस आणि सुंदर आहे. रंगीबेरंगी फुलांची मौज निशात बागेमध्येच अधिक पहावयाला मिळते. ' शालिमार बाग ' पाहून आम्ही तेथून थोडया अंतरावर असलेला ' हरवान जलाशय ' पहावयास गेलो.

बर्फाच्छादित डोंगराच्या पायथ्याशी असलेला हा तलाव बघण्यासाठी एक उंच लाकडी जिना चढून वर जावे लागते. तलाव फारसा मोठा नाही, पण त्यातील पाण्याचे तेज विलक्षण आहे. ह्याच तलावातून पाण्याचे जे झरे फुटलेले आहेत तेच पुढे जमिनीमधून झिरपत जाऊन ' शालिमार ' आणि ' निशात ' बागेमध्ये प्रकट झाले आहेत असे म्हणतात. मात्र ह्या दोन्ही बागांच्या पार्श्वभागाची पाहणी करीत असताना पाणी कोठून आणि कसे येते ह्याचा तेथे पत्ता लागत नाही.

' निशात ' आणि ' शालिमार ' बघून आम्ही परत श्रीनगरकडे येताना डाल सरोवरासमोरच्या डोंगरात उंचावर असलेला ' चष्मशाही ' हा बादशाही झरा पहावयास गेलो. पुष्कळशा दगडी पायऱ्या चढून

वर जावे लागते. बागेचे तीन टप्पे आहेत. मधोमध पाण्याच्या हौदात कारंजी उडत आहेत. शेवटच्या टप्प्यावर एका मंडपाखालच्या हौदातून ह्या सुप्रसिद्ध झऱ्याचा उगम होतो. या झऱ्याचे पाणी इतके थंडगार आणि मधुर आहे की, ते कितीही प्याले तरी मनाचे समाधान होत नाही. पाश्चात्य देशातले प्रवासी तर ते शँपेनपेक्षाही लज्जतदार आहे असे म्हणतात. सारांश ' चष्मशाही बाग ' लहान असली तरी अपूर्व आणि अविस्मरणीय आहे.

येथून पुढे काही अंतरावर ' ऑबेरॉय पॅलेस हॉटेल ' आहे. हे ज्यांनी पाहिले नाही त्याच्यासारखा दुर्भागी कोणी नसेल. पूर्वी हा महाराजा हरिसिंगाचा राजवाडा होता. आता तेथे आधुनिक सुखसोयींनी सुसज्ज असे हॉटेल उघडण्यात आले आहे. हिरव्यागार हिरवळीने आच्छादलेले प्रचंड आणि लांबलचक असे तीन चार शोभिवंत टप्पे चढून वर जावे लागते. ठिकठिकाणी कारंजी उडताहेत आणि रंगीबेरंगी फुलांचे वाफे डोलत आहेत. ओंजळीएवढया आकाराचे ज्याचे गेंद आहेत असे निरनिराळ्या रंगाचे आणि जातीचे गुलाब पाहून तर आम्ही थक्कच झालो.

दिवस मावळू लागला होता. समोर रुप्याचा गालिचा अंथरावा तसे डाल सरोवर पसरले होते. सभोवार रांगेने उभ्या असलेल्या पर्वतांच्या मस्तकावरील बर्फाच्या मुकुटावरील मावळत्या सूर्याची लालपिवळी किरणे रेंगाळत होती. सृष्टिसौंदर्याची ती पराकाष्ठा होती. अंतरात्मा आनंदाच्या समाधीत प्रविष्ट झाल्यासारखे वाटले. आमच्या शेजारी उभा असलेला एक प्रवासी उद्गारला, " जगातील अनेक सौंदर्यस्थळे मी पाहून आलो आहे. पण ह्या ठिकाणी दिसणाऱ्या सौंदर्याला मात्र साऱ्या जगात तोड नाही ! "

# आमची माती आमचे आकाश


| अनंत काणेकर

दुपारचे तीनचार वाजले होते. ऊनही कमी होत होते. पायीच फिरून जुम्मा मशीद, रोझा शहा आलम, तीन दरवाजा वगैरे ऐतिहासिक जागा पाहाव्या असे आम्ही ठरविले. अहमदाबादेतील जुम्मा मशीद चारपाचशे वर्षांची जुनी आहे म्हणतात. मशिदीसमोर लाल दगडांची फरशी असलेले मोठे थोरले प्रशस्त पटांगण आहे. मशिदीचे कोरीव काम केलेले दगडी खांब आणि पाने, फुले, झाडे वगैरेंच्या सुंदर आकृत्या दाखविणाऱ्या, दगडी भिंतीत कोरलेल्या जाळीदार खिडक्या फारच प्रेक्षणीय आहेत. रमजान किंवा बकरीईदच्या दिवशी हजारो भाविक मुसलमान इथे नमाज पढायला येत असावेत; त्यांना उन्हाळ्याचा त्रास होऊ नये म्हणूनच की काय, या सुंदर दगडी

खांबांवर लाकडी पटया मारून विजेचे ' रिव्हॉल्व्हिग टेबल फॅन्स ' रांगेने बसविले आहेत ! पाचशे वर्षांच्या या सुंदर शिल्पकृतीवर भाविकांच्या आरामाकरता पितळी पंखे ठोकणाऱ्या धर्मवीरांच्या हळव्या काळजाचे कोण कौतुक करणार नाही ? दगडात सुंदर जाळीदार खिडक्या कोरण्याचे काम सोमनाथ येथील हिंदू शिल्प-कारांना केले आहे असे म्हणतात. पंधराव्या शतकात अहमदाबाद हे शहर वसविणाऱ्या अहमदशहा सुलतानाच्या पदरी हे शिल्पकार होते. दिल्लीच्या मोगलांचे आणि या सुलतानाचे ठीक नव्हते. त्याला ते " अहमदशहा गुजराती " म्हणत असे कळले !

अबूचा ' सीझन ' अजून सुरू व्हावयाचा होता. आणि नवीनच घेतलेल्या हॉटेलचा कायापालट चालू होता. हॉटेलच्या नावाच्या पाटया अस्ताव्यस्त पडल्या होत्या. काही भागातले इलेक्ट्रिक फिटिंग नीट केले जात होते. हा सर्व प्रकार पाहून कसेसेच वाटले. परत फिरण्याचा विचार करीत होतो. पण त्याने आम्हाला दाखवलेल्या खोलीच्या खिडकीतून ' नखी ' तळ्याचा रमणीय देखावा दिसत होता. ' नखी ' तळ्याच्या काठी एका टेकडीवर हे हॉटेल होते. तेव्हा सर्व गबाळेपणा माफ करून इथेच रहावयाचे आम्ही ठरविले. ' नखी ' तळे हे अबूतले अत्यंत रमणीय स्थान आहे. राजपुतान्याला दिलेल्या महात्मा गांधींच्या राखेचे विसर्जन याच तळयात करण्यात आले आहे.

चहा घेतला, स्नान वगैरे आटोपले आणि जेवावयाला दीड-दोन तास अवकाश असल्यामुळे ' नखी ' तळ्यावर फेरी मारण्या-करिता बाहेर पडलो. साडे अकरा बाराचा सुमार झाला होता. आणि ऊन कडक पडले होते. तरी झाडाखालून चालताना कमालीचा गारवा वाटत होता. अबूची हवा मध्यान्ह झाला तरी थंड आणि



नखी तलाव

उत्साहवर्धक होती. रस्त्यात पाहिलेले बोडके खडक आणि शुष्क ताड व खजुरी यांच्यामुळे अबूबद्दल पहिल्याच दर्शनाला आमचे फारसे चांगले मत झाले नव्हते. पण आता मोहोर आलेली काही आंब्याची झाडे दिसली. विशेषत: ‘ नखी ’ तळ्याच्या आजूबाजूची वनश्री आणि भर दुपारी थंडगार वाटणारी अबूची सुंदर हवा पाहून अबूबद्दलचे आमचे मत हळूहळू बदलू लागले. नखी तळ्याच्या काठीच रघुनाथजीचे मंदिर आणि रघुनाथजीची धर्मशाळा आहे. धर्मशाळा कसली, हे एक सुंदर सॅनाटोरियम किंवा आरोग्यमंदिरच आहे म्हणाना. कोरी करकरीत दुमजली इमारत असून तीन तीन चार चार खोल्यांचे ब्लॉक भांडीकुंडी, खुर्च्याटेबलांसह अगदी नाममात्र भाडयाने कुटुंबांना देण्यात येतात. एकटया दुकटया प्रवाशाकरता एक दोन दिवसाकरता खोलीही मिळते.

नखी तळ्याच्या काठाकाठाने हिंडत असता दोन मजेदार गोष्टी माझ्या पहाण्यात आल्या. तळ्याच्या मध्यभागी एक मोठा थोरला काळा खडक दिसत होता. त्यावर पुष्कळसे काळे पक्षी गर्दी करून बसलेले मला दिसले. दुरून ते कावळे असावेत असे मला वाटले; पण जवळ गेल्यावर ते काळ्या रंगाचे चिमुकले बगळे असल्याचे आढळून आले. काळे कुळकुळीत इतके छोटे बगळे पूर्वी मी पाहिलेले नव्हते. या तळ्याच्या काठाशी एके ठिकाणी अशीच अगदी चिमुकली कमळे मला दिसली. पारिजातकाच्या फुलाएवढी छोटी कमळे आणि त्यांची तितकीच छोटी पाने इतस्ततः पाण्यावर पसरली होती. या खडकाळ प्रदेशात देवाला पाणी मिळेना, तेव्हा त्याने आपल्या नखाने हे तळे खोदले, म्हणून त्याला ' नखी ' तळे नाव पडले म्हणतात !

संध्याकाळी अबूच्या वर–खाली जाणाऱ्या नितळ डांबरी रस्त्यावरून फिरताना अबूच्या सौंदर्याची अधिकाधिक खात्री पटू लागली. दाट बांबूची बने, करवंदीच्या जाळ्या, हिरवेगार कडुनिंब, उंच उंच ' रॉयल ओक ' वृक्ष पाहून आनंद झाला. काश्मीरमधल्या चिनार वृक्षांप्रमाणे दिसणाऱ्या या उंचच उंच ' रॉयल ओक ' झाडांना इथले लोक ' बेलगुडिया ' म्हणतात. अबूच्या पहाडावर दिसणारे अजस्त्र खडक मात्र खरोखरच आश्चर्यकारक आहेत. नखी तळ्याच्या आसपास एक प्रचंड खडक आहे. त्याला ' टोड रॉक ' म्हणतात. खरोखरच या खडकाला दुरून पहाताना एखादा पंधरा वीस फूट लांब आणि दहा बारा फूट उंच असा प्रचंड बेडूकच बसला आहे की काय असा भास होतो. इतिहासपूर्व काळातील अजस्त्र जनावरांचे जबडे आ वासून पडले आहेत की काय असे काही खडकांना पाहून वाटते. एका खडकाचा आकार,

जमिनीवर बसलेला वाघ वर मान करून पहातो आहे असा दिसला. अबूचा पहाड हा अरवली पर्वताच्या रांगेतला एक पहाड आहे. जगातल्या अत्यंत प्राचीन पर्वतांपैकी अरवली हा एक पर्वत आहे, असे भूगोलशास्त्रज्ञ म्हणतात. अरवलीच्या मानाने त्यांच्या मते हिमालय पर्वत अगदीच तरुण! हे खडक फार प्राचीन असल्यामुळे त्यांना हे विचित्र, चमत्कारिक आकार आले की काय कोण जाणे.

ब्रिटिश अमदानीत अबू येथे राजपुताना संस्थानाचा रेसिडेंट रहात असे. त्याचा प्रशस्त बंगला आणि रेसिडेन्सीची भव्य दगडी इमारत पाहिली. पूर्वी जिथे 'युनिअन जॅक' डोले तिथे तिरंगा झेंडा फडकत होता. जयपूर, सिरोही, पालनपूर वगैरे संस्थानिकांचे छपरावर धुराडी असलेले इंग्लिश पद्धतीचे बंगले विषण्ण दिसले.

चालता चालता वाटेत एका रस्त्यावर 'टु सन्सेट पॉइंट' अशी पाटी दिसली. माथेरान, महाबळेश्वर येथे पुष्कळ 'पॉइंटस्' आहेत. अबूत 'पॉइंट' असा हा एकच आहे. पण सूर्यास्ताच्या वेळी काही अलौकिकच देखावा इथून दिसतो, असे आम्ही ऐकले होते. पावणेसहा वाजले होते. सूर्यास्ताला पाऊण एक तास होता. ती पाटी पाहून त्या रस्त्याने आम्ही भराभर चालू लागलो. तिथून 'सन्सेट पॉइंट' किती दूर आहे, याची आम्हाला काहीच कल्पना नव्हती. मैल दोन मैल चाललो तरी कुठेच काही दिसेना. निर्जन रस्त्यावरून दलाल आणि मी दोघेच चाललो होतो. रस्त्यावर दुसरे कुणीच दिसत नव्हते. रस्ता चुकला आणि काळोख पडला तर घोटाळाच व्हायचा, म्हणून परत फिरण्याचा विचार करू लागलो. पण मोह आवरेना. आणखी पाच सहा मिनिटे चाललो. माणसांचे आवाज ऐकू येऊ लागले. धीर आला. एक

वळण घेऊन पुढे गेलो, तो प्रचंड दरी डोळ्यासमोर पसरलेली आणि सिमेंटाने बांधून काढलेल्या 'पॉइंट'वरल्या सज्जात पन्नास साठ गुजराती स्त्रीपुरुष मुलाबाळांसह गप्पागोष्टी करीत शेवचिवडा खात सूर्यास्ताची वाट पहात बसलेले दिसले. डोळ्या-समोर सूर्यबिंब दिसत होते. साडे सहा झाले होते. सूर्यास्ताला दहाच मिनिटे होती. पण त्या दहा मिनिटात यक्षकिन्नरांची सोनेरी मायानगरी तर दिसली नाही ना, असे वाटले. समोर पसरलेल्या अफाट दरीच्या पलीकडे दूर दूर कुठे तरी अस्पष्ट अशा धुक्यात क्षितिजाची कडा दिसत होती. समुद्रावरला सूर्यास्त मी अनेक वेळा पाहिला आहे. तांबडेलाल झालेले सूर्यबिंब हळूहळू क्षितिजाखाली सरकत मटकन पाण्यात जाते. डोंगरमाथ्यावरला सूर्यास्त वेगळा असतो. सोनेरी सूर्य डोंगरमाथ्यावर येऊन टेकतो, हळूहळू खाली जातो, काही क्षण सोनेरी किरणांचा पिसारा डोंगर-माथ्यावर दिसतो तोही लुप्त होतो. आकाश तांबडे, नारिंगी होत होत काळवंडू लागते. पण अबूच्या 'सन्सेट पॉइंट' वरून दरीच्या पलीकडच्या त्या क्षितिजावर होणारा हा सूर्यास्त काही अजबच आहे. नारिंगी, तांबडे, सोनेरी रंग आकाशात मुळीच दिसत नाहीत. सूर्य स्वच्छ पांढऱ्या रुपेरी रंगाचा दिसतो. हा चंद्र कशावरून नव्हे असा प्रश्न कुणी विचारल्यास त्याला उत्तर देता येणार नाही. त्याच्याकडे पहात राहिले की ही रुपेरी तबकडी गरगर गरगर जागच्या जागी फिरते आहे असा भास होतो. पहाणारांच्या दृष्टिभ्रमाचा हा प्रकार असेल, पण दिसते ते असे. काही क्षणांनी या रुपेरी तबकडीच्या मागे अनेक काळ्या तबकडया स्वतःभोवती गरगर फिरताना दिसतात. डोळे मिचकावले तर या तबकडया आकाशभर अधिकच पसरलेल्या दिसतात. वरवर

काळ्या आणि खाली क्षितिजाकडे जमत चाललेल्या काळोखात पांढऱ्या तबकड्या फिरताना दिसतात. शेवटचा क्षण. किंचित काळवंडलेल्या क्षितिजाच्या कडेवर सूर्यबिंब येऊन ठेपले आहे. बिंबाची खालची बाजू किंचित तांबूस दिसू लागली. क्षणार्धात ती नारिंगी झाली. आणि सबंध सूर्यबिंब अस्पष्ट होत होत नाहीसे झाले.

*   *   *

दुपारी ३ वाजता अबूहून दोन मैलांवर असलेली ' दिलवारा ' ( देऊळवाडा ) जैन मंदिरे पाहावयाला आम्ही बाहेर पडलो. शुभ्र संगमरवरी दगडांची, अत्यंत प्रेक्षणीय कोरीव काम असलेली ही मंदिरे ताजमहालपेक्षाही सुंदर आहेत, असे काही लोकांचे म्हणणे आहे. ताजमहाल सुंदर आहे की नाही याबद्दल अलीकडे तज्ज्ञ टीकाकारात वाद आहे, पण त्याची भव्यता आणि रेखीवपणा याबद्दल मुळीच दुमत नाही. या देवळांच्या संगमरवरी खांबांवरील संगमरवरी कमानींचे जितके वेगळे तितकेच सुंदर आकार कुणालाही थक्क करून टाकतील असेच आहेत. छतावर एके ठिकाणी चौकोनी तुकड्यात वसुदेव कृष्णाला घेऊन तुरुंगातून बाहेर पडतो आहे, हा कथाभाग कोरला आहे, तर दुसरीकडे गोल तुकड्यात आणखी काही तरी पौराणिक दृश्य कोरलेले दिसते. हिंदू देवदेवता जैन मंदिरात कशा आल्या ते कळत नाही. कुठे कमळाच्या वेलीची आकृती तर कुठे फुलाफळांची आकृती. दृश्ये, आकृत्या, चेहरे, नक्षी-काम यात कमालीचे वैचित्र्य आणि विविधता आहे; आणि अशी कितीतरी दृश्ये आहेत. पण या कलाकुसरीची इतकी दाटी झाली आहे की कोणत्याही कलाकृतीतले सर्व तपशील मिळून जो एकमेव असा काही परिणाम मनावर व्हायला पाहिजे तो होत नाही. सुंदर,

मौल्यवान दागिन्यांनी मढवून काढलेल्या स्त्रीसारखी या मंदिरांची अवस्था झाली आहे, असे मला वाटते. आत प्रत्येक मंदिरात जशी तपशिलाची गर्दी झाली आहे, त्याचप्रमाणे ही चारही मंदिरे एकमेकांना कशी तरी खेटून बांधलेली असल्यामुळे बाहेरून पहातानाही काही शोभा वाटत नाही. मंदिरांच्या सभोवार एक भली उंच जुनाट भिंत असल्यामुळे दुरून तर हा एखाद्या खेड्याचा पडका भाग असावा असाच भास होतो.

पहिले पार्श्वनाथाचे मंदिर संगमरवरी दगडाचे नाही. साध्या दगडाचेच त्याचे खांब आहेत. पार्श्वनाथाच्या मंदिराला लागूनच आदीश्वर किंवा ऋषभ भगवान याचे मंदिर आहे. पार्श्वनाथाचे पाचशे वर्षांचे जुने मंदिर आहे, तर हे आदीश्वराचे जवळ जवळ साडे आठशे वर्षांचे आहे. पाटणचा राजा भीमदेव याचा मंत्री विमलशहा याने इ. स. १०८८ साली, अठरा कोटी त्रेपन्न लाख रुपये खर्च करून संगमरवरी दगडांचे हे सुंदर मंदिर बांधले. हे पाहताना अप्रतिम कोरीव काम केलेल्या शुभ्र संगमरवरी खांबांच्या जंगलातून आपण फिरतो आहोत असे वाटते. संगमरवरी छत्रात कोरलेल्या आकृतींची आणि दृश्यांची विविधताही थक्क करून टाकणारी आहे. शंकरासमोर नंदी असतो त्याप्रमाणे गाभाऱ्यासमोरच्या खोलीत संगमरवरी दगडाच्या घोड्यावर स्वार झालेली विमलशहाची मूर्ती आहे.

यापुढले मंदिर नेमिनाथ भगवानाचे. यातले खांब आणि त्याहीपेक्षा त्यावरील संगमरवरी दगडांच्याच निरनिराळ्या आकारांच्या नक्षीदार कमानी विशेष प्रेक्षणीय आहेत. हे मंदिर १२३१ त वीरधवल राजाचा मंत्री वस्तुपाल याने बारा कोटी तेहतीस लाख

रुपये खर्च करून बांधले. गाभाऱ्याच्या दाराच्या दोन बाजूला दोन संगमरवरी दगडाचे, कोरीव काम केलेले कोनाडे किंवा 'गोकले' आहेत. एकाचे नाव 'जेठाणीना गोकला' आणि दुसऱ्याचे नाव 'देराणीना गोकला' वस्तुपालाची बायको जेठाणी हिने नऊ लाख रुपये खर्च करून एक 'गोकला' बांधला, तेव्हा इरेला पेटून वस्तुपालाचा भाऊ तेजपाल याची बायको देराणी हिनेही नऊ लाख रुयये खर्चून दुसरा 'गोकला' बांधला, असे सांगतात !

चौथे ऋषभ भगवानाचे मंदिर लहानसेच आहे. त्यात पहाण्यासारखे काही नाही. त्यातली एकच उल्लेखनीय गोष्ट म्हणजे आतली मूर्ती दगडाची नसून सोने, चांदी, तांबे, वगैरे अनेक धातू मिळून केलेली आहे. ही चार मंदिरे पाहून बाहेर पडले की रस्त्याच्या कडेला बऱ्याचशा वर गेलेल्या पायऱ्या आणि उंचवटयावर एक जुनाट मंदिर दिसते. हे दिगंबर जैनांचे आहे. साध्या दगडांचे हे एक पडित मंदिर आहे. पहाण्यासारखे त्यात काहीच नाही.

* * *

## अविस्मरणीय मारवाडी रात्र

आता काळोख पडत होता. मळकट लोक, मळकट कपडे, मळकट जमीन आणि आता आकाशही मळकट होऊ लागले होते. स्टेशनात परत आलो तेव्हा काळोख पडला होता. आणि या टोका-पासून त्या टोकापर्यंत सर्वत्र शुकशुकाट झाला होता. रात्री बारा–एक वाजेपर्यंत गाडी नसल्यामुळे स्टेशन मास्तर, कारकून, हमाल, फेरीवाले, तिथे कुणीच नव्हते. सबंध स्टेशनात कुठे दिवा नव्हता.

तो गुडुप काळोख आणि भयानक शुकशुकाट यामुळे कसेसेच वाटू लागले. वेटिंगरूममधल्या दोन आरामखुर्च्या बाहेर ओढून आम्ही बोलत बसलो, पण फारसे बोलावेसेही वाटेना. कुठे पाय वाजले तरी काय होईल आणि काय नाही असे वाटू लागले. लांब मिशांचे आकडे वळविलेला आणि तंग तुमान आणि सदरा घातलेला, नाटकातल्या खलपुरुषासारखा दिसणारा एक उंच, किडकिडीत माणूस काही वेळाने तिथे आला आणि आमच्याकडे नजर टाकून वेटिंगरूममध्ये शिरला. पहिल्यांदा तो कोण आहे हे समजलेच नाही. काडयाची पेटी काढून वेटिंगरूममधला दिवा तो लावू लागला, तेव्हा तो वेटिंगरूमचा अटेंडन्ट आहे हे समजले आणि जीव खाली पडला. वेटिंगरूममधल्या दिव्याला काचेची चिमणी नव्हती. तेव्हा काकडयासारखी दिव्याची वात ढणाढणा पेटत होती. आणि तिचा थरथरणारा तांबडा पिवळा प्रकाश आणि त्याबरोबर वेटिंगरूमच्या भकास भिंतींवर नाचणाऱ्या छाया यामुळे वातावरण अधिकच विकट वाटू लागले. मधूनच छपरावरून कुणीतरी चालले आहे असे 'कुड कुड कुड कुड' 'खुड खुड खुड खुड' आवाज ऐकू येत होते. इकडे तिकडे पाहिले. काही लक्षात येईना. इतक्यात एक दोन पाकोळ्या तीरासारख्या कुठून तरी आल्या, आणि स्टेशनाच्या भिंतींवर ठिकठिकाणी लावलेल्या प्रेक्षणीय स्थलांच्या रंगीबेरंगी चित्रांच्या चौकटींमागे घुसल्या. या चौकटींमागे पाकोळ्यांनी घरे केली होती. आणि त्यांच्या धडपडीचा तो कुड कुड खुड खुड आवाज सारखा चालू होता. वारा पडला होता. समोर दिसणारी झाडपाने स्तब्ध होती. दुरून कुठून तरी डुम डुम डुम डुम असे, आफ्रिकी चित्रपटात जंगली जमातीच्या ढोलक्यांचे मंद गंभीर आवाज ऐकू येतात, तसे आवाज येऊ लागले. या ओसाड गावात कुणीतरी ढोलके वाजवून

होळीचा नाच करीत होते असे दिसते. काही वेळाने असाच दुरून कुठून तरी शंखाचा आणि देवळातल्या घंटांचा आवाज ऐकू येऊ लागला. या मंगल ध्वनींनी ती अवजड स्तब्धता हलली तेव्हा, कां कुणास ठाऊक, मनाला बरे वाटू लागले. समोर, पलीकडच्या रुळावर मालगाडीचे काही डबे उभे होते. वर पाहिले तो स्वच्छ निळ्या आकाशात चार दोन तारे हिऱ्यासारखे चमकत होते. आणि तारे क्षणाक्षणाला उजळणाऱ्या आकाशात इकडेतिकडे पटापट डोकावू लागले. मालगाडीच्या डब्यांना एकदम रूपेरी किनार दिसू लागली, आणि डब्यामागून हळूहळू वर येणारे पूर्णचंद्राचे हसतमुख दिसू लागले. जणू विषण्णतेच्या सागरातून प्रसन्नताच वर येत होती! ते मालगाडीचे डबे, ती स्तब्ध झाडपाने, तो एकाकी प्लॅटफॉर्म या सर्वांना आपल्या रुपेरी मायेत पूर्णचंद्राने गुरफटून टाकले. ते मळकट गाव, ते कळकट लोक, तो गुडुप काळोख, ती अवजड स्तब्धता, आकडेदार मिशांचा तो माणूस, ढणढणणाऱ्या दिव्याचा तो विकट प्रकाश, त्या पाकोळ्या, ते डुमडुमणे, तो घंटानाद, आणि या सर्व वातावरणाला उजळून टाकणारा, माल-गाडीच्या डब्यामागून झालेला तो पूर्णचंद्रोदय, ही मारवाडी रात्र मी कधीही विसरणार नाही!

# देवगिरीच्या पंचक्रोशीत

## चिं. वि. जोशी

प्रवास करणे मला मनापासून आवडते. ' केल्याने देशाटन पंडित-मैत्री सभेत संचार....शास्त्रग्रंथ-विलोकुन मनुजा चातुर्य येतसे फार '—असे जुन्या कवींनी केलेले वर्णन शाळेत शिकत असता मास्तरांनी पाठ करून घेतल्याचे मला आठवते आणि त्यात देखील आम्ही जरा डोके वापरून मास्त-रांना नुसत्या शास्त्रग्रंथांच्या विलोकनाने....पहाण्याने .... चातुर्य कसे येते हे विचारल्यामुळे मास्त-रांनी धारण केलेला नृसिंहावतार देखील अजून मला पक्का आठवतो. जात्याच हिंडावयाची आवड. त्यात मास्तरांनी वर्णन करून सांगितलेली उपयुक्तता आणि घरातील वारंवार बदलत जाणारी परिस्थिति ह्या योगाने मला अनेक

ठिकाणचा प्रवास घडला आहे हे नमूद करण्यात मला मोठा आनंद वाटतो.....


प्रवासाला निघावयाचे खरे ! पण एकदमच कोठे जावयाचे म्हणून आम्ही काही जण विचार करीत बसलो होतो. परीक्षा नुकत्याच संपल्या होत्या. अभ्यासाचे डोक्यावरचे ओझे खांद्यावरून भिरकाऊन टाकून देऊन आम्ही अगदी मोकळे झालो होतो. टेबलावर नाटके, कादंबऱ्या, कवितासंग्रह व पत्त्यांचे जोड, कोपऱ्यात कॅरम बोर्ड व ऐसपैस अंथरून ठेवलेली बैठक एवढेच साहित्य आमच्या अभ्यासगृहात दिसू लागले होते. गजराचे घड्याळ टेबलावर खरे. चारचा गजरही लावलेला दृग्गोचर होत होता पण वर पहावे तो आकडा ( क्लिप ) ‘ सायलेंट ’ वर !! अशा अव्यवस्थित वातावरणात आम्ही सर्व जण नांदत होतो. ‘ मे महिन्याची रजा लवकरच सुरू होणार ’ एक जण म्हणाला. ‘ हं.... मग काय ’ दुसरा प्रश्न करू लागणार इतक्यात तिसरा अभ्यासू व जिज्ञासू विद्यार्थी म्हणतो, ‘ हे पहा बुवा, ह्या वर्षाची रजा फुकट नाही दवडावयाची. काही तरी ऐतिहासिक स्थळे पहाण्यात आणि हिंदुस्थानचे पूर्व वैभव पाहून, अभ्यासून, थोडीशी माहिती मिळविण्यात घालवावी ’ अशी माझी सूचना आहे. काही टारगटांनी “ अहो स्कॉलर ! जाऊ द्याहो !! सोडा नाद !! प्राचीन आणि अर्वाचीन !! ते करावयाला तुम्ही नको !! ‘ भारत–इतिहास–संशोधक मंडळ ’ काय करते आहे ? ” असे म्हणून विरोध केला इतकेच नव्हे तर त्यास आमच्या कंपूतून प्रवास करण्याचे नाकारले. त्याच बैठकीत अखेर ‘ वेरूळची लेणी ’ पहावयास जाण्याचा आमचा बेत ठरला. .......

* * *

: २ :

....आम्ही मुकबरा पहाण्यास गेलो. आग्र्याचा ताजमहाल *ज्याला पहाण्याचे भाग्य लाभले नाही अगर ह्या जन्मात लाभणार* नाही, त्याने हा औरंगाबाद येथील ताजमहाल तरी पहावा असे लोक म्हणतात. त्याप्रमाणे आम्ही हा ताजमहाल बघण्याकरता गेलो. दुरूनच दिसणारा महाल पाहिल्याबरोबर साम्याची मूर्तिमंत कल्पना डोळ्यांपुढे उभी राहिली. ताजमहालचा फोटो व मुकब-ऱ्याची समोर दिसणारी इमारत ह्यात बिलकूल फरकच नाही असे वाटले. अगदी तोच नमुना, तसाच बाग, तशीच फरशी, तशीच रत्नजडित भिंत, तसेच दरवाजे, तसेच मिनार, तशीच आतील कबर, बस्स,....अगदी तोच; पण काहींच्या मते ' कुठे इंद्राचा ऐरावत व कुठे शामभटाची तट्टाणी ' अशापैकी हा 'ताज' वाटतो. यमुनेच्या तीरावर जशी ती इमारत आहे तशी ही इमारत कोणच्याही नदीतीरावर नाही एवढीच काय ती उणीव आहे. बाकी ते शहाजहानच्या प्रेमाचे स्मारक आहे तर हे औरंगजेबाच्या प्रेमाचे स्मारक आहे. तेथे जितकी पवित्रता आहे तेवढीच पवित्रता येथे आहे, तेथे जितके सौंदर्य आहे तेवढेच सौंदर्य येथे आणण्याचा प्रयत्न केला आहे. तेथे जेवढा आल्हाद मिळतो तेवढाच आल्हाद येथे देखील मिळतो. कोणत्याही प्रकारचा उणेपणा वाटत नाही. मग लोकांनी असे कां म्हणावे ह्याचे कारण समजत नाही.

ह्या इमारतीभोवती दगडी कोट असून आत जाण्याचे प्रवेश-द्वार दक्षिणाभिमुख आहे. आत शिरताना देवडीवर बसलेले फकीर ' अल्लाहि देगा ' ' अल्लाहि देगा ' करीत बसलेले दिसतात. पण ह्या फकिरात आणि गावात भटकणाऱ्या फकिरात भेद तावडतोब दिसून येतो. येथे बसणारे फकीर तसे निरिच्छ असतात. त्यांच्या



बीबीका मुकबरा

वागणुकीत, बोलण्यात, बसण्यात मगरूरता नसते. 'अल्ला' 'अल्ला' 'खुदा' 'खुदा' करीत शांतपणाने बिचारे दिवस सुखाने घालवतात.

आत गेल्यानंतर आजूबाजूचा सुंदर बाग; नयनमनोहर अशी पुढे समोर दिसणारी इमारत; समोरच मध्यभागी दिसणारे कारंजे; एकदम मन मोहून टाकतात. अगोदर बागेत भटकावे की अगोदर इतिहासप्रसिद्ध अशी इमारत बघावी असे होऊन मन द्विधा होते. अखेर समोरच्या इमारतीकडे आमचे पाय वळले.

समोर जाण्याचा फरसबंदी रस्ता, त्यास असलेला दुतर्फी कठडा, जागजागी आढळणाऱ्या निरनिराळ्या रोपट्यांच्या कुंड्या, त्यातून खेळविलेले पाणी, त्यांचा सदैव दिसणारा हिरवेपणा, त्यांच्या

निरनिराळ्या घडविलेल्या आकृती इत्यादी पाहून मन प्रसन्न होते. नंतर पुढे कोरीव काम, भिंतीतून जडलेली रत्ने ( हल्ली काचाच ), त्यांचा हिसणारा चकचकाट, खाली फरसबंदीचा गुळगुळीतपणा, वर घुमटाची भव्यता, बाजूच्या मिनारावरून आजूबाजूचा दिसणारा देखावा, त्याचा मनावर उमटणारा ठसा, आत खाली खोलीत जुन्या जपून ठेवलेल्या वस्तू, शेजारासच असलेली कबर व त्यामुळे उद्भूत होणारे गंभीर वातावरण इत्यादी सर्व गोष्टी अवर्णनीय आहेत.

इमारतीच्या तळमजल्यात डाव्या हाताच्या एका खोलीत बेगमचे काही सामान संग्रहित करून ठेवले आहे. कबर पहाण्यास दुसऱ्या मजल्यावर जावे लागते. वर जाण्यास चारी बाजूंनी जिने आहेत. आम्ही डाव्या हाताच्या जिन्याने वर गेलो होतो. तेथे कठडा असून त्यापुढे पाण्याने भरलेला असा छोटासा हौद आहे. असाच एक हौद मागच्या बाजूस देखील आहे. पुढच्या बाजूस इमारतीच्या दोन कोपऱ्यांना दोन मनोरे आहेत. मध्यभागच्या इमारतीत आतल्या बाजूस मध्यभागी अष्टपैलू स्फटिकात मखरासारखे सुंदर नकशी काम असून त्याच्या मध्यभागी कबर आहे.

कबरस्थानाच्या तीन बाजूस बागेत अगदी गुळगुळीत दगडाच्या बांधलेल्या इमारती आहेत. एकीत कुराणातील वाक्ये लिहिलेली आहेत. बाजूस विहिरी, आजूबाजूस लाविलेली फुलझाडे, अशा खूप खूप विलासप्रिय वस्तू येथे सापडतात.

औरंगाबादचा हा ताज पाहून आमचे नेत्र संतुष्ट झाले, पण त्यावरच टीका वाचून आमच्यात तौलनिक दृष्टी उत्पन्न झाली. ‘ हा चांगला की तो चांगला ’ अशावर आमचे विवेचन सुरू झाले. ‘ अस्सल ते अस्सलच. ह्यापुढे नकलेचा काय पाड ? ’ मी म्हटले. दुसरा म्हणतो, ‘ गोष्ट खरी, पण नक्कल देखील सही शिक्क्या-

निशी असली की अस्सल इतके काम देते.' तिसऱ्याने सुचविले 'ह्याचे उदाहरण पहा—कलकत्त्याच्या व्हिक्टोरिया मेमोरियल वस्तुसंग्रहालयात 'ताज'ची कृत्रिम का होईना एक नक्कल केलेली आहे. तेथे संगमरवरी दगड वापरून नक्कल अगदी व्यवस्थित केली आहे.' चवथ्याने दुजोरा दिला–'ह्यापेक्षा ते जास्त रमणीय दिसते.' अखेर आम्ही 'अस्सल' आणि 'नक्कल' करता करता, प्रत्येक 'ताज'ची स्तुतिस्तोत्रे गात परत फिरलो.

: २ :

कैलास लेण्याच्या महाद्वारापाशी आलो व थक्कच झालो मुळी ! इमारतीची भव्यता, प्रमाणशुद्ध बांधणी, काळा पहाड, त्यातून केलेले कोरीव काम वगैरे पाहून क्षणभर आम्ही स्वतःस विसरलो ! आम्ही आपणापुढे पाहातो आहोत काय ? आम्ही आहोत कुठे ? ह्याची आम्हाला जाणीवही नव्हती ! इतक्या आश्चर्यमग्नतेत आम्ही असता आमचा मार्गदर्शक आम्हाला म्हणाला, 'चला आता आत.' तेव्हा आम्ही जरासे शुद्धीवर आलो व त्याला म्हणालो, 'जरा आजूबाजू तर पाहू दे ! मग आत घेऊन चल !' त्याने आम्हाला जरासे मागे नेले व वर देखावा बघण्यास सांगितले व कैलास कशावर आधारलेले आहे हे नीट निरखून पाहाण्यास सांगितले. आमच्या ठायी ती दृष्टी त्याने सुचविल्यानंतर आली व आम्ही मनात आमच्या रसोद्ग्रहणशक्तीस दोष दिला.


कैलास देवळाकडे वर बघितले तर उंचच उंच अशी ती इमारत दिसली. शेवटपावेतो केलेले नकशीकाम खालून देखील उठावदार दिसत होते. ठिकठिकाणी खांबावर, भिंतीवर कोरलेल्या निरनिराळ्या मूर्ती खालूनदेखील ओळखता येण्यासारख्या होत्या.

शिखराला आकाश येऊन भिडले आहे की काय असा भास होत होता.

खाली आम्ही पाहू लागलो तो जास्तच आश्चर्यचकित झालो. निरनिराळ्या पशूंची तोंडे आम्हाला आत दिसली. त्या पशूंनी आपल्या पाठीवर कैलासाला तोलून धरले आहे असे दाखविण्याची कोरणारांची इच्छा दिसते. वाघाची तोंडे तर पुष्कळ ठिकाणी दिसतात. शरीरे सर्व कैलासाच्या खाली झाकली गेली असल्याने ती दिसणे शक्य नव्हते.

आम्ही आमच्या कल्पना आमच्या वाटाड्यास सांगितल्या. त्याला वाटले 'बरे झाले आपल्यास बोलावयाचे कमी!' नंतर आम्ही महाद्वारातून देवळात प्रवेश केला. पण महाद्वारापावेतो येता येता आम्हाला अनेक दरवाजे, खिडक्या लागल्या. ह्या सर्व नकशीकामाने कोरलेल्या असून प्रेक्षणीय आहेत. आतील गुळगुळीत अशी फरशी, इमारतीचे भले मोठे खांब, प्रशस्त अशा ओवऱ्या, पुष्कळशी लांबरुंद अशी मोकळी जागा हे सर्व पाहिले म्हणजे लेणी कोरताना लागलेला वेळ, पडलेले श्रम आणि अंगी असलेला धीरतेचा गुण ह्यांची कल्पना बरोबर पटते.

महाद्वारापाशी आलो तो एक नवीनच गोष्ट पहावयास मिळाली. द्वारपाल म्हणून स्त्रियांची चित्रे येथे आढळली. कैलासाचे काम पार्वतीसाठीच केले असल्यामुळे त्या रंगमहालावर—'कैलासा'ला रंगमहाल म्हणत असत—स्त्री-द्वारपालांची योजना केली असावी असे एक लेखक म्हणतो. ह्याच महाद्वारावर नगारखानाही असल्याचे कळले. ह्यातून आम्ही आत गेलो, तो लक्ष्मीची मूर्ती दृष्टीस पडली. हा देखावा अत्यंत रमणीय असा वाटला.



केलास लेणे

मध्यभागी कमल असून त्यावर श्रीलक्ष्मी देवी आसन घालून बसल्या आहेत. आजूबाजूस दोन हत्ती आपल्या सोंडेत धरलेल्या पात्राने ‘ श्री ’वर अभिषेक करीत आहेत. खालून दुसरे दोन हत्ती भांडी पाण्याने भरून त्यांना पाणी पुरवीत आहेत.

येथूनच आजूबाजूस पाहिले तो समोरासमोर उभे असलेले दोन हत्ती दिसले. आज ते तेथे असतीलच असेही सांगवत नाही, कारण आम्ही गेलो त्याच वेळी ते छिन्नविछिन्न झालेसे दिसत होते. कदाचित ते सुस्थितीत ठेवले गेले असले तर ते असतीलही.

नंतर आम्ही जरा आत शिरलो. मध्यभागी नंदीचे वास्तव्य दिसले. त्यास वंदन करून आम्ही मोठ्या सभामंडपातून शिव-

लिंगाच्या दर्शनास गेलो. ह्या सभामंडपात शिरण्यास पाच दरवाजे असून तो बराच प्रशस्त असा आहे. नकशीदार खांब, गुळगुळीत फरशी, सुबक रंगविलेले छत, खेळती हवा व पुरेसा प्रकाश ह्यामुळे सभामंडपाची शोभा वाढली आहे. सभामंडपाच्या मध्य-भागी छतावर श्रीलक्ष्मीनारायणाची मूर्ती खोदलेली आहे. तिच्यात एक वैशिष्ट्य आहे. ह्या मूर्तीकडे सभामंडपाच्या कोणत्याही कोपऱ्यातून बघितले तरी मूर्तीची नजर आपणाकडेसच आहे असे वाटते. ही मूर्ती पहाण्यात आम्ही बराच वेळ घालविला.

आतील मंदिर गाभाऱ्यात खोल नसून सभामंडपाच्या पृष्ठ-भागाबरोबरीच्याच उंचीवर आहे. देवळास प्रदक्षिणा घालावयाची सोय आहे. ती प्रदक्षिणा घालीत असतानाच आजूबाजूची पाच देवळे लागतात. हा भाग बरीक बराच उंचीवर असल्याने प्रदक्षिणा घालताना खाली पाहिले असता मौज वाटते. एखाद्या मनोऱ्यावर जावे आणि तेथे असलेल्या सज्जातून चारी बाजूस फिरून खाली बघावे म्हणजे जसे वाटते तसेच येथे प्रदक्षिणा घालताना वाटते.

देवळाभोवती असलेल्या ओवऱ्यातून पुष्कळशी चित्रे खोदलेली आढळतात. सगळी बारकाईने पहावयाला लागले तर वेळ जातो व पुन्हा तेन् तेच पाहिल्यासारखे वाटते. ते सर्व पाहून जसेच्यातसे सर्व लिहावयाचे म्हटले तर पौराणिक कथा सांगता सांगता आटोपशीर आकारात आटोपता येणे शक्य नाही. ओवऱ्या-तून असलेली खोदकामे रामायण, महाभारत, शिवलीलामृत वगैरे ग्रंथातून वर्णिलेल्या कथांची आठवण करून देतात. त्याशिवाय नर-सिंहावतार, वामनावतार, वराहावतार अशी चित्रे आहेतच. कालिया-मर्दन आणि गोपींमधील कृष्ण हे देखावे देखील प्रेक्षणीय वाटले.

# घारापुरी

स. आ. जोगळेकर

घारापुरीची लेणी अद्वितीय आहेत—आणि महाराष्ट्राचे एक अभिमानस्थान आहे.

मुंबईच्या हिंदुस्थान-महाद्वारापासून घारापुरी बेट सुमारे सात मैलांवर व कोकण किनाऱ्यापासून सुमारे चार मैलांवर आहे. या छोटया बेटाचा परीघ पाच मैलांहून कमी आहे. त्यावरील डोंगरही असेच छोटेखानी आहेत. मोरे बंदर, राजबंदर उर्फ घारापुरी व शेटे बंदर अशी तीन खेडी व उतार या बेटावर आहेत. महाद्वाराजवळून घारापुरीला जाण्यासाठी सकाळी व संध्याकाळी सोयीस्कर व स्वस्त बोटी, पडाव व होडया मिळतात. सकाळी जाऊन संध्याकाळी परत यावे, म्हणजे सर्व ठिकाणे नीट पाहता येतात. हा छोटा प्रवास सुखासुखी होऊ देणे न देणे सागराच्या लहरींवर अवलंबून असते.

चालू उतार बेटाच्या वायव्येस व जुन्या उतारापासून सुमारे अडीचशे यार्डांवर आहे. येथील धक्का अलग व निसरड्या दगडांचा असल्यामुळे संभाळून चालावे लागते. लेणी धक्क्यापासून अर्ध्या मैलावर आहेत. येथून लेण्यांच्या पातळीपर्यंतचा रस्ता दगडी बांधीव आहे. घारापुरीला महाशिवरात्रीस यात्रा भरत असल्यामुळे यात्रेकरूंच्या सोयीसाठी करसनदास रणमल या शिवभक्त लोहाणा व्यापाऱ्याने १८९३ साली सुमारे बारा हजार रुपये खर्च करून हे बांधकाम केले. श्रीमंत वा अशक्त प्रवाशांना वाहून नेण्यासाठी येथे खुर्च्याही तयार असतात.

हिंदुस्थानात जी लेणी आहेत त्यांपैकी विशेष महत्वाची अशी लेणी महाराष्ट्रातच आहेत. केवळ संख्येच्या व ऐतिहासिक महत्त्वाच्या दृष्टीनीच नव्हे, तर शिल्पशास्त्राच्या दृष्टीनेही. ही सारी लेणी देशावर आहेत आणि काही कोकणातही आहेत. फक्त घारापुरीची लेणी समुद्रवलयांकित आहेत. या दृष्टीने ती अद्वितीय आहेत.

भारतात लेणी खोदण्याची प्रथा प्रथम बौद्धांनी प्रस्थापित केली. लेणी खोदण्याचे तंत्र व मंत्र त्यांनीच निर्माण केले. यामुळे नंतर खोदण्यात आलेली लेणी त्याच धर्तीवर खोदण्यात आली. मात्र घारापुरीच्या लेण्यांची मांडणी व धाटणी अगदी स्वतंत्र आहे.

नाशिक, अजंठा, वेरूळ, बदामी, कार्ले व घारापुरी ही महाराष्ट्राच्या प्राचीन व मध्ययुगीन सामर्थ्याची, समृद्धीची व संस्कृतीची प्रतीके व आमची अभिमानस्थाने आहेत.

घारापुरीच्या शिल्पकारांनी येथे आपले कौशल्यसर्वस्व प्रकट केले आहे. डि कौटो सांगतो की मेणावर किंवा सोन्यावर करता येणार नाही इतके नाजूक काम येथे दगडावर केलेले आहे.

घारापुरीच्या विविध मूर्तीत शिल्पकाराचे नाजूक कौशल्यच नव्हे तर महाराष्ट्राचे काव्यपूर्ण व भक्तिपूर्ण अंतःकरण आणि कणखर जिवंतपणाही प्रगट झालेला आहे.

* * *

येथील त्रिमूर्ती ही प्रतिमा महाराष्ट्रातच नव्हे तर भारतात अद्वितीय आहे. केवळ आकाराने प्रचंड अगर अपूर्व मूर्ती या दृष्टीनेच नव्हे तर शिल्पकौशल्याच्या दृष्टीनेही जगातील उत्कृष्ट शिल्पकृत्यात या मूर्तीची गणना करण्यात येते.

ब्रह्मा, विष्णू व महेश यांना जगाची उत्पत्ती, स्थिती व लय यांचे कारक मानण्यात येते. त्रिमूर्तीत या तीन देवांचा व शक्तींचा समन्वय करण्यात आला आहे. कोणी म्हणतात की, या तीन देवता अनुक्रमे रज, सत्त्व व तम यांच्या द्योतक आहेत. मैत्रायणोपनिषदात सगुण त्रिमूर्तीकल्पनेचा पहिला उल्लेख आढळतो. प्रेक्षकांच्या डावीकडे रुद्र, मध्ये ब्रह्मदेव आणि उजवीकडे विष्णू अशी ही त्रिमूर्ती आहे, असे साधारणत: मानण्यात येते. प्राचीन व मध्ययुगीन संस्कृत ग्रंथातील त्रिमूर्ती–शिल्पाच्या वर्णनावरून वाटते की त्यांना अभिप्रेत असलेल्या मूर्ती आपादमस्तक असल्या पाहिजेत. श्री. खरे यांनी मूर्तीविज्ञानात पेशावर म्युझियममधील त्रिमुख महेशाचे चित्र दिले आहे. ते हुबेहूब आधुनिक दत्तात्रेया-सारखे दिसते. श्री. गोपीनाथराव यांनी आपल्या ग्रंथराजात शिवप्रमुख व विष्णुप्रमुख त्रिमूर्तीची माहिती व चित्रे दिली आहेत. मध्यस्थानी असलेल्या मूर्तीवरून त्यांनी हे वर्गीकरण केलेले आहे. प्रचलित प्रवाद गृहीत धरून या दृष्टीने पाहिले तर घारापुरी येथील त्रिमूर्ती ब्रह्मप्रधान आहे, असे म्हटले पाहिजे. त्रिमूर्तीकल्प-

नेला सांप्रदायिक स्वरूप आले तेव्हा ज्याचा जो देव त्यास देवाधिदेव व इतरांना त्याचे अंश असे मानण्यात येऊ लागले. याप्रमाणे कित्येकांचे म्हणणे आहे की शिव हाच महादेव, देवाधिदेव, तोच जगदुत्पत्तीस्थितीलयकर्ता; म्हणून ही तिन्ही रूपे शिवाचीच आहेत.

त्रिमूर्तीच्या गाभाऱ्याला साडेपंधरा फुटांची मोकळी असलेली चौकट आहे. चौकटीच्या डाव्या उजव्या कोपऱ्यात खोबणी आहेत; दाराचे आख धरण्यासाठी त्या खोदण्यात आल्या असल्या पाहिजेत. आखावर फिरणारी जुन्या पद्धतीची दारे ज्यांनी पाहिली आहेत त्यांना हा तर्क सहज पटण्यासारखा आहे. आज अस्तित्वात असलेल्या चालुक्यकालीन देवालयामध्येही अशा दाराची योजना आढळते. येथे निदान कटांजन तरी असलेच पाहिजे.

चौकटीच्या दर्शनी बाजूंना डाव्या उजव्या अंगांना दोन प्रचंड द्वारपाल आहेत. उजवीकडील द्वारपाल पावणेतेरा व डावीकडील साडे तेरा फूट उंचीचे आहेत. कोपराजवळ वाकलेले त्यांचे अनुक्रमे डावे व उजवे हात बुटक्या शिवगणांचे मस्तकावर टेकलेले आहेत. दोन्ही द्वारपालांच्या मस्तकावर वेगवेगळ्या धर्तीचे व तपशिलासह खोदलेले मुकुट आहेत. त्यांच्या कानांच्या पाळ्यात वर्तुळाकार कुंडले आहेत. उजव्या द्वारपालाच्या छातीजवळचा भाग फुटून गेला आहे. त्याच्या धोतराचा सोगा कमरेभोवती गुंडाळून गाठ मारून एका बाजूला लोंबता सोडलेला आहे. डावीकडील द्वारपालाच्या गळ्यात रुद्राक्षांचा हार आणि या खांद्यापासून त्या खांद्यापर्यंत पुष्पमाला किंवा उपवस्त्राची गुंडाळी आहे. त्याच्या दंडावर सर्पाची वलये आहेत. त्याच्या कोपरापासून खालचा सर्व भाग फुटून गेलेला आहे.

चौकटीच्या आतल्या बाजूला असलेला गाभारा अधिक विस्तृत आहे. त्याची लांबी रुंदी सुमारे साडेएकवीस फुटांची असून खोली तेरा फुटांची आहे. या गाभाऱ्यात अडीच फूट उंचीच्या आसनावर त्रिमूर्तीची प्रतिमा आहे. तीत फक्त हृत्कमला-पासूनचा वरचा भाग दर्शविलेला आहे. मूर्तीचे खोदकाम उठावाच्या पद्धतीचे आहे, म्हणजे प्रतिमेभोवती प्रदक्षिणा घालता येत नाही. शिरस्त्राणासह मूर्तीची जास्तीत जास्त उंची सतरा फूट दहा इंच आहे. रुद्रमुखाची उंची सर्वात जास्त म्हणजे पाच फूट असून विष्णुमुखाची उंची चार फूट आहे. भिवयांच्या पातळीत मूर्तीचा घेर पावणेतीस फूट आहे. या मापावरून या मूर्तीच्या प्रचंडतेची कल्पना येईल.

ब्रह्मदेवाची मुद्रा शांत आहे, श्वास रोधून धरलेला आहे. गळ्यात मोत्यांचा हार व छातीवर मोत्यांची पेंडी व रत्नांचे लोलक लावलेला जडावाचा हार आहे. डाव्या हातात महाळुंग आहे. महाळुंग हे गर्भाचे प्रतीक आहे. उजवा हात तुटलेला आहे. डॉम कास्ट्रो याने म्हटल्याप्रमाणे ही मूर्ती ब्रह्मदेवाची आहे असे गृहीत धरून गॅझेटियरकार तर्क करतात की या हातात वेदाची पोथी असली पाहिजे. त्याच्या कानांच्या पाळ्या लांब असून शिवपूजकाप्रमाणे फाटलेल्या आहेत. उजव्या पाळीत व्याघ्र–कुंडल व डाव्या पाळीत मकर–कुंडल आहे. या कुंडलाचे वजन पेलण्यासाठी त्यांना बाळ्या जोडलेल्या आहेत. मस्तकावर जटाभार असून त्यावर जडावाचे काम केलेला उंच मुकुट आहे; त्यात चंद्रकोर आहे आणि कानांवर व कपाळावर पदके आहेत. कपाळपट्टीवरील जडावाचे काम कीर्ति-मुखाच्या धर्तीचे आहे. त्याबद्दल अर्स्किन म्हणतो की ते हिंदूंच्या अभिजात अभिरुचीचे उत्कृष्ट उदाहरण आहे.

रुद्रमूर्तीची मुद्रा मत्त आहे. अर्स्किन म्हणतो, ही मुद्रा व्यसनासक्ती दर्शविते. कॅप्टन हॉलला वाटले की रुद्राच्या मुखावर आनंद दिसतो, राग दिसत नाही, कारण त्याच्या गालावर खळगा आहे; त्याला वाटले की तो सर्पसंगीत गात आहे. बर्गेसला रुद्रमुख सस्मित दिसले. कोणाला तर वाटले की रुद्र भांग पिऊन मस्त झाला आहे. अशा अनेक भावनांचा संयोग रुद्रमुखावर झालेला दिसतो. रुद्राच्या कपाळावर मध्यभागी उंचवटा आहे. त्यावरून तेथे त्याचा तिसरा नेत्र असावा असे वाटते. रुद्राच्या तिसऱ्या नेत्राचा प्रभाव कोणाला माहीत नाही ? रुद्राची भिवई नासिकाग्राजवळ वाकलेली आहे; जणू तो आपल्या शक्ती प्रयत्नपूर्वक आवरून धरीत आहे. ओठावर मिशा आहेत; त्यांना जणू सामर्थ्याच्या अहंकाराचा पीळ भरलेला आहे. रुद्राची हनुवटीही इतर प्रतिमांहून भिन्न असून ती त्याचे निश्चयी व अपरंपार सामर्थ्य दर्शविते. ओष्ठसंपुट जरा उन्मीलित आहे; वाटते की त्यातून जिव्हाग्र व दंतपंक्तीतील एक दात जरा दिसत आहे. रुद्राच्या मस्तकावर मुकुट आहे. ब्रह्मदेवाच्या मुकुटाहून हा उंचीला कमी आहे, त्याची ठेवणही वेगळी, रुद्राच्या स्वभावानुरूप आहे. मुकुटावर जागोजाग सर्पाची वेटोळी आणि वर फणा काढलेला नाग आहे. कपाळपट्टीवर नरकपाल आहे आणि त्यासन्निध शंकराला प्रिय असलेली पाने–फुले आहेत. रुद्राच्या उजव्या हातात फणा काढलेला नाग आहे, जणू त्याचा रुद्रावरच रोख आहे; आणि रुद्र जरा प्रेमाने, जरा कौतुकाने, जरा रोषाने, जरा बेफिकीरपणे, जरा हट्टाने त्याच्याकडे पाहत आहे ! रुद्राच्या गळ्यातही नाग असावा असे वाटते; कारण रुद्र व ब्रह्मदेव यांचे मधोमध पाळीच्या पातळीत त्याची फणा उभारलेली दिसते.

विष्णूची मुद्रा प्रसन्न आहे. चेहऱ्याची ठेवण पार्वतीला साजेल अशी मृदू व नाजूक आहे. या मूर्तीचा मुकुट असा खोदलेला आहे की तो वजनातही हलका असावा असे वाटावे ! मुकुटाखाली कुरळ्या केसांच्या बटा रुळत आहेत; या बटांनी कान झाकून गेलेले आहेत. मुकुटाला मोत्यांच्या माळा व घोस आहेत; मुकुटाच्या वरच्या अंगाला उमललेले कमल आहे. जणू मुकुटाच्या मागच्या पोकळीतून ते आतल्या कुरळ्या केसात खोवलेले आहे. विष्णूच्या उजव्या हातात कमल आहे.

घारापुरीच्या त्रिमूर्तीच्या बाबतीत संशोधकांनी व्यक्त केलेली दोन मते, एक—की या मूर्तीत ब्रह्मा, विष्णू व महेश यांचा समन्वय आहे, आणि दुसरे—की ही तिन्ही रूपे शंकराचीच आहेत; ही दोन्हीही ठाम नाहीत, कारण या मूर्तीशी इतरांची तुलना करून काही निष्कर्ष काढावा असे म्हटले तर अशा मूर्ती इतरत्र नाहीत; आणि या मूर्तीवरील प्रतीकांचा कोणी तुलनात्मक अभ्यास केलेला नाही. प्रो. स्टेला क्रामरीश यांनी या विषयावर अलीकडे एक लेख लिहिलेला आहे. हा लेख आणि त्यांचे विद्यार्थी श्री. नियोगी यांनी घेतलेली छायाचित्रे ‘ प्राचीन भारत ’ या सरकारी नियतकालिकात प्रसिद्ध झाली आहेत. या लेखात त्यांनी सिद्ध केले आहे की ब्रह्मा, विष्णू व महेश या त्रिमूर्तीची ही मूर्ती नसून तीत महादेवाचीच तीन रूपे दिग्दर्शित केलेली आहेत. या लेखाचा सारांश असा : “ शंभूच्या वदनपंचकाचा तपशील विष्णु-धर्मोत्तरात सांगितलेला आहे. शंकराच्या पंचमुखी लिंगाला चार दिशांना चार मुखे असतात व ती मध्यवर्ती लिंगाभोवती खोदलेली असतात. आणि इतकी मुखेही खोदावी लागत नाहीत. देवाल-याच्या गाभाऱ्याला चार, तीन, दोन अगर एक, जितकी द्वारे

असतील तितकी मुखे दाखविण्याचा प्रघात आहे. शंकराच्या तत्पुरुष या स्वरूपाच्या एका हातात महाळुंग हे जीवनाच्या बीजाचे व अमक्षाला हे जीवनाच्या अखंडतेचे, पुनरुज्जीवनाचे प्रतीक. शंकराचे अघोर हे स्वरूप घोर, रुद्र, काळासारखे असते; सर्प व अस्थिपकाल ही त्यांची प्रतीके. शंकराचे वामदेव हे स्वरूप सुंदर, स्त्रियांना सुरम्य असे असते. ईशान, तत्पुरुष, अघोर, वामदेव व सद्योजात या शंकराच्या पाच रूपांना सदाशिव, महादेव, भैरव, उमा व नन्दिन अशा वैकल्पिक संज्ञा विष्णुधर्मोत्तरात दिलेल्या आहेत. घारापुरीच्या त्रिमूर्तीत तत्पुरुष महादेव मध्ये, डावीकडे अघोर–भैरव व उजवीकडे वामदेव–उमा ही स्वरूपे दाखविली आहेत." या सर्व प्रतीकांवरून त्यांनी निश्चित निर्णय काढला आहे की ही मूर्ती देवाधिदेव महादेवाचीच आहे.

आणि ज्यांचे मन पूर्वग्रहाने अगर अभिनिवेशाने दूषित झालेले नाही त्यांना हे समीकरण खात्रीने समाधानकारक वाटेल. ही मूर्ती खोदण्यात आली त्यावेळी दत्तात्रेयाची कथा निर्माण झालेली असली तरी त्याची उपासना विशेष रूढ झालेली नव्हती. आपल्याकडील बहुजनसमाजाच्या मनातील त्रिमूर्तीची कल्पना दत्तात्रेयाच्या मूर्तीवर अधिष्ठित झालेली आहे आणि ती अगदी अर्वाचीन असल्यामुळे तिचा आरोप या प्राचीन मूर्तीवर करणे अयोग्य आहे.

मूर्तिकाराने ही मूर्ती किती कौशल्याने घडविलेली आहे पहा. महादेवाच्या या तीन रूपात किती फरक आहे आणि तोही किती कौशल्याने दाखविला आहे. प्रत्येकाची प्रतीके वेगळी आहेत; एवढेच नव्हे तर त्यांच्या चेहऱ्यांची ठेवण वेगळी, मुखावरील आविर्भाव वेगळे, ज्या त्या मूर्तीच्या स्वभावानुरूप; ज्याचे त्याचे

मुकुटही ज्या त्या स्वरूपाला साजतील असे कोरलेले आहेत; आणि सर्वांचे नेत्र मिटलेले असूनही भिन्न भाव व्यक्त केलेले आहेत, हे विशेष. जणू अघोर–भैरवाला हा संसाराचा पसारा तुच्छ वाटत आहे, सामर्थ्याच्या मानवी वल्गनांबद्दल तिरस्कार वाटत आहे. तांडवाला सुरवात करून चित्–शक्तीचा हा खेळ उधळून देण्याची कल्पना तो आवरून धरीत आहे. तत्पुरुष महादेव सृष्टीकडे अशा नजरेने पाहत आहे की जणू यजमान आपल्या आश्रिताच्या कर्तृत्वाचे कौतुक करत आहे; त्याच्या मुद्रेत पालकाचे प्रोत्साहन आहे. संरक्षकाने दिलेल्या अभयाचा कृतनिश्चय आहे. तर वामदेवाच्या मुखावर मातेचे वात्सल्य आहे, आशीर्वाद आहे; निर्माण व संहार या परस्परविरोधी शक्तींचा समन्वय केलेला आहे, अशा कौशल्याने की, प्रेक्षकाला त्यामधील विरोध दिसावा, त्याचे सामर्थ्य भासमान व्हावे, पण त्याने त्यामुळे निराश होऊ नये. त्याला वाटावे की, सृष्टीवर संरक्षक शक्तीचा वरदहस्त आहे. हा विश्वास निर्माण व्हावा म्हणूनच स्थिति–शक्तीला मध्यस्थान देण्यात आले आहे असे वाटते. डावीकडील नागराज हे संहाराचे प्रतीक, तर उजवी-कडील उत्फुल्ल कमल हे उत्पत्तीचे; विष दाहक तर सुगंध तोषक; सृष्टीच्या शक्तिबीजाचे धारण व रक्षण मात्र महादेवाच्या हाती आहे आणि रुद्राच्या तांडवातूनही तो त्याचे रक्षण करील हेच सृष्टीच्या तीनही अवस्थांचे रहस्य. या दृष्टीने पाहता त्रिमूर्ती हेच आमच्या संस्कृतीचे प्रतीक आहे. मनुष्य निरीश्वरवादी नसेल तर त्याला ही त्रिमूर्ती पाहता असे वाटते की जग नश्वर असले तरी अशा शक्तींचा पाठिंबा व आशीर्वाद असल्यावर आपल्याला जगात अशक्य व अजिंक्य असे काय आहे ?

* * *

सती उमा ही शिवाची प्रथम पत्नी. दक्षाने यज्ञप्रकरणात शंकराचा अपमान केल्यामुळे सतीने आत्महत्या केली व हिमालयाच्या पोटी जन्म घेतला. ती पर्वताचे पोटी आली, म्हणून पार्वती. ती वयात आल्यावर नारदांनी भविष्य वर्तविले की ती शंकराशी विवाहबद्ध होणार. तेव्हा पित्याच्या प्रेरणेने ती शिवप्राप्तीसाठी तप करू लागली. इकडे शंकरानेही सतीच्या विरहामुळे त्रस्त होऊन तपश्चर्या सुरू केली होती. तारकासुराने देवांना त्रस्त केले; त्याचा वध शंकराच्या पुत्राच्या हातून व्हावयाचा होता. आणि शंकर तर तपश्चर्या करीत होता. देवांनी शंकराला विद्ध करण्याची कामगिरी कामदेवावर सोपविली. त्याने आपले काम केले पण बिचारा कामदेव मात्र समाधीभंगामुळे संतप्त झालेल्या शंकराच्या क्रोधानलाने दग्ध झाला. शंकरावर अनुरक्त असलेल्या पार्वतीने शंकराची सेवा करून त्याची प्रीती संपादन केली. तिला मागणी घालण्याकरता शंकराने हिमालयाकडे सप्तऋषी पाठविले. हिमालयाने ही मागणी मान्य केल्यानंतर त्यांचा विवाह झाला. यामुळे सर्व देवांना संतोष झाला व ते विवाह–समारंभाला हजर राहिले. तो प्रसंग या चित्रात दाखविलेला आहे.

घारापुरीच्या चित्रपटात हे चित्र सर्वोत्कृष्ट आहे. पार्वतीच्या मूर्तीबद्दल बर्गेस यांनी निर्वाळा दिला आहे की येथील सर्व मूर्तींमध्ये ही अत्यंत ‘ प्रमाणबद्ध व बांधेसूद ’ असून ती निर्माण करण्यात शिल्पकारांनी आपले कौशल्यसर्वस्व वेचले आहे. दुर्दैवाने या शिल्पाचीही बरीच मोडतोड झालेली आहे.

शंकराच्या चार हातांपैकी तीन अर्धवट तुटलेले आहेत, आणि उजवा पाय सबंध मोडलेला आहे. जटाभारावर उंच मुकुट आहे. मुकुटावरील नक्षीचे खोदकाम बारकाईने व काळजीपूर्वक

केलेले आहे. पाठीमागल्या बाजूला प्रभावलय आहे. शंकराच्या वस्त्राचा सोगा कमरेभोवती गुंडाळून गाठीचा पदर खाली लोंबता सोडलेला आहे. एक हात या गाठीवर ठेवलेला आहे. त्याच्या गळ्यात अलंकार व जानवे आहे.

पार्वतीची मूर्ती आठ फूट सहा इंच उंचीची असून तिचे शिर शिवाच्या स्कंधाइतके उंच आहे. पार्वती शंकराच्या उजव्या बाजूला आहे. पत्नीला उजवीकडील जागा फक्त विवाहाच्या वेळी देण्यात येते. तिच्या शिरावरील मुकुट जडावाचा असून त्याचा अग्रभाग मोत्यांच्या जाळीसारखा व पृष्ठभाग जरा उंच व वर्तुळाकार आहे. मुकुटाखालून बाहेर पडणाऱ्या केशभाराचा अंबाडा तिच्या डावीकडे दिसत आहे. सात्त्विक प्रीतीच्या लहरीने तिचे मुख जरा डावीकडे, शंकराकडे कललेले आहे. कानात कर्णफुले व कुण्डले आहेत आणि गळ्यात अनेक हार आहेत; त्यापैकी एकाचा घोस कमरेपर्यंत रुळत आहे. ऊर्ध्वभाग वस्त्ररहित आहे आणि अधोभागावरील वस्त्र फक्त चुण्यांच्या रूपात दिसत आहे. तिचे दोन्ही हात तुटलेले आहेत. तिचा उजवा हात शंकराच्या डाव्या हातात होता असे त्याच्या ठेवणीवरून दिसते. वेरूळ येथील रामेश्वर लेण्यात हाच प्रसंग खोदलेला असून तेथे शिवाने पार्वतीचा हात धरलेला आहे.

पार्वतीच्या मागे तिचा पिता उभा आहे. त्याचा उजवा हात तिच्या स्कंधावर अगदी हळुवार ठेवलेला असून तो जणू तिला पुढे सरण्याबद्दल, जरा प्रेमाने व जरा आर्तवृत्तीने, प्रोत्साहन देत आहे. पार्वतीचे उजवीकडे सालंकृत चामरधारिणी आहे. तिच्या कानात लोंबती कुंडले व डावे हाती चिऱ्यांचा घोळ सावरून धरलेला आहे.

शंकराचे बाजूला त्रिमुख ब्रह्मदेव काही वैवाहिक विधी करीत उकिडवा बसलेला आहे. हा या विवाह–मंडळाचा पुरोहित. त्याचे मागे चतुर्हस्त विष्णू उभा आहे. त्याचे उजवे हाती कमळ व डावे हाती चक्र आहे. त्याचे वर्तुळाकार शिरस्त्राण विशेष लक्षपूर्वक पाहण्यासारखे आहे. अगदी उजवीकडे एक स्त्री उभी आहे. ती बहुधा पार्वतीची माता मेना असावी. चामरधारिणीचे मागे चंद्र उभा आहे. त्याचे हाती अमृतकुंभ आहे. पाश्चात्य न्यायालयात न्यायाधीश व वकील कृत्रिम केशभार धारण करतात, तसाच केशभार चंद्राच्या मस्तकावर आहे. शिवपार्वतीच्या वरच्या बाजूला अनेक सिद्ध, गंधर्व व अप्सरा आकाशातून विवाहित जोडप्यावर पुष्पवृष्टी करीत आहेत.

या चित्रावर शिल्पकारांनी इतके कौशल्य केंद्रित केले आहे की, त्यावरून फर्ग्युसन या शिल्पज्ञाची समजूत झाली की, या लेण्याची मांडणी विवाह मंडपाची आहे ! शंकरपार्वतीच्या विवाहाचे वर्णन कालिदासाने कुमारसंभवात केलेले आहे, ते रसिक वाचकांनी मुद्दाम वाचून पाहावे. कालिदासाच्या वर्णनावरून हे शिल्प तयार करण्यात आले की हे शिल्प आदर्श मानून कालिदासाने वर्णने लिहिली याचाही मनाला क्षणभर भ्रम पडतो. कालिदास हा जसा भारताचा महाकवी तसेच हे भारताचे उत्कृष्ट शिल्प, अशी या तुलनेवरून खात्री पटते. फुटल्या तुटल्या स्थितीतही हे शिल्प प्रेक्षकाला तन्मय करते; मग त्यावर रंग चढविलेले असतील तेव्हा त्याने किती रसिकांचे देहभान हरपविले असेल याची कल्पनाही करता येत नाही. अंगसौष्ठवाबद्दल, मनोविकारांचा मुद्रेवर आविष्कार करण्याबद्दल, अवयवांच्या धारणेने मनोभावना प्रकट करण्याच्या कौशल्याबद्दल विख्यात असणाऱ्या अनेक तरुण–

तरुणींनी व नटनटींनी या चित्रासमोर उभे राहून तेच आविर्भाव धारण करण्याचे प्रयत्न अनेक वेळा केलेले आहेत व त्यांची छायाचित्रे प्रसिद्धही झालेली आहेत. त्यावरून दिसून येते की, या सजीव मूर्तींहून त्या पाषाणमूर्ती अधिक सजीव, सशब्द व सौष्ठवपूर्ण आहेत ! आणि हे केव्हा, तर ही मूर्ती विच्छिन्नावस्थेत असताना !

शंकराचा सव्य हस्त पार्वतीच्या डाव्या हाताशी कसा संलग्न झाला असेल ? पुरोहिताने सांगितले असेल, हाताला हात लावा. तत्क्षणी पार्वती पुलकित झाली असेल. म्हणूनच पिता तिला धीर देत आहे. प्रोत्साहन देत आहे. शंकराने पुढे केलेल्या हाताला तिने अंगुलीस्पर्श केला असेल नसेल, इतकेच. आणि तेवढ्या स्पर्शाने ती थरारून गेलेली दिसत आहे. दांड्यावर कमळ कलते तसे व तेवढेच तिचे मुख झुकलेले आहे.

शिवपार्वती–विवाहप्रसंगावर आधारलेल्या मूर्तींना मध्ययुगीन ग्रंथात कल्याणसुंदर हे अभिधान दिलेले आहे. होमकर्ता व होमोन्मुख ब्रह्मा, उदकदाता विष्णू यांची उपस्थिती; डावा पाय स्थिर व उजवा आकुंचित; देवाच्या उजवीकडे देवी; हे या वर्णनातील तपशील या शिल्पाशी जुळतात. गया व राजशाही येथील कल्याण-सुंदर मूर्तींची छायाचित्रे श्री. खरे यांनी दिलेली आहेत. घारा-पुरीच्या मूर्तींशी त्यांची तुलना करून पाहिली तर त्या किती बेढब व कृत्रिम आहेत हे ताबडतोब दिसून येते.

# उध्वस्त विजयनगर

## गंगाधर गाडगीळ

विजयनगर तुंगभद्रेच्या दक्षिण तीरावर आहे. ह्या तुंगभद्रेचे पूर्वीचे नाव म्हणजे पंपा. परकीय आक्रमणाचा खैबर खिंडीतून घुसलेला लोंढा गंगायमुनांच्या तीरावर अडला नाही, विंध्याद्रीच्या पायथ्याशी थबकला नाही, यादवांच्या देवगिरीने त्याला टक्कर दिली नाही, तो अखेर या कृश तुंगभद्रेच्या तीरावर थोपला. दोनशे वर्षेपर्यंत तो लोंढा विजयनगरच्या दगडी तटावर आदळत होता. आणि गुरगुरत निरुपायाने मागे सरकत होता. आणि ह्या दोनशे वर्षांच्या काळात विजयनगरमध्ये हिंदू संस्कृतीच्या द्राविड शाखेचा असा काही उत्कर्ष झाला, शिल्पाचे आणि स्थापत्य कलेचे असे भव्य व संपन्न विलास झाले, कलांचा असा अद्भुत विकास तेथे झाला

आणि वैभवाची अशी भांडारे तेथे जमा झाली की, आक्रमकांनी केलेल्या अपूर्व आणि क्रूर विध्वंसानंतरही त्या संस्कृतीची स्मृती इतिहासात कायमची कोरलेली राहिली आहे. त्या विनाशाच्या ढिगाऱ्यावर विजयनगरची विजयपताका अजून फडकते आहे, कायमची फडकत रहाणार आहे.

विजयनगरचा इतिहास रामायण कालापर्यंत पोचतो. ती म्हणे पूर्वीची किष्किंधा. निदान तिथल्या लोकांनी आम्हाला असे सांगितले आणि ते खरे असावे. पंचवटीहून रामेश्वराकडे जाणाऱ्या मार्गावरच ही भग्न नगरी आहे. आणि तसे पाहिले तर अजूनही मोठी वानरसेना येथे क्रीडा करताना आढळते! ह्याच किष्किंधेत वाली आणि सुग्रीव यांचे युद्ध चालू असताना रामाने वालीचा वध केला. ते युद्ध चालू असताना त्यांनी परस्परांवर फेकलेल्या प्रचंड शिळा अजून तेथे इतस्तता पडलेल्या आहेत. हनुमानाच्या निरुपम सेवाधर्माचा येथेच प्रारंभ झाला. 'हा सीते! हा सीते!' असा विकल आक्रोश करणाऱ्या रामचंद्राचे पवित्र अश्रू ह्या तुंगभद्रेत पडले असावे. सुग्रीवाच्या व हनुमानाच्या मदतीने लंकाधीशाचे पारिपत्य करण्याचा घोर निश्चय देखील रामचंद्राने येथेच केला असावा. नाही तर परकीय आक्रमण थोपविण्याचे सामर्थ्य ह्या इवल्याशा तुंगभद्रेला प्राप्त झाले नसते आणि ह्या भूमीत कृष्ण-देवरायासारखे पराक्रमी व निश्चयी राजे निर्माण झाले नसते.

विजयनगरची आठवण झाली की, माझे मन भावनाधीन होते. इतिहासाच्या अभ्यासकांच्या शास्त्रीय वृत्तीला मी काहीसा पारखा होतो. माझ्या मनातल्या काही खोल निष्ठा जागृत होतात. नगराच्या वेशीवर मी नंगी तलवार घेऊन उभा राहातो आणि गर्जना करतो,

" या ! ह्या तलवारीचे बळी व्हायचे असेल तर पुढे या. ह्या देहात प्राण असेपर्यंत ह्या वेशीपलीकडे तुम्ही जाऊ शकणार नाही ! "

शाळेत असताना हातातल्या पट्टीची तलवार करून मी असे म्हणत असे, आणि आजही तसेच म्हणावेसे वाटते. तेव्हा असे म्हणण्याची माझी नालायकी मला जाणवत नसे. आता मात्र तीव्रतेने जाणवते आणि मन खट्टू होते.

ह्या वैभवशाली नगरीचे वर्णन अनेक प्रवाशांनी करून ठेवलेले आहे. मुसलमान, युरोपियन सारेच ह्या नगरीच्या वैभवाची प्रशंसा करताना आढळतात. अबदुर रझाक हा प्रवासी म्हणतो की, अवनीतलावर अशी नगरी कोणी नजरेने पाहिलेली नाही आणि अशी दुसरी नगरी असल्याचे ऐकिवात नाही. एकाच्या आत एक अशा सात तटबंद्यात ही नगरी वसलेली होती. तिचा दक्षिणोत्तर विस्तार जवळ जवळ सात ते आठ मैल होता आणि पूर्वपश्चिम विस्तार देखील तितकाच होता. तिच्या बाहेरच्या तटबंद्यात बाजारांची आणि दुकानांची नुसती रीघ लागून राहिली होती. अगदी मध्यभागी राजाचे निवासस्थान होते. नगरीत ठिकठिकाणी बगीचे, देवालये आणि मन प्रसन्न करणारे जलाशय होते. तुंगभद्रेला बांध घालून दगडी पन्हळातून शहरात आणि विशेषत: राजप्रासादात पाणी खेळवले होते. राजवाडयाचे वर्णन करताना तर त्या प्रवाश्याची लेखणी अडली. राजवाडयातील एक दालन तर नुसते हस्तीदंताचे होते आणि त्यातले नक्षीकाम केवळ अप्रतीम होते. राजवाडयातली भांडीकुंडी सगळी सोन्याचांदीची होती आणि काहींचा आकार नुसता अजस्र होता. राजाच्या खजिन्यात ओतीव सोन्याने भरलेल्या गुहा होत्या म्हणे !

त्या नगरीत असंख्य लोक रहात असत. त्यातल्या अनेकांच्या अंगावर रत्नाचे अलंकार असत आणि उघडया बाजारात रत्ने मांडलेली असत. देवादिकांचे विराट उत्सव नेहमी चालत. ह्या देवांना शेकडो बकऱ्यांचे व रेडयांचे बळी दिले जात. विजयनगरचे काही राजे शैव होते आणि काही वैष्णव होते. पण हिंदूंच्या पद्धती-प्रमाणे सारे देव ह्या नगरात खेळीमेळीने वास करून होते. ब्राम्हणांचा येथे फार बडेजाव असला, तरी लोक मोठया प्रमाणावर मांसाशन करीत. आपल्या चिनी बांधवांप्रमाणे ते उंदीर वगैरे प्राणीही खात असत. तलवारीने द्वंद्वयुद्धे खेळण्याची पद्धत येथे रूढ होती आणि गुन्हेगारांना शिक्षा जबरदस्त होत्या. चोरी केली की एक हात व एक पाय तोडला जात असे !

टॅक्सीतून जात असताना, उन्हाच्या झळी, तहानेचा शोष, ड्रायव्हरची बडबड, सारे काही मी क्षणभर विसरलो. इतिहासात वाचलेली त्या नगराची अनेक वर्णने मला आठवत होती. आणि क्षणभर मला असा भास झाला की, ते वैभवशाली नगर अजून तसेच अस्तित्वात आहे, जीवनाने गजबजले आहे आणि मी विसाव्या शतकातला प्रवासी, कृष्णदेवरायाला प्रणाम करायला जात आहे.

उत्तरेस तुंगभद्रा, भोवती डोंगर आणि मध्ये विजयनगर अशी रचना असल्याचे मोटरमधून जाताना आमच्या ध्यानात आले. त्या उध्वस्त नगराकडे जाण्याचा मार्ग दुर्गम, खडकाळ आणि चढउताराचा होता. मार्गात अनेक प्रचंड शिला वेडयावाकडया, अस्ताव्यस्त पडल्या होत्या. काही ठिकाणी त्यांचे ढीग होते आणि त्यातल्या काही तर इतक्या निसटत्या आधारावर उभ्या होत्या की, त्या कोसळतील असे सारखे भय वाटत होते. त्यातल्या

काही शिला मोडक्या तटबंदीच्या असतील. पण तो एकंदर प्रदेश अशा शिलांनी भरलेला असावा असे मला वाटते.

त्या विखुरलेल्या शिलांच्या राशी पाहून मला वाटले की, कोण्या राक्षसाने ह्या शिला इतस्तत: फेकून देण्याचा खेळ केला असावा. ती भयानक क्रीडा पहायला मिळाली असती तर बरे झाले असते, असे वेडे कुतूहल मला वाटू लागले.

मला प्रश्न पडला की, अशा दुर्गम, भकास, खडकाळ ठिकाणी एका बलिष्ठ साम्राज्याची राजधानी कां बरे वसवली असावी ? शत्रूचा शिरकाव होऊ नये अशी जागा शोधणे अवश्य होते हे कोणालाही पटण्यासारखे होते. सिंहगड, रायगड हे देखील दुर्गम आहेत. पण तेथील वनश्री आणि त्यांची ठेवण मनाला प्रसन्न करणारी आणि स्फूर्ती देणारी आहे. विजयनगरच्या आसमंतात मला तसे स्फूर्तिदायक, प्रसन्न असे कांहीच आढळले नाही. एक मोठे साम्राज्य उभारण्याची कल्पना ह्या शिलांच्या राशीत सुचावी हे मला अजब वाटले. त्याचा उलगडा मला होईना.

कुठे तटबंदी दिसेल, कुठे पडक्या घरांच्या रांगा दिसतील, अशा अपेक्षेने मी मोटारीतून टकाटका चौफेर पहात होतो. पण तसे काहीच दिसेना. क्वचित कुठेतरी पडके अवशेष दिसत होते. आणि मग काही अर्धवट तर काही पूर्णपणे उभ्या असलेल्या इमारती, देवालये, मूर्ती वगैरे अंतराअंतरावर दिसू लागल्या. बस्स ! त्या प्रचंड नगराचे अवशेष म्हणून इतकेच शिल्लक राहिले होते. मी इतकेच म्हटले खरे ! पण ते देखील नीटपणे एकदाच पहायचे तर चार दिवस तेथे काढायला हवेत. त्यावरून मूळ नगराच्या विस्ताराची कल्पना येईल. राजाच्या निवासस्थानाचा चौथरा आणि विस्तीर्ण

आवारच काय ते आता दृष्टीस पडते. एखादी ढासळलेली भिंत देखील आता तेथे उभी नाही. कल्पनेने त्याची पुनर्रचना करता येईल इतके देखील अवशेष तेथे नाहीत. जिथे प्रवेश मिळण्याचे भाग्य लाभावे म्हणून मोठाले उमराव झटत असतील, तेथे आता चिटपाखरूदेखील जायला तयार नव्हते. जेथे कृष्णदेवरायाचे निर्भर हास्य घुमले, जेथे मोठाल्या सल्लामसलती झाल्या, जेथे नृत्य संगीताच्या मैफली झडल्या, तेथे भकासपणा प्रेतासारखा पडला होता. का कोण जाणे, पण त्या जागी वावरताना मला चोरट्यासारखे वाटत होते.

राजवाड्याची जरी अशी दशा झाली असली तरी राजांच्या निवासस्थानाचे काही अवशेष अजून आहेत. ह्या अंत:पुराला चारही बाजूंनी उंच तटबंदी आणि तटबंदीच्या कोपऱ्यावर रक्षकांकरिता एक एक मिनार आहे. त्या मिनारावरून भोवतालचे दृश्य चांगले दिसते. जवळच असणारी एक सुंदर घुमटाची आणि कमानदार दरवाज्याची इमारत पाहून आम्ही विचारले, “ हा कुठचा महाल ? ” ड्रायव्हर म्हणाला, “ छे, हा महाल नाही. हा राजाचा हत्तीखाना आहे. ” अशा इमारतीत रहाणाऱ्या त्या हत्तींचे नशीब थोर ह्यात शंका नाही. बहुधा बेटे मधात बुडवलेला चारा खात असावेत.

अंत:पुरात ‘ कमळ महाल ’ नावाची मोठी सुबक इमारत अजून शाबूत आहे. कमळाच्या पाकळ्यांसारखा नाजूक लालसर रंग त्या इमारतीचा आहे. कमलदलाचा नाजूकपणा त्या इमारतीच्या रचनेत, कमानीत आणि घुमटात पुन्हा पुन्हा जाणवतो. इमारतीत शिल्पकलेचे विलास नाहीत. पण नुसते रचनेचे सौंदर्य मनाला मोह घालण्यास समर्थ आहे. ज्या नगरीत सारे भव्य, अजस्र

आणि शिल्पकृतींनी मढलेले आहे, तेथे ही नाजूक, साधी इमारत आपल्या निराळ्या सौंदर्याने स्मरणात राहते.

विजयनगरमध्ये अनेक देवालये आहेत. आणि सगळी आपआपल्या परीने सुंदर आहेत. काहींची बरीच मोडतोड झाली आहे, काही चांगल्या अवस्थेत आहेत. पुष्कळ देवळातल्या मूर्ती नष्ट झाल्या आहेत. हजार रामस्वामी देवालयात सगळे रामचरित्र कोरलेले आहे. मातंग ऋषींच्या टेकडीवर एक देवालय दिसते. टेकडी कसली, ओक्याबोक्या अणकुचिदार शिलांची रासच ती. उन्हात तापलेल्या आणि तहानेने गळून गेलेल्या आम्हाला त्या टेकडीवर चढण्याइतका उत्साह वाटू शकला नाही.

ह्या टेकडीवर म्हणे मातंग ऋषी तपश्चर्या करीत असत. वाली आणि सुग्रीव ह्यांचे भांडण झाले तेव्हा सुग्रीवाने पळून जाऊन ह्या ठिकाणी आसरा घेतला होता. कारण वालीने एका राक्षसाचा वध करून त्याचे प्रेत तेथे भिरकावून दिले असल्याकारणाने मातंग ऋषींनी चिडून त्याला शाप दिला होता. आणि त्यामुळे त्या टेकडीवर येणे वालीला शक्य नव्हते. ह्या टेकडीवर एक देवालय आहे. त्यात काळ्या पाषाणाची परशुरामाची मूर्ती आहे असे ड्रायव्हर म्हणाला.

येथे एक जमिनीखाली सापडलेले देवालय आहे. नाग पकडताना म्हणे ह्याचा ठावठिकाणा लागला आणि मग त्याचे उत्खनन करण्यात आले. देवालयात खाली उतरून जावे लागते. देवालयाच्या मंडपात वगैरे फिरता येते. पण आतला भाग पाण्याने भरलेलाच असतो. तेथे जिवंत पाण्याचा झरा आहे. मी कडेच्या एका दाराने आत डोकावून पाहिले. आत अंधार होता आणि

पुसट प्रकाशात आत भरून राहिलेले पाणी दिसत होते. त्या दालनाचे खांब पाण्यात उगवल्यासारखे वाटत होते आणि आतले पाणी सावकाशपणे हलले की, पोटातही काहीतरी डुचमळत होते. आत पाय दुमडून नंदी शिवाच्या आज्ञेची वाट पाहात सामोरा बसलेला आहे. भिंतीवर मला एक नाग दिसला, मी जरा चमकलोच. पण ताबडतोब ध्यानात आले की, ती शिल्पाकृती आहे ! आत गाभाऱ्यात तर नुसता काळोख दाटला आहे. तेथे प्रवेश होणे कठीणच. तेथल्या वातावरणात अद्भुतता दरवळत होती. मला गुहेतून वाहणाऱ्या नदीतून तरंगत गेलेल्या सिंदबादची आठवण झाली. आणि वाटले की आपण जर पाण्यावर तरंगत ह्या गाभाऱ्यात प्रवेश केला तर थेट नाग लोकात जाऊन पोचू आणि तेथे हिऱ्या-माणकांच्या लखलखाटात एका निराळ्या, अद्भुत जीवनातील विलासांचा अनुभव घेऊ !

विजयनगरला पाहण्यासारखी दोन महत्वाची देवळे म्हणजे एक विठ्ठलस्वामी आणि दुसरे विरूपाक्षाचे. त्यातले विठ्ठलस्वामीचे आम्ही आधी पाहिले आणि मला ते अधिक आवडले.

दक्षिणेत विष्णूची देवालये पुष्कळ आहेत. कधी तो अनंत-शयनम् असतो, तर कधी रंगनाथ असतो. पण आम्ही मराठे विष्णूला विठोबा ह्या नावाने ओळखतो. विष्णू म्हटल्यावर चटकन आमच्या नजरेसमोर ते ध्यान येते. देवावर माझा विश्वास नाही. पण ह्या विठ्ठलाच्या चरणी तुक्याने जी अभंगवाणी वाहिली, तिचे आजही उठणारे पडसाद ऐकले की, माझे मन सद्गदित होते. सिनेमात देखील 'झाला महार पंढरीनाथ' असे ऐकले की हृदय कसे भरून येते. अशा महार होणाऱ्या विठ्ठलाचे देवालय पहायचे

म्हटल्यावर माझे मन उत्सुक झाले होते. त्या देवालयाच्या दर्शनाने उत्सुकता निवली. त्याच्या सौंदर्याने हृदय तोषले.

असे म्हणतात की, पंढरीच्या विठोबाकरिता हे देवालय इथल्या राजांनी बांधले. त्यात पंढरीची मूर्ती नेऊन बसवायची असा त्यांचा हेतू. आपल्याकरिता बांधले जाणारे हे नवे देवालय पहायला देव पंढरीहून आले. देवांनी देवालय पाहिले आणि म्हणाले, " हे निवासस्थान फार भव्य आहे, सुंदर आहे, पण मला रुचण्यासारखे हे नाही. माझे पंढरपूरचे साधेसुधे निवासस्थान मला पसंत पडते. तेथेच मी निवास करीन."

महार होणाऱ्या महाराष्ट्राच्या दैवताने असे बोलावे हेच महाराष्ट्राचे वैशिष्टय आहे. आणि देव जर विजयनगरला गेले असते, तर त्यांना सुंदर निवासस्थान मिळाले असते खरे, पण मग तुकयाच्या दिव्य भक्तीला ते मुकले असते. आणि हा महाराष्ट्राचा विठोबा तर ' भावाचा भुकेला ' म्हणून प्रसिद्ध आहे.

ह्या देवालयाच्या सभोवती दगडी तट आहे आणि त्याच्या तीन बाजूंना सुंदर गोपुरे आहेत. गोपुरे म्हणजे प्रवेशद्वारे. पूर्वी आर्यांच्या गावांच्या भोवती लाकडी कुंपण असे आणि त्या कुंपणातून चरायला जाणाऱ्या गाईंसाठी एक द्वार असे. ह्या द्वाराला गोपूर असे म्हणतात. त्या साध्या गोपुरातून दक्षिणेतील देवालयांच्या ह्या भव्य गोपुरांचा विकास झाला. हे गोपूर म्हणजे मोठे दगडी प्रवेशद्वार असते आणि त्या प्रवेशद्वाराच्या वर उंचच उंच निमुळते होत गेलेले विटांचे बांधकाम असते. ह्या उंच होत गेलेल्या रचनेच्या प्रत्येक मजल्यावर देवादिकांच्या आणि त्यांचे अवतारकार्य दर्शविणाऱ्या अनेक शिल्पाकृती कोरलेल्या असतात.

डोंगराच्या उतारावर जसे झाडांचे जंगल माजलेले असते तसे हे शिल्पाकृतींचे जंगलच गोपुराच्या निमुळत्या होत गेलेल्या बाजू भरून टाकते आणि त्याच्या भव्यपणात व रचनेच्या प्रमाणबद्धतेत भर टाकते. देवाच्या दर्शनाला येणारा माणूस त्या उंच आकाशात गेलेल्या रचनेकडे आश्चर्याने व आदराने पाहतो. देवांच्या अवतार-कार्याच्या त्या कोरलेल्या दर्शनाने पुनीत झालेली त्याची नजर वर वर जाते. वरच्या आकृती दिसाव्या म्हणून तो डोळे ताणतो. पण सारे अस्पष्ट होऊ लागते. नजरेचे सामर्थ्य संपते, पण परमेश्वराचे अस्तित्व संपत नाही, परमेश्वराच्या गूढतेचा त्याला साक्षात्कार होतो. गोपुराचे निमुळते झालेले टोक ह्या भांबावून सोडणाऱ्या विविधतेतील एकता अधोरेखित करते आणि मग पाहणाऱ्याची नजर अनंत आकाशात नेऊन सोडून देते. अशा ह्या गोपुराच्या दर्शनाने माणूस विनम्र होतो.

विठ्ठलस्वामींच्या देवालयाची गोपुरे लहान होती. पण म्हणून काही त्यांचे सौंदर्य उणे नव्हते. मुख्य गोपुरातून आत गेल्यावर तटाच्या कडेकडेला धर्मशाळेच्या स्वरूपाच्या ओवऱ्या आहेत आणि समोर मोकळ्या प्रांगणात एक सुंदर दगडी रथ आहे. पहाताना असे वाटते की, एकाच प्रचंड शिळेतून हा कोरलेला असावा. पण खरोखर त्याकरिता अनेक शिळा वापरण्यात आलेल्या आहेत. त्यांचे सांधे अशा काही सफाईने बसविण्यात आलेले आहेत की, वरवर पहाणाऱ्याच्या नजरेला ते उमगू नयेत. आम्हाला ते उमगले नाहीतच.

ह्या मोडतोड झालेल्या देवालयाच्या चार बाजूंना चार मंडप आहेत आणि मध्यभागी देवालय आहे. ह्या मंडपातील व देवाल-यातील शिल्पांचे वैपुल्य, सौष्ठव व सौंदर्य पाहून माझ्यासारख्या

अनभिज्ञ माणसाचे देखील भान हरपले. हे देवालय नव्हते. हे अनुपम शिल्पाचे एक दाट जंगल होते. एकेका खांबात इतके अद्भुत सौंदर्य असू शकते ह्याची मला तोपर्यंत कल्पनाच नव्हती. किती विविध प्रकारचे खांब होते तेथे ! आणि एकेक खांब म्हणजे एकेक काव्य होते. त्या खांबांनी देवालय सावरले आहे, देवालयाच्या रचनेत त्यांचे काही कार्य आहे, हे विसरायला होत होते आणि त्यांच्या सौंदर्यातच गुंगून जायला होत होते. शब्द वाकवताना आमची किती त्रेधा उडते. मग ह्यांनी पाषाणाला कसे वाकवले असेल ? आपल्या कल्पना त्यात कशा उमटवल्या असतील ?

माणसांचे आणि देवतांचे सारे जीवन ह्या शिल्पात व्यक्त झालेले आहे. ऐहिक जीवनाला, सुखोपभोगांना, पराक्रमाला, कलेच्या धुंदीला ह्या देवालयात ( नव्हे, दक्षिणेतल्या कुठल्याच देवालयात ) अटकाव नाही. ऐहिक आणि पारमार्थिक ह्यांना वेगळे करणारी कृत्रिम रेषा येथे नाही. परमेश्वराच्या द्वारात सारे मानवी जीवन फुलताना येथे पाहिले आणि धर्माविषयी माझ्या मनातील अढी कमी झाली. हिंदू धर्माची नजर नेहमी परलोकावर लागलेली, ह्या कल्पनेला धक्का बसला, आणि जीवन स्वच्छंदपणे, उत्साहाने जगणाऱ्या आणि ते पाषाणावर कोरून अमर करू पाहणाऱ्या विजयनगरच्या लोकांविषयी आदर वाटू लागला.

त्या देवालयाचा असा एक कोपरा नव्हता की, ज्यावर शिल्पकारांनी आपल्या कलेचे संस्कार केले नव्हते. सुंदर शिल्पाचे ते वैपुल्य पाहून मन भांबावून जात होते. जणू शिल्पकलेला तेथे महापूर आला होता. जणू परमेश्वराच्या सान्निध्यात ती मुक्त झाली होती. काय बघावे आणि काय बघू नये ते कळत नव्हते.

सिंह आणि हत्ती हे पुन्हा पुन्हा त्या शिल्पाकृतीत दिसत होते. पराक्रमाची, सौंदर्याची आणि भव्यतेची जणू प्रतीकेच असलेले वनराज ह्या पराक्रमी लोकांना प्रिय असावेत ह्यात नवल ते काय ? ह्या वनराजांच्या ज्या शिल्पाकृती मी पहिल्याने पाहिल्या त्या सगळ्या नटलेल्या आणि सुशोभित केलेल्या अशा आढळल्या. राजदरबारात वावरलेल्या एखाद्या सेनापतीने आसनस्थ व्हावे तशी सिंहाची बैठक ! त्याच्या चेहेऱ्यावर सुसंस्कृत गांभीर्य दिसत होते आणि आपल्या आयाळीला बहुधा त्याने पर्मनंट वेव्ह करून घेतला असावा आणि मग ती पोमेड लावून चापून चोपून बसवली असावी !

ह्या सुशोभित केलेल्या शिल्पाकृती आपल्या परीने सुंदर होत्या. पण ह्या प्राण्यांच्या वास्तव आकृती पहायला मी उत्सुक झालो. आणि मला शंका आली की ह्या शिल्पकारांना अशा वास्तव आकृती काढता येत नव्हत्या की काय ? वास्तवातले सौंदर्य दिसू शकत नव्हते की काय ?

पण माझ्या ह्या शंकेला ताबडतोब उत्तर मिळाले. सोंड उभारून उधळलेल्या हत्तीची आकृती मी पाहिली. त्या गजराजाचा मोकाट उधळणारा उन्माद, त्या निर्जीव शिलेवरच्या स्थिर आकृतीत व्यक्त झाला होता आणि मग शिकार करणाऱ्या सिंहाची आकृती पाहिली आणि नजर तोषली.

संतुष्ट होऊन आणि दमून भागून बाहेर पडलो. विठ्ठल-स्वामीच्या देवालयाचे मी हे जरा विस्ताराने वर्णन केले. इतर देवळेदेखील अशीच सुंदर होती. त्यातल्या अनेक शिल्पाकृती माझ्या नजरेसमोर अजून तरळत आहेत, स्मृतीत गोंदल्या गेल्या आहेत. मृदंग वाजविणाऱ्या कलाकाराच्या चेहेऱ्यावरील बेहोषी आणि

त्याचा ठसका व ढंग, शंख वाजविणाऱ्या माणसाचे फुगलेले गाल–बोटांनी ते दाबावे असा मोह होत होता. लढाया आणि शिकारी. हातातल्या काठीवर रेलून उभा राहिलेला, डोक्यावर घोंगडी घेतलेला गुराखी पोर. मत्स्यकन्या आणि तपश्चर्या करणारे मुनी. वळवळणारे नाग !

विरूपाक्षाचे देवालय हे हंपीतले सर्वात जुने आणि महत्वाचे आहे. अजून ते वापरात आहे. त्याच्यासमोर दुतर्फा दगडी इमारती असलेला एक जुन्या काळचा रस्ता आहे. तेथे म्हणे पूर्वी बाजार होता. तेथल्या इमारती अजून काही अंशी शाबूत आहेत. आता तेथे कोणीच राहात नाही. पण विरूपाक्षाची यात्रा भरली म्हणजे ह्या जुन्या घरातून यात्रेकरू वास्तव्य करतात. देवालया-समोर दोन प्रचंड लाकडी रथ आहेत. त्यांची भरीव चाकेच माणसाइतकी उंच असावी. विजयनगरच्या साम्राज्याच्या कालात तेथे असलेल्या पेज (Paes) ह्या प्रवाशाने ज्या मोठ्या यात्रेचे वर्णन केले आहे, तीच अजूनही चालू आहे, ह्या गोष्टीचे कौतुक वाटते. कालाच्या उतरंडीवर उभ्या राहिलेल्या अनेक पिढयांनी संस्कृतीचे हे लोण पुढच्या पिढयांच्या हातात दिले आहे आणि परंपरेच्या ह्या भव्य कमानींनी आपण आपल्या पूर्वजांशी जोडले गेलो आहोत.

विरूपाक्षाचे देवालय मोठे आहे. त्याच्या भव्य गोपुराची उंची दीडशे फुटांहून अधिक आहे. आत शिल्पकलेचा विपुल विलास आहेच; पण वर चुना फासवून त्या सौंदर्याला अकारण उणेपणा आणल्या गेला आहे. देवळाच्या आवारात सुग्रीवाचे वंशज पुष्कळ आहेत. त्यांची लीला पाहण्यातच आमची थकलेली मने रमली. देवाचे दर्शन घ्यायला गेलो. पण तेथे दर्शनाचे दोन आणे,

नारळाचे दोन आणे व आणखी कसले तरी सहा आणे, असा सौदा आम्हाला अडवून जेव्हा पुजारी करू लागला तेव्हा चिडून मी मागे फिरलो. बापडा विरूपाक्ष गंगाधरच्या दर्शनाला मुकला !

ही निरनिराळी स्थळे पाहण्याकरिता मोटारीमधून इकडे तिकडे जात असताना आम्हाला मध्येच पडलेले अवाढव्य दगडी दरवाजे दिसले. प्रचंड दगडी पन्हळ कोणीतरी फेकून दिल्यासारखे, तिरके होऊन पडले होते. मधून मधून दगडी चक्क्या दृष्टीस पडल्या. आणि राजे जेथे स्वतःची सुवर्णतुला करीत असत तो तराजू सावरणारी दगडी चौकट दिसली.

मध्येच आम्हाला एक अखंड शिळेचे प्रचंड शिवलिंग दिसले. त्याची उंची दहा फूट तरी असावी. त्याच्यावर अभिषेक करायचा म्हणजे वरच्या मजल्यावर जावे लागते. अशीच एक दुसरी गणपतीची मूर्ती आहे. आपले अगडबंब, लोंबणारे पोट गणरायाने पोटाभोवती एक नाग गुंडाळून सावरून धरले आहे. ह्या गणपतीला उपरोधाने कानडीत राईएवढा गणेश म्हणतात. उग्र नरसिंहाची जी मूर्ती तेथे आहे, तिच्या भव्यतेने तर डोळे फिरतात. तिची उंची बावीस फूट आहे म्हणे. ह्या नरसिंहाच्या मस्तकावर सहा तोंडाच्या शेषाने आपली फणा धरली आहे. त्याचे विचकलेले जनावरासारखे तोंड आणि त्याचे बाहेर लोंबणारे डोळे पाहून भीतीच वाटते. त्याची थोडी मोडतोड झाली आहे आणि पुराणवस्तू खात्याने त्याला एक लोखंडी आधार दिला आहे.

संध्याकाळ झाली. सूर्य मावळला. पण आमचे पाहणे संपले नव्हते. विशेषतः चक्रतीर्थ पहायचे राहिले म्हणून मनाला चुटपूट लागली. येथे म्हणे तुंगभद्रा मोठे वळण घेते आणि दोन टेकड्यां-

मधल्या फटीतून तिचे पाणी वेगाने वाहात जाते. प्रवाहाच्या वेगाने म्हणे येथे किनाऱ्याच्या दगडात गुहा निर्माण झाल्या आहेत. आमच्या पूर्वजांनी नेहमीच्या पद्धतीप्रमाणे हे तीर्थस्थान ठरवून टाकले आहे. गांधींच्या रक्षेचे विसर्जन येथेही झाले असे समजले.

संधिप्रकाशाचे सारवण त्या भग्न अवशेषांवर पडू लागले आणि ते ठिकाण अधिक भयाण व एकाकी वाटू लागले. विजय-नगरच्या साम्राज्याचा जेथे अंत झाला ते स्थल सूर्यनारायण रोज असे संधिप्रकाशाने सारवतो आणि मग त्यावर आकाशातल्या पणत्या तेवत असतात.

काळोख पडू लागला तशा पाकोळ्या फडफडू आणि चित्कारू लागल्या. आणि वाटू लागले की, त्या भग्न अवशेषातून आता भुतेखेते बाहेर पडतील, आणि चारशे वर्षांपूर्वी विनाशाचे जे भयंकर नाटक त्या नगराच्या रंगभूमीवर झाले ते पुन्हा एकदा साग्रसंगीत करतील. त्या भयानक स्मृतींच्या बंधनातून मुक्त होईपर्यंत ते पुन्हा पुन्हा करणे हेच त्या भुतांचे जीवितकार्य असेल. त्या किंचाळ्या, त्या रक्ताच्या चिळकांड्या, ती कत्तल, ती जाळपोळ, ती लुटालूट—सारे पुन्हा तेथे घडून येईल. ज्वालांच्या लळलळणाऱ्या जिभा माणसांचा आणि वित्ताचा स्वाहाकार करून आकाश चाटू लागतील. तरवारीच्या टोकावर लहान अर्भकाचे ‘ छानसे ते आतडे ’ लोंबू लागेल. किंचाळ्यांच्या चिळकांड्यांनी हवा माखून जाईल. हातात पहारी घेऊन जे सुंदर दिसेल त्याचा नाश करीत उन्मत्त जेते फिरू लागतील. ज्या देवांच्या भव्य रथाखाली चिरडून मरावे अशी इच्छा शेकडो भाविक मनात बाळगत असतील, त्यांचा कपाळमोक्ष करायला दुसरे शेकडो भाविक आसुरी

ईर्षेने धावतील. ज्यांच्या पायाला धूळ लागू नये म्हणून बहुमोल वस्त्रांच्या घडया घातल्या जात, त्यांची रक्ताने भरलेली शरीरे धुळीने माखतील. ज्यांनी राज्य केले ते हत्तीवर संपत्ती लादून चोरासारखे पळून जातील. मानवी इतिहासातला एक मोठा प्रलय होईल.

पश्चिम तांबडी झाली होती. भूभाग काळवंडला होता आणि आमची मोटार वेगाने त्या अवशेषांपासून दूर जात होती. माझ्या डोक्यातले विचारचक्र गरगरत होते. अदृश्यपणे ते दृश्य पाहात माझी कल्पना भिरभिरत होती.

चारशे वर्षांपूर्वीच्या त्या लोकांच्या जीवनावरून दृष्टी वळवता येत नव्हती. कसे असतील ते लोक ? पराक्रमी !

त्या पराक्रमाच्या विश्वासानेच त्यांनी दगडांच्या दुर्गम प्रदेशात आपली राजधानी वसवली आणि दगडांवर मात करून त्यातून सौंदर्य खोदले, कोरले, बांधले. कोणाला वाटेल की, परकीय आक्रमणाचा लोंढा अडविणारे हे लोक भीतीने नेहमी शंकित झालेले असतील आणि त्या भीतीच्या छायेत खुरटलेले जीवन जगत असतील. पण त्यांच्या कलाकृतींचे अवशेष निराळी गोष्ट सांगतात. त्यात पराक्रम आणि आवेश पाय रोवून उभे आहेत, उत्साह फुसांडत आहे. पुन्हा पुन्हा त्यांच्या मंदिरात जर कुठच्या आकृती दिसत असतील, तर सोंड उभारून एक पाय वर उचलून उधळत आलेल्या हत्तींच्या, सिंहांच्या आणि मागल्या दोन पायांवर उभ्या राहिलेल्या उमद्या घोडयांवर तरवार उपसून स्वार झालेल्या सैनिकांच्या. शत्रूच्या भूमीवर, छातीवर देखील, त्या उंचावलेल्या टाचा रोवीत आणि उगारलेल्या खड्गाने त्याला कंठस्नान घालीत

हा शिल्पात अमर झालेला विजयनगरचा सैनिक सबंध दक्षिणेत दौडला असेल. पुन्हा पुन्हा तुंगभद्रा ओलांडून शत्रूच्या छातीवर त्याचा घोडा थयथय नाचला असेल.

अजस्र, भव्य असे जीवन जगण्याची त्या लोकांची मनीषा असेल. म्हणूनच त्यांनी अशा अजस्र व भव्य कलाकृती निर्माण केल्या. एखाद्या पर्वताच्या उतारावर वाढणाऱ्या जंगलात ज्य प्रकारची संपन्नता व विपुलता असते, तिची त्यांना हौस असावी. नाही तर ती हौस त्यांच्या कलाकृतीत ओतली गेली नसती. आजची आपली दळभद्री जीवनविमुख वृत्ती त्यांच्यात खात्रीने नसावी. जीवन ते जगले असावेत. जीवन त्यांनी भोगले असावे.

विजयनगर हे माझे स्वप्न होते आणि त्याचे अवशेष पाहून त्याचे रंग आता अधिक गहिरे झाले आहेत.


●

# दक्षिणेकडील नंदनवन

## सौ. कमला फडके

मीनाक्षीच्या गोपुरासमोर आलो. आणि आम्ही रस्त्यातच थबकलो. गोपुराची ती प्रचंड शोभा डोळे भरून पाहून घेतल्याशिवाय आमचं पाऊल पुढं पडेना.

माथ्यावर आलेला चंद्र पाहण्यास मान जितकी उंच करावी लागेल तितकीच उंच मान या गोपुराचं शिखर पाहताना करावी लागते. गोपुराच्या पायथ्याचा घेरच एखाद्या मोठ्या देवालयाएवढा आहे. या प्रचंड पायावर एकाहून एक निमुळते होत गेलेले नऊ मजले मोठ्या डौलदार बांधणीनं आकाशात चढले आहेत व प्रत्येक मजल्यावर देवादिकांच्या जवळ-जवळ मनुष्याएवढया दिसणाऱ्या मूर्ती कोरल्या आहेत. कौरव, पांडव, दशमुखी रावण, सहस्रार्जुन, गणपती, मारुती, लक्ष्मी, पार्वती वगैरे



'मीनाक्षी मंदिर', मदुरा

अनेक आकर्षक पवित्र्यात घडविल्या आहेत. पुरुषांच्या शरीराचा बांधेसूदपणा आणि स्त्रीदेहाचं सौष्ठव दुरूनही त्या मूर्तीत आम्हाला दिसत होतं. एखादी दुसरी मूर्ती कोरणं मनुष्याच्या आवाक्यातील वाटतं. परंतु नऊ मजले चारी बाजूंनी, एकही फूट साधी जागा न सोडता, अत्यंत सुंदर कलाकृतीनं कोरून बांधून काढणं ही कल्पनाच आम्हा मानवांना अशक्य कोटीतील वाटते ! परंतु सत्य कित्येकदा कल्पनेला मागं सारतं म्हणतात, ते या गोपुराकडे पाहून खरं वाटलं. ज्या कलावंतांनी ते सत्य आपल्या अमर शिल्प-कृतीनं या गोपुराच्या प्रचंड मनोहर स्वरूपात प्रकट केलं ते आमचे पूर्वज, ह्यावर माझा विश्वास बसेना. ते कलावंत कोणी दैवी, अतिमानव पुरुष असले पाहिजेत. एकाहून एक प्रत्येक

मजल्यावरच्या त्या सुंदर शिल्पाकृती पाहता पाहता माझी दृष्टी नवव्या मजल्यावर, गोपुराच्या शिखरावर स्थिर झाली. कमळाच्या पाकळ्यांमध्ये पन्नगाचा जबडा वासलेला असा मुखवटा दिसला. आकाशाच्या निळ्या पार्श्वभूमीवर चंद्राच्या कोरेप्रमाणं वर उचल-लेल्या त्या पाकळ्या आणि तो अक्राळ विक्राळ पन्नगाचा मुखवटा फारच सुंदर दिसला. त्या नऊ मजली गोपुराकडे पाहून " अहाहा ! किती भव्य ! किती मनोहर ! " एवढेच उद्गार आमच्या तोंडून निघाले. वेरूळ, अजिंठ्याची लेणी पाहून आम्ही चकित झालो होतो; परंतु या गोपुराच्या शिल्पसौंदर्याकडे पाहताना आम्ही देहभानही विसरलो.

* * *

प्रवेशद्वाराच्या दोन्ही बाजूंना गणपती व कार्तिकस्वामी यांच्या भव्य मूर्ती कोरल्या आहेत. गणपती उंदरावर आणि कार्तिकस्वामी मोरावर बसलेला होता. प्रवेशद्वारावरील अर्धवर्तुळाकार कमानीमध्ये मीनाक्षीच्या पाणिग्रहणाचा अतिसुंदर प्रसंग कोरला आहे. लाजून खाली मान घातलेली मीनाक्षी, तिचा उजवा हात सुंदरेश्वराच्या हाती देणारा विष्णू आणि तिचा हात हाती धरून सस्मित उभा असलेला सुंदरेश्वर, साऱ्याच मूर्ती भावपूर्ण वाटल्या.

या प्रवेशद्वारातून आत गेल्यावर, मंदिराभोवतालचं आवार पाहून मंदिराच्या प्रशस्तपणाची कल्पना आली. मंदिराच्या आवारातच सुंदरेश्वराचं देवालय, हजार खांबांचा हॉल, सुवर्णपुष्करिणी वगैरे प्रेक्षणीय स्थळं आहेत. प्रवेशद्वारातून आत आल्यावर जवळच हजार खांबांचा हॉल आहे तिकडे आम्ही वळलो.

या हॉलमध्ये एक हजार खांब आहेत. एवढी एकच गोष्ट त्याच्या भव्यतेची कल्पना येण्यास पुरेशी आहे. रांगोळीच्या ठिपक्यां-

प्रमाणे समांतर रेषेतले हे हजारो खांब पाहून वेरूळ, अजिंठ्याच्या लेण्यातील खांबांची आठवण झाली. वेरूळ अजिंठ्याच्या लेण्यातील प्रत्येक स्तंभ शिल्पकलेचं कौशल्य व नावीन्य या दृष्टीनं नमुनेदार वाटण्यासारखा आहे. परंतु हजार खांबांच्या या हॉलमध्ये फक्त प्रवेशद्वारापुढची एक ओळ व प्रवेशद्वारापासून गाभाऱ्यातील सुंदरेश्वरापर्यंत जाणाऱ्या वाटेच्या दोन्ही बाजूंच्या दोन ओळी एवढेच खांब विशेष कलाकुसरीनं नटलेले आहेत. या प्रत्येक खांबालगत देवादिकांच्या पुरुष दीड पुरुष उंचीच्या मूर्ती आहेत. हॉलमध्ये प्रवेश केल्याबरोबर प्रथम लक्ष जातं ते सरस्वतीच्या भव्य मूर्तीकडे ! नृत्याच्या एका अवघड पवित्र्यातला तिच्या देहाचा तो डौल, वीणेच्या तारावरची तिची नाजुक लांबसडक बोटं, कोपरापासून मनगटापर्यंतचा रेखीव स्नायू, अतिशय मोहक सिंहकटी, हसरी नाजुक जिवणी, लंबवर्तुळ मुद्रेला प्रसन्नता देणारे ते मोठमोठे डोळे, या सर्व सौंदर्यांनी त्या शिलेच्या मूर्तीतही चैतन्य उत्पन्न झालं होतं.

*　　　*　　　*

हजार खांबांच्या हॉलमध्ये स्त्रियांप्रमाणंच पुरुषांच्या मूर्तीदेखील अत्यंत रेखीव आहेत. प्रवेशद्वारातून आत गेल्यावर समोरच योद्धयाच्या अवतारातील शिवाची मूर्ती दृष्टीस पडली. शिवाच्या धनुष्याची वेताच्या छडीसारखी वाकलेली कमान आणि कमरेतील मेखलेची नाजूक कलाकुसर पाहून वज्रतुल्य शिलेला आपल्या कल्पनेप्रमाणं वाकविणाऱ्या त्या कलावंताची धन्य वाटली. मन्मथ, द्रौपदीसाठी पारिजातकाचं फूल आणण्यासाठी निघालेला हा गदाधारी भीम, त्याच्यासमोर लढाईच्या पवित्र्यात उभा राहिलेला

पुरुषामृत वगैरे मूर्ती फारच प्रेक्षणीय वाटल्या. विशेषतः गाभाऱ्यातील नटराजाची मूर्ती पाहताना आमची दृष्टी मोहून गेली. डाव्या पावलावरचा शरिराचा तोल, उजवे पाऊल डाव्या गुडघ्यावर धरण्याची ती ऐट, दोन्ही हाताच्या आकर्षक मुद्रा आणि मस्तकाचा तो डौल पाहून भरत नाटयशास्त्रातील सर्वात सुंदर पोझ ती हीच अशी खात्री पटली.

*　　　*　　　*

आम्ही हजार खांबांच्या हॉलमधून बाहेर पडलो आणि सुंदरेश्वराच्या देवालयात शिरलो. सुंदरेश्वराच्या सभामंडपात शिरण्यापूर्वी एक प्रचंड दरवाजा लागतो. या दरवाजावर असंख्य पितळेच्या पणत्या आहेत. आणि रात्री आरतीच्या वेळी या सर्व पणत्यातून दिवे लागले म्हणजे या महाद्वाराची शोभा काही अपूर्व दिसते म्हणतात. या दरवाजातून आम्ही आत गेलो. प्रथमच दोन्ही बाजूस वीरभद्राच्या रुद्रमूर्ती आम्हाला दिसल्या. दक्षयज्ञामध्ये जेव्हा असुर विघ्नं आणू लागले तेव्हा त्यांचं निवारण करण्यासाठी वीरभद्राचा अवतार शिवानं घेतला अशी काहीशी कथा बाळकृष्णानं सांगितली. सुंदरेश्वराच्या मंदिराच्या आवारात विशेष प्रेक्षणीय अशा गोष्टी म्हणजे एकाच शिळेत कोरलेली नंदीची छत्री व अर्धनारीनटेश्वराची मूर्ती, पाहून आम्ही मुख्य देवालयात प्रवेश केला. सुंदरेश्वराच्या देवळातलं वातावरण काही फारसं प्रसन्न नव्हतं. गाभाऱ्यात समया जळत होत्या. त्याच्या मंद प्रकाशात सुंदरेश्वराची मूर्ती आपल्या आवडत्या पोझमध्ये उभी होती. बाकी सर्व देवळात तिन्हीसांजा पडतो तसा अंधार पडला होता. आम्ही गाभाऱ्यात गेल्यावर पुजारी एकदम जागे झाल्याप्रमाणे उठले. हॉटेलमध्ये चहा आणि देवळात प्रसाद मागणं ओघानंच

येतं. पुजाऱ्यानं पुढं आरती केली तेव्हा आम्ही त्यात एक रुपय टाकला. आणि चिमूटभर अंगारा आणि फूल, हळदकुंकू एवढा प्रसाद घेऊन आम्ही पुन्हा मीनाक्षीच्या मंदिराकडे वळलो.

*　　　　*　　　　*

मदुरा शहरातून फेरफटका करून आम्ही पुन्हा मीनाक्षीच्या मंदिराकडे आलो. सकाळी सूर्यप्रकाशात ती पुन्हा पाहण्यासाठी आम्ही आलो होतो. आकाशात चांदण्यांची कोवळी प्रभा फाकू लागली होती. त्या सतेज उजळ निळ्या पार्श्वभूमीवर चारी गोपुरं अधिकच भव्य दिसत होती. चंद्रप्रकाशात मीनाक्षीच्या प्रचंड मंदिराची शोभा स्वर्गीय वाटली. एक प्रचंड कलास्वप्न पुढं उभं असल्याचा भ्रम नेत्रांना झाला. मीनाक्षीच्या मंदिराभोवती चारी गोपुरांना सलग अशी मोठी खुली पटांगणं आहेत, त्यावरून हिंडताना मोठी मौज वाटत होती. फिरता-फिरता अप्पा मधेच थांबले आणि त्यांनी बाळकृष्णाला विचारलं, "अरे, आम्हाला ते संगीत खांब कुठं आहेत ते दाखव की."

बाळकृष्णाच्या मागोमाग आम्ही उत्तर गोपुराकडे गेलो. इथं प्रवेशद्वाराच्या दोन्ही बाजूंना काठ्यांचा जुडगा करावा तसे खांबांच्या जुडग्यांचे चार झुपके होते. या जुडग्यातला प्रत्येक खांब घरगुती उपमा द्यावयाची झाली तर एखाद्या मुसळाएवढा जाड वाटला. आम्ही खांबांच्या प्रत्येक जुडग्याजवळ जाऊन हातात एक दगड घेऊन पेटीचे सूर दाबावे त्याप्रमाणं प्रत्येक खांब ओळीनं ठोकून पाहिला. आणि काय आश्चर्य ? जलतरंगाप्रमाणं कमी-अधिक उंचीचे मंजुळ स्वर त्या दगडी खांबातून निघाले ! दगडातूनही संगीताचा ध्वनी निघावा अशी कोणती युक्ती

शिल्पकारानं योजली असावी याचा तर्क आम्ही केलाच. परंतु त्या शास्त्रातल्या तज्ञांनीही या बाबतीत खूपच संशोधन केलं होतं आणि त्यांनाही अजून ते कोडं सुटलं नव्हतं. १४८९ मध्ये हे गोपुर बांधलं होतं. आमच्या पूर्वजांनी शास्त्रीय विज्ञानातदेखील त्या काळी केवढी प्रगती केली होती ते लक्षात येऊन त्यांचं कौतुक करावं तेवढं थोडंच वाटलं.

मीनाक्षीचं अखेरचं दर्शन घेऊन आम्ही बाहेर रस्त्यावर आलो.

* * *

त्रिवेंद्रमच्या रंगविलास पॅलेसवर आम्ही पोचलो तेव्हा अकरा वाजले होते. रंगविलास पॅलेसवरही कोणाची चाहूल नव्हती. गेटापाशी एक बावळट शिपाई तेवढा उभा होता. आम्ही सरळ गेटातून आतील आवारात गेलो. नाव ' रंगविलास ' परंतु इमारत होती ती अगदी बैठी व साधी. आम्ही पायऱ्या चढून वर गेलो तोच आमची चाहूल ऐकून आतील बाजूच्या एका खोलीतून गुडघ्या-पर्यंत पांढरा कोट घातलेले एक गृहस्थ बाहेर आले. आम्ही त्यांना आमची नावे सांगितली. आम्ही परिषदेसाठी आलो असून आता आर्ट गॅलरी पाहण्यासाठी म्हणून मुद्दाम आलो असं ऐकताच त्या गृहस्थांना फार आनंद झाला व ते हसून म्हणाले, " अस्सं का ? मग चला तर मीच तुम्हाला गॅलरी दाखवतो. कारण इथली सारी व्यवस्था माझ्याच ताब्यात आहे. माझं नाव निलकंठ पिलाई " असं बोलत ते आम्हाला प्रथम एका मोठ्या हॉलमध्ये घेऊन गेले. जाता जाता ते म्हणाले, " ह्या रंगविलास पॅलेसमध्ये फार पूर्वी म्हणजे १८६० ते १८८० या कालात आयिलियम थिरूनल नावाचा त्रावणकोरचा राजा रहात असे. त्याच्या मृत्यूनंतर हा

राजवाडा बरीच वर्षं रिकामा होता. त्याची थोडी फार पडझडही झाली होती. नंतर १९३५ मध्ये सध्याच्या महाराजांनी मूळ इमारतीत सुधारणा करून ही ' आर्ट गॅलरी ' स्थापन केली. या ' आर्ट गॅलरी ' मध्ये त्रावणकोरच्या राजेमहाराजांनी संग्रहित केलेल्या व इतर देशातून मुद्दाम आणविलेल्या मौल्यवान कलावस्तू ठेवल्या आहेत. आमच्या त्रावणकोरचं भूषण अशा दोन कला—नृत्य व हस्तीदंताचं कोरीव काम—यांचे उत्कृष्ट नमुने इथं पाह्यला सापडतात "—नंतर त्या हॉलमध्ये गेल्यावर ते म्हणाले, " हा पहा कथाकली हॉल "

हॉलच्या तिन्ही भिंतीलगत दीड पुरुष उंचीच्या रंगीत लाकडी मूर्ती मांडल्या होत्या. कथाकली नृत्यप्रकारातली ही सारी मुख्य पात्रं होती. त्रावणकोर कथाकली नृत्याचं माहेरघर समजलं जातं. सतराव्या शतकात कोटारकराच्या राजानं हा नृत्यप्रकार शोधून काढला व अजूनही कथाकली नर्तक आपली रंगभूषा व वेषभूषा त्या पूर्वापार पद्धतीला अनुसरूनच करतात. त्या काळातल्या ' मेकअपची ' व ' कॉस्टयूमची ' कल्पना अभ्यासू, जिज्ञासू लोकांना देण्याकरिता मेकअप व कॉस्टयूम् केलेली अशी बारा प्रमुख पात्रं हॉलमध्ये ठेवली होती. मला स्वतःला नृत्यकलेची फार आवड आहे. ज्यांच्याकडे मी नृत्य शिकत होते ते शिक्षक श्री. नागभूषण कथकळी नर्तक असल्यामुळे त्यांनी या नृत्यप्रकाराची बरीचशी माहिती मला दिली होती. त्यामुळे हॉलमधील प्रत्येक मूर्तीसमोर उभं राहून तो किंचित चमत्कृतिपूर्ण मेकअप आणि ती भडक वेषभूषा बारकाईनं पाहण्यात मी गढून गेले.

या बारा पात्रात सुष्ट व दुष्ट असे प्रकार होते. सुष्ट किंवा सज्जन पात्रांच्या मुद्रा पांढऱ्या व हिरव्या रंगानं रंगविल्या होत्या.

शिवाय त्यांच्या दुष्टपणाची खूण म्हणून त्यांच्या नाकावर एक गोटी ठेवली होती. नारदमुनी, दूत, गरुड, हनुमान, धनुर्धारी राम, किरात आणि कथानायक देवेंद्र ही सारी पात्रं निलकंठ पिलाईच्या तेलगू भाषेत "पच्चा" म्हणजे सज्जन होती. नारदमुनीच्या छातीवर पांढरी दाढी रुळत होती. दाढीवाले नारद प्रथमच पहात होते मी ! किराताची मुद्रा काळ्या रंगात रंगविली होती. परंतु त्याच्या नाकावर गोटीऐवजी फूल असल्यामुळं किराताची गणना सज्जनात करावी लागली होती. रावणाच्या नाकावर गोटी होती. या सर्व पात्रांची वेषभूषाही अत्यंत भडक व कमरेखाली घेरदार अशी होती. हॉलच्या मध्यभागी उभे राहून भोवतालच्या त्या नर्तकांच्या मूर्ती पाहताना माझ्या मनाला क्षणभर मोठा भ्रम पडला, व वाटलं जणू हे सर्व नर्तक पडदा दूर सरण्याचीच वाट पाहात होते ! नृत्यकलेचं माहेरघर अशा या त्रावणकोर संस्थानात कथाकली नृत्य पाहण्याचा योग आला तर किती बहार उडेल अशी एक नवीनच आशा माझ्या मनाला ओढू लागली.

"तुझ्या पाठीमागं कोण आहे ते पहा" असं आप्पा म्हणाले, तेव्हा मी चमकून मागं वळून पाहिलं आणि विजेचा झटका बसावा तसा भीतीचा झटका मला बसला. मी चटकन दूर होत म्हटलं, "बापरे !" पाहणाऱ्याच्या तोंडून असा आश्चर्याचा, भीतीचा उद्गार बाहेर पडावा इतका प्रचंड व उग्र असा तो हत्तीचा बस्ट पेंढा भरून ठेवलेला होता. किंचित उघडया अशा जबडयातून बाहेर पडलेले दोन सुळे मांडीएवढे जाड होते. ती प्रचंड सोंड, ते विशाल गंडस्थळ आणि सुपायेवढे कान पाहून मी चकितच झाले. "हा गजराज, राजघराण्यातील सर्वांचा फार लाडका होता. याचं नाव चंद्रशेखर. उंची अकरा फूट सहा इंच

आणि अत्यंत आश्चर्याची गोष्ट ही की तब्बल नव्वद वर्षं संस्थानच्या दरबारी मिरवणुकीपुढं तो थाटानं मिरवीत असे. ” पिलाई म्हणाले की अत्यंत प्रेमळ व स्वामिनिष्ठ अशी या हत्तीची ख्याती होती. राजाची लहर फिरली की अंबारीतली माणसं धुळीला मिळतात. परंतु हत्तीची लहर फिरली की काय भयंकर प्रकार होतो तो आमच्या कोल्हापूरच्या ‘ रामप्यारी ’ हत्तीनं नुकताच दाखविला होता. त्यामुळं नव्वद वर्षं आणि नंतरही प्रेमळ व स्वामिनिष्ठ म्हणून ज्याची ख्याती कायम होती त्या चंद्रशेखरविषयी मला फार कौतुक वाटलं व त्या भरात मी त्याच्या केसाळ खरबरीत सोंडेवरून हात फिरविला.

कथाकली हॉलमधून बाहेर पडल्यावर पिलाईनी आम्हाला श्राइनरूमकडे नेलं. या खोलीत विजेच्या दिव्यांचा प्रकाश समई-सारखा मंद होता. या खोलीत श्रीराम, हनुमंत, वगैरे देवांच्या लाकडात कोरलेल्या सुंदर मूर्ती व पद्मनाथ स्वामीचं सिंहासन, अनंत, गरुड वगैरे देवांची वाहनं आम्ही पाहिली. पद्मनाथ स्वामीचं सिंहासन लाकडात कोरलेलं होतं व त्यावर अत्यंत सुंदर असं सोन्याचं काम केलं होतं. हे सिंहासन सतराव्या शतकात घडविलं असावं म्हणतात. कृष्णाचं वाहन, अनंतशयन—हे चांदीत घडविलं होतं. व त्याचा काल पंधराव्या शतकाचा असावा असं पिलाई म्हणाले.

याच खोलीत दिव्यांचे दोन सुंदर नमुने आम्ही पाहिले. त्यापैकी ‘ रोलिंग लॅंप ’ मला फारच गमतीदार वाटला. हा दिवा बोटीवर वापरण्यासाठीच त्या काळचे लोक उपयोगात आणीत असत. दिव्याच्या बर्नर भोवती पृथ्वीचा ग्लोब असावा तसं लोखंडी जाळीचं एक वर्तुळ होतं आणि रचना अशी खुबीदार होती की हे

वर्तुळ कसंही आडवं उभं वाकडं तिकडं धरलं तरी आतील बर्नर व ज्योत सरळच रहावी. साखळीच्या टांगत्या समयांचे तर हरतऱ्हेचे नमुने येथे होते. काही समयांवर, मागच्या पायावर उभे असलेले घोडे होते, तर काहींवर लक्ष्मीची मूर्ती होती.

येथून आम्ही 'सिरॅमिक्स हॉल'कडे गेलो. या हॉलमध्ये अतिपूर्वेकडील मातीची भांडी, घडे वगैरे चिनी मातीच्या व पोर्सलेनच्या वस्तू आम्ही पाहिल्या. या हॉलमधून आर्मरीकडे–म्हणजे शस्त्रागाराकडे जाताना वाटेत काही युरोपिअन चित्रकारांची चित्रं टांगलेली आम्हाला दिसली. या चित्रात सिनेमा नटी देविकाराणी हिच्या सासऱ्याचं, निकोलस रोरिक याचं, हिमालयात तपस्या करणाऱ्या एका साधूचं चित्र विशेष महत्वाचं समजलं जातं असं पिळाई म्हणाले. चित्राचं नाव 'फायरी थॉट्स' असं होतं. मला काही हे चित्र आवडलं नाही. हिमालयात तपस्या करणाऱ्या साधूचे विचार पाखरांच्या रूपानं जगभर पसरलेले दाखविण्यात विषयाचं नाविन्य किंवा रूपकाचं औचित्य मला कुठेच आढळलं नाही.

शस्त्रागारात त्रावणकोरचे संस्थापक महाराजा मार्तंड वर्मा व त्यांच्या मागून या गादीवर आलेले काही राजे यांची आयुधं आम्ही पाहिली. या आयुधांना ऐतिहासिक महत्व होतंच. त्याचबरोबर काही आयुधांच्या मुठीवरील हस्तीदंताच्या अप्रतिम कोरीव कामामुळे ती संग्रहणीय ठरली होती. एका तरवारीची मूठ फारच सुंदर नक्षीदार होती. या खोलीच्या मध्यभागी एक मोठं—एखाद्या मध्यम ड्रेसिंग टेबल येवढं हस्तिदंती सिंहासन होतं. या सिंहासनाचं नक्षीकाम अती नाजुक व अती सुंदर होतं. मार्तंडवर्मानंतर १७५८ ते १७९८ पर्यंत त्रावणकोरचा राज्यकारभार पाहणारे

राजे धर्मराजा हे सिंहासन वापरीत असत. त्याच कालात सबंध हस्तिदंतात कोरलेलं लहानसं शेषासन आम्ही पाहिलं. या शेषासनावर भूदेवी, श्रीदेवी यांच्यासह बसलेल्या विष्णूचं सुंदर पंचायतन कोरलं होतं.

याच खोलीत, भिंतीला लागून उभ्या केलेल्या काचेच्या कपाटात काही वाद्यं आम्हाला दिसली. एकोणीसाव्या शतकात त्रावणकोरच्या गादीवर राजा स्वाथी थिरूनल नावाचा राजा होऊन गेला. हा फार मोठा गवई होता. त्याचं 'स्वरजित' नावाचं, सात तारांचं, हस्तीदंती नक्षीकाम केलेलं आवडतं वाद्य पिलईनी आम्हाला दाखविलं. येथे बिनचे, तंबोऱ्याचे, वीणेचे अनेक प्रकार आम्ही पाहिले. या तंतुवाद्यांपैकी काहींना दोन भोपळे होते, तर काहींना तीन भोपळे होते. या वाद्यांसंबंधीचं माझं ज्ञान त्यांच्या ओळख्या-इतपत असल्यामुळे माझ्या दृष्टीनं त्यांना फक्त ऐतिहासिक महत्व होतं. विशेष गमतीदार पाहिलं त्याचं नाव 'तट्टू वाद्य' असं होतं. हे दोन काठयांनी वाजवावयाचं असतं असं पिलाई म्हणाले.

येथून आम्ही रंगविलासच्या दुसऱ्या मजल्यावरील 'पोर्ट्रेट' गॅलरी पाहण्यासाठी गेलो. या हॉलमधे राजघराण्यातील सर्व स्त्रीपुरुषांची दरबारी पोषाखात रंगविलेली तैलचित्रं आम्ही पाहिली. या हॉलच्या भिंतींवर राजघराण्यातील सर्व स्त्रीपुरुषांची मोठमोठी तैलचित्रं टांगलेली आम्ही पाहिली. दोनशे वर्षांपूर्वीचे त्रावणकोरचे संस्थापक महाराजा मार्तंडवर्मा पासून तो सध्याचे महाराज श्रीराम यांचेपर्यंत सर्वांची चित्रं तेथे होती. दरबारी पोषाखात कालमाना-प्रमाणे होत गेलेला बदल मला मोठा गमतीदार वाटला. विशेषत: पूर्वीच्या महाराणीचा पोषाख व केशरचना आणि सध्याच्या महाराणी

—म्हणजे राजमाता सेतु पार्वतिबाई—यांचापोषाख व भूषा यात कमालीचं अंतर दिसलं. केस नारदमुनीप्रमाणे डोक्यावर बांधून त्याभोवती फुलं गुंफण्याची चाल होती. दंड, मनगट, कान व गळा दागिन्यांनी खचलेला असे. त्याच गादीवरील सध्याच्या राजमातेचा दरबारी पोषाख मुंबईच्या पाठारे प्रभू ज्ञातीतल्या फॅशनेबल बाईसारखा मला वाटला.

या हॉललगतच्या ‘ तिबेटिअन रूम ’कडे आम्ही गेलो. हिमालयापलिकडील प्रदेशातून आणलेल्या लाकडी कोरीव कामाच्या अनेक वस्तू येथे मांडलेल्या होत्या. एका बांबूच्या बुंध्यावर तिबेटच्या एका मठाचं चित्र कोरलेलं पाहून आश्चर्य वाटलं, त्याचप्रमाणे धातूचे नगारे पाहूनहीं मोठी मौज वाटली. नगाऱ्यांना चामड्याचा ताण असतो. परंतु ह्या नगाऱ्यांना मात्र धातूचा ताण होता. काठी घेऊन या ताणावर आघात करताच अगदी नगाऱ्याप्रमाणे या धातूच्या ताणातून मृदू, गंभीर नाद निघाला.

पोर्ट्रेट रूमच्या वाटेत निरनिराळ्या धातूच्या मूर्तीं मांडलेल्या होत्या. त्या बहुतेक मूर्ती देवादिकांच्या होत्या व त्यात बरेचसे फॅमिली ग्रूप—किंवा पंचायतन होती. श्री विष्णूचं अनंतशयनाचं एक लहानशा टाइपरायटर एवढं पंचायतन दाखवून पिलाई म्हणाले, “ हे उचला पाहू. ” आप्पा पुढे झाले व दोन्ही हातांनी ते उचलू लागले. एवढीशी वस्तू उचलण्यासाठी ते इतका जोर लावू लागलेले पाहून मला हसूच लोटलं. अखेर मी ते पंचायतन उचलू लागले तो काय ? मला ते नुसतं हलवितादेखील येईना. पिलाई हसून म्हणाले, “ जितकं धातूचं वजन अधिक तितकी ती मूर्ती पुरातन असा एक अडाखा आहे. ”

याच ठिकाणी आम्ही दिव्यांचे काही नमुने पाहिले. हजार वातींच्या समया, मिरवणुकीचे झुंबराचे दिवे साखळीचे दिवे, अशा खूप तऱ्हा होत्या. विशेषत: ' सक्शन लॅंप ' या तऱ्हेच्या दिव्यांची कौशल्यपूर्ण रचना मला फार कौतुकास्पद वाटली. हातात एक पक्षी घेऊन उभी राहिलेली स्त्री – हाच एका दिव्याचा आकार होता. स्त्रीच्या मस्तकात तेल भरण्याची जागा होती व तेथून गुप्त मार्गानं तिनं धरलेल्या पक्ष्यात – म्हणजे पणतीत – ते तेलवाती-पर्यंत पोचण्याची व्यवस्था होती. असेच आणखी दिवे पॅलेसच्या खालच्या मजल्यावरही होते. आम्ही खाली आलो व ते नमुने पाहू लागलो.

मराठा ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थळप्रत
अनुक्रम ३८७६५ दि. ५.५.५२
क्रमांक ३३६ नों. दि. २५.१.६४

REFBK 0014257

REFBK-0014257